VISHWAKARMA UNIVERSITY
*Maximising Human Potential*

University Grants Commission (UGC) Approved State Private University
Listed with Association of Indian Universities (AIU)



# वार्षिक अहवाल २०२०-२१

VISHWAKARMA UNIVERSITY
*Maximising Human Potential*

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे (यूजीसी) मान्यताप्राप्त राज्य खासगी विद्यापीठ
भारतीय विद्यापीठ संघटनेमध्ये (एआययू) नोंदणीकृत

# वार्षिक अहवाल २०२०-२१

**कॉपीराईट © २०२१ विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे**

**सर्व हक्क राखीव**

पत्ता :

सर्व्हे क्र. 2, 3, 4 लक्ष्मीनगर,

कोंढवा बुद्रुक, पुणे – 411048. महाराष्ट्र, भारत

www.vupune.ac.in

या वार्षिक अहवालाचे संकलन आणि निर्मिती प्रा. डॉ. चेतन कापडणीस, प्रा. अंकिता सांगळे, प्रा. अमोल रणदिवे यांनी विश्वकर्मा विद्यापीठाच्या प्रसिद्धी चमूच्या साह्याने केली. प्रा. अंकिता सांगळे यांनी या अहवालाचे संपादन केले असून, प्रा. अवधूत अत्रे आणि श्री. प्रकाश पाटील (Investronaut) यांनी त्याची संरचना केली.

**वार्षिक अहवाल समिती**

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे | मार्गदर्शक |
| प्रा. अंकिता सांगळे | संपादक |
| प्रा. डॉ. केदार संत | सदस्य |
| प्रा. डॉ. युवराज लाहोटी | सदस्य |
| प्रा. डॉ. चेतन कापडणीस | सदस्य |
| प्रा. नलिनी नाईक-निंबाळकर | सदस्य |
| प्रा. अमोल रणदिवे | सदस्य |
| प्रा. संदीप कुलकर्णी | सदस्य |
| प्रा. अपूर्वा भिलारे | सदस्य |
| श्री. अजय शिगवण | सदस्य |
| श्री. संदीप बारटक्के | सदस्य |




मानवी क्षमतांचा अधिकतम विकास

# अनुक्रमणिका


**०१ संदेश**
१.१ अध्यक्ष
१.२ उपाध्यक्ष
१.३ कुलगुरु

**०२ दृष्टी, ध्येय आणि मूल्यविधान**

**०३ परंपरा**

**०४ मैलाचे दगड**

**०५ पारितोषिके आणि दखल**
५.१ असोचॅम
५.२ यू-मल्टी टीएचई रँकिंग
५.३ टीएचई रँकिंग

**०६ संघटनात्मक रचना**
६.१ ऑर्गनोग्राम
६.२ समित्या६
६.३ निकषपूर्ती आणि मान्यता
६.४ प्राधिकरणे आणि वैधानिक संस्था
६.५ शिक्षक-संस्था-विभाग
६.६ सीओई कार्यालय

**०७ पायाभूत सुविधा**
७.१ भौतिक पायाभूत सुविधा
*अ. प्रयोगशाळा, जेएमसी-स्टुडिओ, वर्ग इ. इको-कॅम्पस*
*जिवंत प्रयोगशाळा, एसएपी आय360प्रयोगशाळा*
*ब. वसतिगृह क. आवारात वैद्यकीय मदत*
७.२ डिजिटल पायाभूत सुविधा

**०८ पदवीप्रदान**
८.१.२०२१

**०९ शैक्षणिक**
९.१ विभाग – अभ्यासक्रम
९.२ नवे अभ्यासक्रम
९.३ लघु मुदतीचे अभ्यासक्रम (मायनर ट्रॅक)

**१० संशोधन, अभिनवता आणि उद्योकता**
१०.१ संशोधन धोरण, संशोधन साह्य
१०.३ नवता आणि नवोद्योग धोरण
१०.३ संशोधन निबंध, पेटंट
१०.४ सेंटर ऑफ एक्सलन्स
*अ. विज्ञान सेंटर ऑफ एक्सलन्स*
*ब. ई-लर्निंग केंद्र, व्हीयू डिजिटस*
*क. सेंटर ऑफ एक्सलन्स बायोसिस्टीम्स, बायोमेडिकल अँड ड्रग अँड डिलिव्हरी टेक्नॉलॉजीज*
*ड. विलो-व्हीयू वॉटक क्वालिटी सेंटर ऑफ एक्सलन्स इमर्जिंग डिजिटल ग्रिड*
*ई. ऊर्जा आणि शाश्वतता केंद्र*
*फ. इंडस्ट्री 4.0 केंद्र*
*ग. माध्यमे कार्यक्रम मनोरंजन आणि पर्यटन केंद्र*
*ह. सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इमर्जिंग डिजिटल ग्रिड अँड ई-मोबिलिटी*
*प. सेंटर ऑफ एक्सलन्स व्हीयू-आयक्यूब*
*फ. सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन*
*ब. सेंटर ऑफ एक्सलन्स आय-बर्ग*

# अनुक्रमणिका


**११ शिक्षक उपक्रम**

११.१ शिक्षक मनुष्यबळ, रचना (पात्रता, प्रदेश आणि लिंग)

११.२ शिक्षकांसाठी क्षमतावृद्धी कार्यक्रम

११.३ शिक्षकांचे यश (पारितोषिके, एफडीपी इ.)

**१२ विद्यार्थी उपक्रम**

१२.१ विद्यार्थीसंख्या

१२.२ विद्यार्थ्यांचे यश (शैक्षणिक, क्रीडा, पाठ्यक्रमेतर)

१२.३ एनएसएस, एनसीसी आणि इतर उपक्रम

**१३ आंतरराष्ट्रीय अस्तित्व**

१३.१ सामंजस्य करार

१३.२ देवाण-घेवाण कार्यक्रम

१३.३ सहकार्य आणि प्रकल्प

**१४ उद्योग सहकार्य**

**१५ कार्यक्रम**

१५.१ स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन

१५.२ आंतरराष्ट्रीय योगदिन

१५.३ वॉकेथॉन

१५.४ आरंभ

१५.५ सधिष्ठान

१५.६ विश्वायन

१५.७ हॅकेथॉन

१५.८ उन्नत भारत (निधी इ.)

१५.९ स्वच्छ भारत, स्वच्छ गुणानुक्रम

१५.१० क्विक-हील साय-फाय कला महोत्सव

१५.११ एलजीसीई कार्यक्रम

१५.१२ विरासत

१५.१३ शुक्रिया

१५.१४ महत्त्वाचे दिवस (पर्यटनदिन इ.)

**१६ सामाजिक उपक्रम**

१६.१ दृष्टिहीनांची काठी

१६.२ बोलकी अंगणवाडी

१६.३ दत्तक गाव, वॉटर एटीएम

**१७ माध्यमातील दखल, वृत्तपत्र कात्रणे**

**१८ प्रकल्प**

१८.१ रांका ज्वेलर्स सल्लासेवा

१८.२ रुबी हॉल क्लिनिक प्रकल्प

१८.३ वाडिया रुग्णालय डेंगी संशोधन

१८.४ मानसशास्त्र-संगीत विभाग प्रकल्प

**१९ कोव्हिड प्रतिसाद**

१९.१ लसीकरण मोहीम

१९.२ कोव्हिड साह्य

१९.३ कॅम्पस सुरक्षितता उपक्रम

१९.४ कोव्हिड जागरुकता – डिजिटल अभ्यासक्रम

०१



# संदेश

# अध्यक्षांचा संदेश



**श्री. भरत अग्रवाल**
**अध्यक्ष**

शिक्षणाने कायम फायदाच होतो. सातत्याने बदलत जाणाऱ्या या जगात ज्या काही थोड्या गोष्टी शाश्वत आहेत, त्यात शिक्षणामुळे होणाऱ्या फायद्यांचे स्थान नक्कीच अढळ आहे. शिक्षण हा जगातील सर्वांत कठीण समस्यांवरही सकारात्मक परिणाम करु शकणारा जिज्ञासेचा, अध्ययनाचा आणि मानवी क्षमता वृद्धिंगत करत जाण्याचा प्रवास आहे. एक प्रकारे हा परिवर्तनाचा प्रवास आहे. ज्याचा अमीट ठसा औपचारिक शिक्षणानंतरही विद्यार्थ्यांच्या मनावर कायम राहतो, ते खरे शिक्षण! आक्रसणाऱ्या या जागतिक विश्वात आपल्याला भारतीय शिक्षण व्यवस्थेचे तात्त्विक, आध्यात्मिक आणि नैतिक अधिष्ठान कायम ठेवून शैक्षणिक सर्वोत्तमतेला विश्वबंधुत्वाच्या मूल्यांची जोड द्यावी लागेल.

## उपाध्यक्षांचा संदेश



**प्रा. डॉ. वासुदेव गाडे**
**उपाध्यक्ष**

दर्जेदार शिक्षण हा काही योगायोगाचा भाग नसतो. अतिशय नीटस नियोजन करून ते जाणीवपूर्वक रुजवावे लागते. एखादे विद्यापीठ जेव्हा सर्वोत्तमतेसाठीची केंद्रे स्थापन करते आणि त्या व्यासपीठावर बुद्धिमान, विचारवंत आणि नेतृत्वक्षमता असलेल्या व्यक्तींच्या समुदायामध्ये संवाद घडवून आणण्याचा द्रष्टेपणा जोपासते, तेव्हा दर्जेदार शिक्षण वास्तावात येते. विद्यार्थ्यांना त्यांची अंगभूत जिज्ञासा जोपासण्यास साह्य करणारी आणि स्वत:ची स्वतंत्र करिअरवाट शोधण्यास प्रवृत्त करणारी परिसंस्था म्हणजे शिक्षण. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना पंख देण्याचे आणि त्यांनी स्वत:ची स्वतंत्र यशस्वी वाटचाल करण्यासाठी बळ देण्याचे काम शिक्षणाने करणे अपेक्षित असते. विद्यार्थ्यांना संशोधनपूरक अभ्यासक्रम; तसेच अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त; पण सामाजिक कालसुसंगत्व असणाऱ्या नवकल्पनांचे दालन खुले करून दिल्यासच शिक्षणप्रक्रिया चांगली रुजेल.

# कुलगुरूचा संदेश



**प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे**
**कुलगुरू**

उच्च शिक्षणात दर वर्षी मोठ्या विद्यार्थीसंख्येची भर पडत असल्याच्या एका महत्त्वाच्या वळणावर सध्या आपला देश आहे. या वाढत्या संख्येला सामावून घेण्यास सार्वजनिक शिक्षण संस्था अपुऱ्या पडत असल्याने खासगी संस्थांनी ही गरज भागविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. शिक्षण आणि उद्योग यांतील दरी भरून काढण्याचे आव्हान या संस्थांनी पेलणे गरजेचे आहे. हे साध्य करण्यासाठी आपण नवकल्पना आणि नवोद्योगांना प्रोत्साहन देणारी उत्फुल्ल आणि समृद्ध अध्ययन-अध्यापन संस्कृती निर्माण करणे आवश्यक आहे. पारंपरिक अध्यापन पद्धतींचे पुनरावलोकन करून अधिक संवादी आणि बहुविद्याशाखीय अध्ययन अनुभव देण्याची गरज आहे.

०२



# दृष्टिकोन,
# ध्येय आणि मूल्य

# दृष्टिकोन, ध्येय आणि मूल्य विधान

## दृष्टिकोन

शिक्षण, संशोधन आणि नवकल्पनांतील सर्वोत्तमेसाठी जागतिक पातळीवर नावाजलेले प्रतिष्ठित विद्यापीठ म्हणून भरारी घेणे.

## ध्येय

+ संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून कालसुसंगत परिवर्तनक्षम शिक्षण देणे.
+ उपजीविकेबरोबरच जीवनकलेच्या साध्यासाठी सक्षम नेतृत्व-व्यावसायिक घडवणे.
+ सर्वोत्तम मानवी आणि सामाजिक-आर्थिक भांडवलाची सहउभारणी.
+ तत्त्व व नैतिकता जोपासणाऱ्या सर्वंकष संस्कृतीची जीवनकौशल्ये रुजवणे.



## विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे

विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे ही विश्वकर्मा शिक्षण संस्था समूहाच्या 35 वर्षांहून अधिक काळ असलेल्या परंपरेची नैसर्गिक शाखा आहे. महाराष्ट्र सरकारच्या कायद्यानुसार, सन 2017 मध्ये राज्य खासगी विद्यापीठ म्हणून या विद्यापीठाची स्थापना झाली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेनुसार, विश्वकर्मा विद्यापीठ स्वत:च्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी, परीक्षांचे संचलन आणि पदवीप्रदान करु शकते.

विश्वकर्मा विद्यापीठ असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे (एआययू, नवी दिल्ली) सदस्य आहे. टाइम्स हायर एज्युकेशन ग्लोबल इम्पॅक्ट रँकिंग्ज 2021 नुसार, विश्वकर्मा विद्यापीठाचा समावेश 98 देश/विभागांतील आघाडीच्या 1200 विद्यापीठांत होतो. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांच्या निकषांनुसार हे गुणांकन होते. असोसिएटेड चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया अर्थात 'असोचेम'कडून विश्वकर्मा विद्यापीठाला वर्षातील उभरते विद्यापीठ म्हणून पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**विश्वकर्मा विद्यापीठातील अभ्यासक्रमांना विविध शिखर परिषदांची मान्यता आहे.**

+ औषधनिर्माणशास्त्र : फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून डी.फार्म आणि बी.फार्म अभ्यासक्रमांना मान्यता
+ विधी : बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून बीबीए एलएलबी आणि एलएलबी अभ्यासक्रमांना मान्यता
+ वास्तुरचनाशास्त्र : कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरकडून बी.आर्क अभ्यासक्रमाला मान्यता

विद्यार्थी आणि एकूणच समाजावर सकारात्मक परिणाम घडविण्यासाठीच्या शैक्षणिक सर्वोत्तमतेवर विद्यापीठाचा भर आहे. आकलन, उपयोजन, प्रत्यक्ष कामगिरी आणि स्वयंमूल्याकन याचे मिश्रण विद्यापीठाच्या अध्ययन प्रारुपात आहे. उद्योगांच्या शिक्षणातील सहभागामुळे 'शिकलेल्या गोष्टी प्रत्यक्ष करून बघणे' शक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण मिळते.

कालसुसंगत पाठ्यक्रमरचना आणि सर्वंकष विकासाचे वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरवाटा चालण्यासाठी तयार करण्याचे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे.


CAMPUS

०३



# विश्वकर्मा विद्यापीठाची परंपरा

## विश्वकर्मा विद्यापीठाची परंपरा

विश्वकर्मा शिक्षण संस्था समूह

दर्जेदार मनुष्यबळनिर्मिती; तसेच शैक्षणिक प्रयत्नांद्वारे मूल्यनिर्मिती करण्यावर भर देऊन सर्व घटकांसाठी सामाजिक समृद्धी साध्य करण्याचा विश्वकर्मा समूहाचा दृष्टिकोनच विश्वकर्मा शिक्षण संस्थांनी आत्मसात केला आहे. विविध आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांना विश्वकर्मा विद्यापीठ सामावून घेते आणि ही विविधता अभ्यासक्रमांतही प्रतिबिंबित होत राहते. नवकल्पनांना सातत्याने वाव देऊन; तसेच नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांद्वारे शिक्षण संस्थांमध्ये उच्च दर्जाच्या सेवा पुरवून मूल्याधिष्ठित विकासाला प्रोत्साहन देणे आणि त्याचा कार्यपद्धतींवर प्रभाव पाडणे, हे आमचे ध्येय आहे. त्याचमुळे हे विद्यापीठ अनेक आंतरराष्ट्रीय संस्था; तसेच कंपन्यांचा आवडता भागीदार आहे.

विश्वकर्मा समूहाची विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) ही पहिली शिक्षण संस्था 1983 मध्ये स्थापन झाली. त्यानंतर 1986 मध्ये विश्वकर्मा विद्यालय आणि मग नंतरच्या काही वर्षांत इतर संस्था सुरु झाल्या. सध्या विश्वकर्मा समूहात अभियांत्रिकी, व्यवस्थापन, विज्ञान, शाळा आणि मूल्यवर्धित अभ्यासक्रम आदी 17 शिक्षण संस्था असून, तेथे 17,000 विद्यार्थी शिकतात, तर 2000 पूर्ण वेळ कर्मचारी काम करतात.

- **विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी), पुणे**
- **विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयआयटी), पुणे**
- **विस्डम वर्ल्ड स्कूल (डब्ल्यूडब्ल्यूएस), हडपसर आणि वाकड, पुणे**
- **विश्वकर्मा विद्यालय (व्हीव्ही), पुणे**
- **विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (व्हीसीएसीएस), पुणे**
- **विश्वकर्मा एम्प्रोस इंटरनॅशनल स्कूल (व्हीईआयएस) - चिंचवड आणि तळेगाव, पुणे**
- **विश्वकर्मा कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (व्हीसीएससी), कोल्हापूर**


4
आगामी वाटचाल
2
दखल आणि निकषपूर्ती

3

टीएचई परिणामकारता गुणानुक्रमवारी
पारितोषिके आणि गुणानुक्रम
यु मल्टी - रँकिंग
असोचॅम पारितोषिक

1

स्थापना

०५



# विश्वकर्मा विद्यापीठाला प्राप्त पारितोषिके आणि घेतलेली दखल

# विश्वकर्मा विद्यापीठाला प्राप्त पारितोषिके आणि घेतलेली दखल

**पश्चिम भारतातील वर्षातील उभरते विद्यापीठ हे 'असोचॅम'चे पारितोषिक**

नवी दिल्लीतील हॅबिटॅट केंद्र येथे आयोजिण्यात आलेल्या 'असोचॅम'च्या 13 व्या हायर एज्युकेशन, स्किल अँड लाइव्हलीहूड कॉन्क्लेव्ह 2020 मध्ये विश्वकर्मा विद्यापीठाला 25 फेब्रुवारी 2020 ला 'पश्चिम भारतातील उभरते विद्यापीठ' हे पारितोषिक मिळाले. 'असोचॅम'चे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी यांच्या हस्ते विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थ जबडे यांनी हे पारितोषिक स्वीकारले.

या अधिवेशनला देशभरातून 300 हून अधिक कुलपती, कुलगुरू, प्राचार्य, अधिष्ठाते, संचालक; तसेच आघाडीची सरकारी, खासगी विद्यापीठे, संस्था, महाविद्यालये, शिक्षणतंत्र नवोद्योगांचे प्रवर्तक आणि सल्लागार उपस्थित होते. जागतिक दर्जाचे शिक्षण, अभिनवता आणि संशोधनाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते.



# विश्वकर्मा विद्यापीठाचे यश

**यू-मल्टीरँक वर्ल्ड रँकिंग्ज ऑफ युनिव्हर्सिटीज फॉर 2019-20**

भारतातील शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडविण्याच्या विश्वकर्मा विद्यापीठाच्या प्रयत्नांवर यू-मल्टीरँक वर्ल्ड रँकिंग्ज ऑफ युनिव्हर्सिटीज 2019-20 ने एकप्रकारे शिक्कामोर्तब केले आहे. यू-मल्टिरँकच्या 9 जून 2020 रोजी प्रसिद्ध झालेल्या क्रमवारीत विश्वकर्मा विद्यापीठाने स्थान मिळवले.

विश्वकर्मा विद्यापीठाची 92 देशांतील 1759 संस्थांशी स्पर्धा होती. भारतातून बीएचयू, आयआयटी, एम्स आदी समृद्ध शिक्षण परंपरा असलेली 15 विद्यापीठे सहभागी झाली होती; पण विश्वकर्मा विद्यापीठाने अशा स्पर्धेतही आपले स्थान टिकवले.

विद्यार्थ्यांना उद्योगजगतात उमेदवारीची संधी, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, विविध उपक्रमांत विद्यार्थी सहभाग, अध्ययन-अध्यापन आदी निकषांवर विश्वकर्मा विद्यापीठाने पुष्कळ गुण मिळवले. क्रमवारीसाठी निश्चित केलेल्या 5 पैकी 2 निकषांवर विश्वकर्मा विद्यापीठाने 'अतिशय उत्तम' असा शेरा प्राप्त केला. आमच्याप्रती विश्वास ठेवल्याबद्दल आम्ही सर्व विद्यार्थी आणि पालकांचे आभार मानतो. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्याने मौल्यवान भर घालण्याप्रती आम्ही कायमच कटिबद्ध आहोत.









# विश्वकर्मा विद्यापीठाचे यश

**टाइम्स हायर एज्युकेशनच्या (टीएचई) 'एसडीजी 7 : परवडणारी व स्वच्छ ऊर्जा' या विभागासाठीच्या परिणामकारता गुणानुक्रमवारीत जगभरातील आघाडीच्या 200 संस्थांत विश्वकर्मा विद्यापीठाचा समावेश**

संयुक्त राष्ट्रांच्या 'शाश्वत विकास ध्येय : एसडीजी 7 – परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा' या संकल्पनेशी सुसंगत अशा ऊर्जा आणि ऊर्जाक्षमतेशी संबंधित कामाकरिता विश्वकर्मा विद्यापीठाचा समावेश टाइम्स हायर एज्युकेशनच्या (टीएचई) परिणामकारता गुणानुक्रमवारीत जगभरातील आघाडीच्या 200 संस्थांत झाला आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनुसार मूल्यमापन होणारे हे गुणानुक्रम अशा प्रकारचे एकमात्र जागतिक कामगिरी तक्ते आहेत. 2021 परिणामकारता गुणानुक्रम पद्धतीची ही तिसरी आवृत्ती असून, एकूण गुणानुक्रमांत 98 देशांतील 1200 विद्यापीठांचा समावेश आहे.

'टीएचई परिणामकारता गुणानुक्रमवारी 2021'साठीच्या सर्वसाधारण गुणानुक्रमवारीत आल्याने त्या निकषांतर्गत विश्वकर्मा विद्यापीठ गुणानुक्रमात पात्र ठरण्यात यशस्वी झाले आहे. 'एसडीजी 6 – स्वच्छ पाणी आणि स्वच्छता' या विभागात विश्वकर्मा विद्यापीठ पहिल्या 300 क्रमांकात आहे.

'टीएचई परिणामकारता गुणानुक्रम 2021'मध्ये एकूण 49 भारतीय शिक्षण संस्थांचा समावेश असून, जागतिक गुणानुक्रमवारीत सहभागी होणारे विश्वकर्मा विद्यापीठ सर्वांत तरुण विद्यापीठांपैकी एक आहे.



## इलेट्स सर्वोत्तम संरचित संस्था

**विश्वकर्मा विद्यापीठाला इलेट्सच्या 18 व्या ‘वर्ल्ड एज्युकेशन समिट अँड अवॉर्ड्स 2021’मध्ये सर्वोत्तम डिझाइन शिक्षणासाठी जेतेपद मिळाले आहे.**

आमच्या निष्णात आणि मेहनती शिक्षकांनी **डिझाइन शिक्षणात** सर्वोत्तमता मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत.

‘महाविद्यालय आवारातच उद्योगजगत’ आणि ‘उद्योगजगताशी सर्वंकष संपर्क’ या संकल्पना राबविल्याची कला आणि डिझाइन विद्याशाखेला चांगली फळे मिळाली आहेत. विश्वकर्मा विद्यापीठ तरुणांमधील गुणवत्ता रुजविणाऱ्या आणि सहकार्य भावनेची कदर करणाऱ्या शैक्षणिक संस्कृतीला कायमच प्रोत्साहन देते. विश्वकर्मा कुटुंब आपल्या स्वप्नांवर लक्ष केंद्रित करते; तसेच सर्व घटकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एकही प्रयत्न कमी पडू देत नाही. शिक्षणात बहुविद्याशाखीय दृष्टिकोन आणून आम्ही अनेक शैक्षणिक शाखांत सर्वोत्तमता प्रस्थापित केली आहे. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळविण्याच्या दृष्टीनेच आम्ही अध्यापनाची रचना केली आहे.



VISHWAKARMA UNIVERSITY
*Maximising Human Potential*
University Grants Commission (UGC) Approved State Private University

elets WORLD EDUCATION SUMMIT 2021
The Premier Global Event on Innovation in Education




**Vishwakarma University, Pune**
has been declared **WINNER** for

# EXCELLENCE IN DESIGN EDUCATION

At the World Education Awards 2021 (Higher Education)
held on **March 6, 2021**

For the Project

**Industry on Campus and Industry Connect**

# ०६



# व्हीयू संघटनात्मक रचना



## विश्वकर्मा विद्यापीठ – नियामक मंडळ

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | भरत राजकुमार अग्रवाल | अध्यक्ष | चेअरपर्सन |
| 2 | प्रा. (डॉ.) बीव्हीआर चौधरी | नामनिर्देशित विश्वस्त (शिक्षणतज्ज्ञ) | सदस्य |
| 3 | प्रा. (डॉ.) भारतकुमार भगतराज अहुजा | नामनिर्देशित विश्वस्त (शिक्षणतज्ज्ञ) | सदस्य |
| 4 | (डॉ.) कृष्णास्वामी श्रीहरी | नामनिर्देशित विश्वस्त (शिक्षणतज्ज्ञ) | सदस्य |
| 5 | प्रा. (डॉ.) प्रबुद्ध गांगुली | नामनिर्देशित विश्वस्त (तज्ज्ञ व्यवस्थापन) | सदस्य |
| 6 | प्रा. (डॉ.) वासुदेव एन. गाडे | नामनिर्देशित विश्वस्त | सदस्य |
| 7 | डॉ. बिपिन सुबोध सुळे | नामनिर्देशित विश्वस्त | सदस्य |
| 8 | श्री. प्रणव रुंगठा | राज्य सरकार नामनिर्देशित | सदस्य |
| 9 | श्री. शार्दूल बायस | नामनिर्देशित विश्वस्त | सदस्य |
| 10 | श्रीमती तृप्ती भरत अग्रवाल | उद्योग प्रतिनिधी | सदस्य |
| 11 | एड. प्रताप परदेशी | उद्योग प्रतिनिधी | सदस्य |
| 12 | श्री. बजरंगदास बी. लोहिया | निमंत्रित | निमंत्रित |
| 13 | प्रा. (डॉ.) केदार दामोदर संत | कुलसचिव (कायम निमंत्रित) | निमंत्रित |
| 14 | श्री. नीरज आठल्ये | निमंत्रित | निमंत्रित |
| 15 | श्री. गुरुप्रसाद माकम | निमंत्रित | निमंत्रित |
| 16 | प्रा. (डॉ.) सिद्धार्थ कांतिलाल जबडे | कुलगुरु | सदस्य सचिव |

## Board of Management

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. (डॉ.) सिद्धार्थ जबडे | कुलगुरु | अध्यक्ष |
| 2 | श्रीमती तृप्ती अग्रवाल | नियामक मंडळ सदस्य | सदस्य |
| 3 | डॉ. बिपिन सुळे | नियामक मंडळ सदस्य | सदस्य |
| 4 | प्रा. (डॉ.) योगेश देशपांडे | अधिष्ठाता | सदस्य |
| 5 | प्रा. (डॉ.) अवधूत अत्रे | अधिष्ठाता | सदस्य |
| 6 | एड. रितेश मेहता | विश्वस्त मंडळाने नामनिर्देशित केलेले सदस्य | सदस्य |
| 7 | प्रा. (डॉ.) उमेश पटवर्धन | नामनिर्देशित शिक्षक | सदस्य |
| 8 | प्रा. रीना पांडे | नामनिर्देशित शिक्षक | सदस्य |
| 9 | प्रा. (डॉ.) चेतन कापडणीस | नामनिर्देशित शिक्षक | सदस्य |
| 10 | प्रा. (डॉ.) केदार संत | कुलसचिव | सदस्य सचिव |

VU

रजिस्ट्रार

अध्यक्ष

उपाध्यक्ष

कुलगुरू

परीक्षा नियंत्रक

मुख्य आर्थिक आणि लेखा अधिकारी

**अधिष्ठाता**
- फॅकल्टी ऑफ आर्किटेक्चर
- फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाइन
- फॅकल्टी ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट
- फॅकल्टी ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस
- फॅकल्टी ऑफ इंटरडिसिप्लिनरी स्टडीज
- फॅकल्टी ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन
- फॅकल्टी ऑफ लॉ
- फॅकल्टी ऑफ फार्मसी
- फॅकल्टी ऑफ सायन्स अँड टेक्नोलॉजी

**संचालक**

**प्रशासन**
- आयक्यूएसी
- VU डिजिटल
- काउन्सेलिंग अँड ॲडमिशन ऑफिस
- रिसर्च
- नॉलेज रिसोर्स सेंटर
- स्टुडंट वेल्फेअर
- इंटरनॅशनल रिलेशन्स
- इंडस्ट्री कनेक्ट अँड करिअर सपोर्ट

**सेंटर ऑफ एक्सलन्स**
- सेंटर ऑफ एक्सलन्स
- ई-लर्निंग सेंटर
- इंडस्ट्री सेंटर 4.0
- विज्ञान केंद्र ऑफ एक्सलन्स
- युनिटी सेंटर ऑफ एक्सलन्स
- VU-IQUBE
- ई-मोबिलिटी सीओई
- सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर एनर्जी अँड सस्टेनेबिलिटी
- सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन
- बायोसिस्टम, बायोमेडिकल आणि औषध वितरण तंत्रज्ञान
- विकासासाठी संवाद
- वॉटर क्वालिटी सेंटर ऑफ एक्सलन्स
- VU - मीडियासाठी विझक्राफ्ट सेंटर ऑफ एक्सलन्स, मनोरंजन, कार्यक्रम आणि पर्यटन (MEET)

**चीफ डिजिटल अँड चीफ इन्फर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर (सीडीओ अँड सीआयएसओ)**
- सिस्टिम्स डिपार्टमेंट
- ईआरपी सेक्शन

**डेप्युटी रजिस्ट्रार**
- प्रशासन
- एस्टॅब्लिशमेंट
- पब्लिक रिलेशन्स ऑफिस
- रेकॉर्ड्स अँड मीटिंग्ज
- कॅम्पस मॅनेजमेंट
- स्टुडंट फॅसिलिटेशन सेंटर

- असिस्टंट रजिस्ट्रार
- सेक्शन ऑफिसर
- असिस्टंट सेक्शन ऑफिसर
- सीनियर असिस्टंट (क्लार्क)
- ज्युनियर असिस्टंट (क्लार्क)

- डेप्युटी रजिस्ट्रार
- असिस्टंट रजिस्ट्रार
- सेक्शन ऑफिसर
- असिस्टंट सेक्शन ऑफिसर
- सीनियर असिस्टंट (क्लार्क)
- ज्युनियर असिस्टंट (क्लार्क)

- डेप्युटी रजिस्ट्रार
- असिस्टंट रजिस्ट्रार
- सेक्शन ऑफिसर
- असिस्टंट सेक्शन ऑफिसर
- सीनियर असिस्टंट (क्लार्क)
- ज्युनियर असिस्टंट (क्लार्क)

**शाळा संचालक**
- स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंग
- स्कूल ऑफ आर्ट
- स्कूल ऑफ डिझाइन
- स्कूल ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस
- स्कूल ऑफ कॉमर्स
- स्कूल ऑफ सोशल सायन्सेस
- स्कूल ऑफ इकॉनॉमिक सायन्सेस
- स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस
- स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी अँड टूरिझम
- स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ
- स्कूल ऑफ इव्हेंट मॅनेजमेंट
- स्कूल ऑफ इंटिग्रेटेड एज्युकेशन
- स्कूल ऑफ जर्नेलिझम अँड मास कम्युनिकेशन
- स्कूल ऑफ कम्युनिकेशन स्टडीज
- स्कूल ऑफ लॉ अँड गव्हर्नन्स
- स्कूल ऑफ फार्मसी
- स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी
- स्कूल ऑफ बेसिक अँड क्वांटिटेटिव्ह सायन्सेस
- स्कूल ऑफ अप्लाइड सायन्सेस
- स्कूल ऑफ फिजिओलॉजिकल सायन्सेस

**विभाग प्रमुख**
- डिपार्टमेंट ऑफ आर्किटेक्चर
- डिपार्टमेंट ऑफ फॅशन
- डिपार्टमेंट ऑफ ॲनिमेशन
- डिपार्टमेंट ऑफ इंटिरिअर स्पेसेस
- डिपार्टमेंट ऑफ डिझाईन
- डिपार्टमेंट ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन
- डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट
- डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स
- डिपार्टमेंट ऑफ सायकॉलॉजी
- डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक सायन्स
- डिपार्टमेंट ऑफ म्युझिक
- डिपार्टमेंट ऑफ ट्रॅव्हल अँड टूरिझम
- डिपार्टमेंट ऑफ पब्लिक हेल्थ
- डिपार्टमेंट ऑफ इव्हेंट मॅनेजमेंट
- डिपार्टमेंट ऑफ प्रोफेशनल स्टडीज
- डिपार्टमेंट ऑफ जर्नेलिझम अँड मास कम्युनिकेशन
- डिपार्टमेंट ऑफ व्हिज्युअल आर्ट्स
- डिपार्टमेंट ऑफ लॉ
- डिपार्टमेंट ऑफ फार्मसी
- डिपार्टमेंट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअरिंग
- डिपार्टमेंट ऑफ कम्प्युटर इंजिनिअरिंग
- डिपार्टमेंट ऑफ स्टॅटिस्टिक्स अँड मॅथेमॅटिक्स
- डिपार्टमेंट ऑफ कम्प्युटर सायन्स
- सांडपाणी स्वच्छता आणि स्वच्छता विभाग
- योग आणि निसर्गोपचार विभाग

**फॅकल्टी मेंबर**

# विद्यापीठाचे अधिकारी

| अ. क्र | अधिकाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. भरत आगरवाल | अध्यक्ष |
| 2 | प्रा. (डॉ.) वासुदेव गाडे | उपाध्यक्ष |
| 3 | प्रा. (डॉ.) सिद्धार्थ जबडे | कुलगुरु |
| 4 | प्रा. (डॉ.) केदार संत | रजिस्ट्रार |
| 5 | प्रा. (डॉ.) युवराज लाहोटी | परीक्षा नियंत्रक |
| 6 | श्री. आनंद वैद्य | मुख्य आर्थिक आणि लेखा अधिकारी |
| 7 | डॉ. जयश्री नितिन विसपुते | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट |
| 8 | प्रा. (डॉ.) अवधूत अत्रे | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाइन |
| 9 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस |
| 10 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ जर्नेलिझम, मीडिया अँड कम्युनिकेशन |
| 11 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ इंटरडिसिप्लिनरी स्टडीज |
| 12 | प्रा. नलिनी नाईक निंबाळकर | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ आर्किटेक्चर |
| 13 | प्रा. (डॉ.) नितिन सातपुते | अधिष्ठाता - फॅकल्टी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी |
| 14 | प्रा. सारिका सागर | कार्यक्रम प्रमुख – फॅकल्टी ऑफ लॉ |
| 15 | प्रा. मकरंद पुरी | कार्यक्रम प्रमुख – फॅकल्टी ऑफ फार्मसी |
| 16 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | संचालक – आयक्यूएसी |
| 17 | प्रा. (डॉ.) योगेश देशपांडे | संचालक – व्हीयू डिजिटल |
| 18 | प्रा. (डॉ.) उमेश पटवर्धन | संचालक – काउन्सेलिंग अँड ॲडमिशन्स ऑफिस |
| 19 | प्रा. (डॉ.) कैलास पाटील | चीफ इन्फर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर, डायरेक्टर ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स, चीफ डिजिटल ऑफिसर |
| 20 | प्रा. (डॉ.) प्रसाद गोखले | संचालक – रिसर्च |
| 21 | डॉ. (सौ) शीतल नाईक | संचालक – नॉलेज रिसोर्स सेंटर |
| 22 | प्रा. रीना पांडे | संचालक – स्टुडंट वेल्फेअर |
| 23 | प्रा. अमोल रणदिवे | हेड - इंडस्ट्री कनेक्ट अँड करिअर सपोर्ट |

## विद्यापीठाचे अधिष्ठाता

| अ. क्र. | अधिष्ठात्याचे नाव | पद | फॅकल्टी |
|---|---|---|---|
| 1 | आर्क. नलिनी नंदराज नाईक निंबाळकर | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ आर्किटेक्चर |
| 2 | डॉ. अवधूत मुरारी अत्रे | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ आर्ट ॲड डिझाइन (ए अँड डी) |
| 3 | डॉ.जयश्री नितीन विसपुते | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट (सी अँड एम) |
| 4 | डॉ. चेतन वसंतराव कापडनीस | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस (एचएसएस) |
| 5 | डॉ. चेतन वसंतराव कापडनीस | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ इंटरडिसिप्लिनरी स्टडीज |
| 6 | डॉ. चेतन वसंतराव कापडनीस | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ जर्नेलिझम, मीडिया अँड कम्युनिकेशन (जेएमसी) |
| 7 | डॉ. निर्तिन विजय सातपुते | अधिष्ठाता | फॅकल्टी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी |
| 8 | श्रीमती सारिका जनार्दन सागर | कार्यक्रम प्रमुख | फॅकल्टी ऑफ लॉ |
| 9 | श्री मकरंद विष्णू पुरी | कार्यक्रम प्रमुख | फॅकल्टी ऑफ फार्मसी |

## विद्यापीठातील विभागप्रमुख

| अ. क्र. | फॅकल्टी मेंबरचे नाव | फॅकल्टीचे नाव | डिपार्टमेंटचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रशांत एस. आचार्य | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ ग्राफिक डिझाईन |
| 2 | श्री. राहुल सुरेश होनराव | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ इंटीरिअर स्पेसेस |
| 3 | श्रीमती रीना संजय पांडे | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ फॅशन |
| 4 | श्रीमती राखी गिरीश चरवड | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ डिझाईन फंडामेंटल |
| 5 | श्री. ओंकार सदाशिव राणे | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ प्रॉडक्ट डिझाईन |
| 6 | श्री. मंदार सूर्यकांत नाईक | फॅकल्टी ऑफ आर्ट अँड डिझाईन | डिपार्टमेंट ऑफ ॲनिमेशन |
| 7 | डॉ. अर्चना सिंग | फॅकल्टी ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट | डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट |

| अ. क्र. | फॅकल्टी मेंबरचे नाव | फॅकल्टी मेंबरचे नाव | डिपार्टमेंटचे नाव |
|---|---|---|---|
| 8 | डॉ. ओमवीर गौतम | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | बिझनेस एडमिनिस्ट्रेशन |
| 9 | डॉ. पश्मिना पीयूष दोशी | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | बिझनेस एडमिनिस्ट्रेशन |
| 10 | श्रीमती अंकिता पांडुरंग सांगळे | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान | अर्थशास्त्र |
| 11 | डॉ. भूपेंद्र सिंग | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान | मानसशास्त्र |
| 12 | श्रीमती रुचिरा केदार बारटके | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान | संगीत |
| 13 | श्रीमती आरती अजय सूर्यवंशी | आंतरविद्याशाखीय अभ्यास | इव्हेंट मॅनेजमेंट |
| 14 | डॉ. राजेंद्र विष्णू आवटे | आंतरविद्याशाखीय अभ्यास | सार्वजनिक आरोग्य |
| 15 | श्री. मयुरेश व्ही. बेलसरे | माध्यमे आणि संज्ञापन | पत्रकारिता, माध्यमे आणि संज्ञापन |
| 16 | श्री. वैभव एम. ठाकरे | माध्यमे आणि संज्ञापन | व्हिज्युअल आर्ट्स |
| 17 | श्रीमती सारिका सागर | विधी | विधी |
| 18 | श्री. मकरंद विष्णू पुरी | औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माण रसायनशास्त्र |
| 19 | श्रीमती सोनाली जी. मानवतकर | औषधनिर्माणशास्त्र | फार्मकॉलॉजी |
| 20 | श्रीमती माया महेश कुरुळेकर | विज्ञान आणि तंत्रज्ञान | अभियांत्रिकी विज्ञान |
| 21 | श्री. संदीप श्रीनिवास कुलकर्णी | विज्ञान आणि तंत्रज्ञान | मेकॅनिकल इंजिनीअरिंग |
| 22 | डॉ. नाझिया वाहिद | विज्ञान आणि तंत्रज्ञान | संख्याशास्त्र |
| 23 | डॉ. जगदीश व्ही. तावडे | विज्ञान आणि तंत्रज्ञान | गणित |
| 24 | प्रा. पूजा कुलकर्णी | विज्ञान आणि तंत्रज्ञान | संगणक विज्ञान |
| 25 | डॉ. श्रद्धा खम्पारिया | विज्ञान आणि तंत्रज्ञान | वॉटर सॅनिटेशन अँड हायजिन |
| 26 | डॉ. संजेश सदानंद पवळे | विज्ञान आणि तंत्रज्ञान | संगणक विज्ञान |

## अंतर्गत तक्रार समिती

| अ. क्र. | नाव | पद | भूमिका |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. जयश्री विसपुते | अध्यापक सदस्य | अध्यक्ष |
| 2 | प्रा. (डॉ.) युवराज लाहोटी | अध्यापक सदस्य | सदस्य |
| 3 | प्रा. वैशाली वाघ | अध्यापक सदस्य | सदस्य |
| 4 | प्रा. राधाकृष्ण बटुले | अध्यापक सदस्य | सदस्य |
| 5 | डॉ. शीतल नाईक | अध्यापक सदस्य | सदस्य |
| 6 | प्रा. विजया हाके | अध्यापक सदस्य | सदस्य |
| 7 | श्री. अजय शिगवण | कर्मचारी सदस्य | सदस्य |
| 8 | श्री. मिहीर ठक्कर | विद्यार्थी | विद्यार्थी |
| 9 | श्री. करण जगतियानी | विद्यार्थी | विद्यार्थी |
| 10 | श्रीमती मधुरा पुराणिक | विद्यार्थी | विद्यार्थी |

## तक्रार निवारण समिती

| अ. क्र. | नाव | पद | भूमिका |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. (डॉ.)सिद्धार्थ जबडे | कुलगुरु | अध्यक्ष |
| 2 | प्रा. (डॉ.) सुनील डोके | अधिष्ठाता (आयडीएस) | व्यवस्थापन मंडळाकडून नामनिर्देशित सदस्य |
| 3 | प्रा. (डॉ.) अवधूत अत्रे | व्यवस्थापन मंडळ सदस्य | व्यवस्थापन मंडळाकडून नामनिर्देशित सदस्य |
| 4 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | व्यवस्थापन मंडळ सदस्य | व्यवस्थापन मंडळाकडून नामनिर्देशित सदस्य |
| 5 | प्रा. मकरंद पुरी | अध्यापक सदस्य | कुलगुरुंकडून नामनिर्देशित सदस्य |
| 6 | आर्क. नलिनी नंदराज नाईक निंबाळकर | अध्यापक सदस्य | कुलगुरुंकडून नामनिर्देशित सदस्य |
| 7 | प्रा. रीना पांडे | अध्यापक सदस्य | विद्या परिषदेकडून नामनिर्देशित सदस्य |
| 8 | प्रा. (डॉ.) केदार संत | कुलसचिव | सदस्य सचिव |

## रॅगिंगविरोधी समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. राधाकृष्ण बटुले | अध्यापक | संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ |
| 2 | प्रा. कैलास भोसले | अध्यापक | राखीव सदस्य |
| 3 | प्रा. रीना पांडे | अध्यापक | महिला सदस्य |
| 4 | प्रा. उमेश पटवर्धन | अध्यापक | सदस्य |
| 5 | डॉ. शीतल नाईक | अध्यापक | महिला सदस्य |
| 6 | श्री. अजय शिगवण | शिक्षकेतर कर्मचारी | सदस्य सचिव |

## आरक्षण विभाग समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. कैलास भोसले | अध्यापक | अध्यक्ष |
| 2 | प्रा. राधाकृष्ण बटुले | अध्यापक | सदस्य |
| 3 | प्रा. विजया हाके | अध्यापक | सदस्य |
| 4 | प्रा. (डॉ.) चेतन कापडनीस | अध्यापक | सदस्य |
| 5 | श्री. मनोज गिरी | शिक्षकेतर कर्मचारी | सदस्य सचिव |

## आरक्षणविषयक तक्रारनिवारण समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. कैलास भोसले | अध्यापक | अध्यक्ष |
| 2 | प्रा. राधाकृष्ण बटुले | अध्यापक | सदस्य |
| 3 | प्रा. विजया हाके | अध्यापक | सदस्य |

## विद्यार्थी शिस्तपालन समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. उमेश पटवर्धन | अध्यापक | अध्यक्ष |
| 2 | डॉ. अवधूत अत्रे | अध्यापक | सदस्य |
| 3 | डॉ. नितिन सातपुते | अध्यापक | सदस्य |
| 4 | डॉ. नाझिया वाहिद | अध्यापक | सदस्य |
| 5 | श्री. कैलास भोसले | अध्यापक | सदस्य |
| 6 | श्रीमती रीना पांडे | अध्यापक | सदस्य |
| 7 | श्रीमती सारिका सागर | अध्यापक | सदस्य |
| 8 | डॉ. राधाकृष्ण बटुले | अध्यापक | सदस्य सचिव |





# आयक्यूएसी - गाभा समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. (डॉ.) सिद्धार्थ जबडे प्रा. | कुलगुरु | अध्यक्ष |
| 2. | (डॉ.) वासुदेव गाडे | उपाध्यक्ष | सदस्य |
| 3. | डॉ. चेतन कापडणीस | अधिष्ठाता, मानव्यविद्या आणि समाजविज्ञान | संचालक |
| 4. | प्रा. (डॉ.) केदार संत | कुलसचिव | सदस्य |
| 5. | प्रा. (डॉ.) युवराज लाहोटी | परीक्षा नियंत्रक | सदस्य |
| 6. | डॉ. प्रसाद गोखले | संचालक, संशोधन | सदस्य |
| 7. | श्री. अमोल रणदिवे | प्रमुख, उद्योग संपर्क आणि करिअर साह्य | सदस्य |
| 8. | श्रीमती रीना पांडे | संचालक, विद्यार्थी कल्याण | सदस्य |
| 9. | प्रा. (डॉ.) उमेश पटवर्धन | अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 10. | प्रा. नलिनी नाईक निंबाळकर | अधिष्ठाता, वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 11. | प्रा. (डॉ.) अवधूत अत्रे | अधिष्ठाता, आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | सदस्य |
| 12. | डॉ. नितीन सातपुते | अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 13. | श्रीमती सारिका सागर | कार्यक्रम प्रमुख, विधी विद्याशाखा | सदस्य |
| 14. | मकरंद पुरी | कार्यक्रम प्रमुख, औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 15. | प्रा. (डॉ.) कैलास पाटील प्रा. | मुख्य डिजिटल अधिकारी | सदस्य |
| 16. | (डॉ.) योगेश देशपांडे | संचालक, ई-लर्निंग केंद्र | सदस्य |
| 17. | डॉ. शीतल नाईक | संचालक, ज्ञान संसाधन केंद्र | सदस्य |
| 18. | श्रीमती राणी अडगुलवार | सहायक धर्मादाय आयुक्त | सदस्य (स्थानिक सोसायटी) |
| 19. | श्री. वासुदेव पी. बेंद्रे | द्वितीय वर्ष बीफार्म (शैक्षणिक वर्ष 2020-21) | सदस्य |
| 20. | मेघना दिघे | एलएलएम (2019-20 तुकडी) | सदस्य (माजी विद्यार्थी) |
| 21. | श्री. हर्षद भागवत | संस्थापक, वड्समाया | सदस्य (कंपनी मालक) |
| 22. | श्री. हेमंत वाटवे | व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, विलो मॅथर अँड प्लॅट | सदस्य (उद्योजक) |
| 23. | नीरज आठल्ये | व्यवस्थापकीय संचालक (भारत), एसयूएसई | सदस्य (उद्योजक) |
| 24. | शैलेश जोशी | वरिष्ठ कार्यकारी अधिकारी, कोलगेट-पामोलिव्ह (भारत) मर्यादित | सदस्य (पालक) |
| 25. | डॉ. दीपमाला पाटील | अध्यापक, औषधनिर्माणशास्त्र | समन्वयक/सदस्य सचिव |

# आयक्यूएसी – विभाग प्रमुख

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव | विद्याशाखा/विभाग | जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. चेतन कापडणीस | अधिष्ठाता, मानव्यविद्या आणि समाजविज्ञान; अधिष्ठाता, पत्रकारिता, माध्यमे आणि जनसंज्ञापन | संचालक |
| 2. | डॉ. सुखदेव इंगळे | विधी विद्याशाखा | पाठ्यक्रम संदर्भ |
| 3. | डॉ. पद्मजा काठीकर | विधी विद्याशाखा | पाठ्यक्रम संदर्भ |
| 4. | डॉ. पूनम इनामदार | औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा | अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन |
| 5. | डॉ. पश्मिन दोशी | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन |
| 6. | श्रीनिवास चिपलकट्टी | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | संशोधन, अभिनवता आणि विस्तार |
| 7. | श्री. अन्सारी जमील अहमद | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | पायाभूत सुविधा आणि अध्ययन संसाधने |
| 8. | श्रीमती सुकन्या कुलकर्णी | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | पायाभूत सुविधा आणि अध्ययन संसाधने |
| 9. | डॉ. स्वाती मुथा | औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा | विद्यार्थी साह्य आणि प्रगती |
| 10. | डॉ. श्रद्धा काजे | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | प्रशासन, नेतृत्व आणि व्यवस्थापन |
| 11. | डॉ. विद्या देसाई | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | संस्थात्मक मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती |
| 12. | डॉ. जगदीश तावडे | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | एनआयआरएफ/संशोधन, अभिनवता आणि विस्तार |
| 13. | ऐश्वर्या खडसे | वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखा | निकषनिश्चिती/विश्लेषण |
| 14. | डॉ. श्रद्धा खंपारिया | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | टीएचई रँकिंग |
| 15. | उन्मेषा पाटील | विधी विद्याशाखा | अटल रँकिंग |
| 16. | माधवी दचावार | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | ईआरपी समन्वयक/कॅम्पस व्यवस्थापन |
| 17. | श्री. शैलेश थावरे | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | ईआरपी विकसन |
| 18. | अंकिता सांगळे | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान | आयएसओ |

# विस्तारित आयक्यूएसी सदस्य

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव | विद्याशाखेचे नाव | विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | श्री. निशांत सुतारे | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | ट्रॅव्हल अँड टुरिझम |
| 2. | श्री. राहुल भारद्वाज | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | संगीत |
| 3. | अंकिता सांगळे | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | अर्थशास्त्र |
| 4. | अलिशा नागराज | मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | मानसशास्त्र |
| 5. | डॉ. ओमवीर गौतम | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | व्यवस्थापन |
| 6. | अपूर्वा भिलारे | विधी विद्याशाखा | विधी |
| 7. | श्री. अभिषेक भोसले | औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा | पत्रकारिता आणि जनसंज्ञापन |
| 8. | डॉ. प्रीती मेहता | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | औषधनिर्माणशास्त्र |
| 9. | वैशाली वाघ | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | फॅशन डिझाइन |
| 10. | श्रद्धा जाधव | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | इंटेरिअर डिझाइन |
| 11. | श्री. दीपक गिरी | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | ग्राफिक डिझाइन |
| 12. | श्री. स्वातिश थियागु | आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा | प्रॉडक्ट डिझाइन |
| 13. | अंजली रासने | वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखा | वास्तुरचनाशास्त्र |
| 14. | श्री. संदीप कुलकर्णी | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | मेकॅनिकल |
| 15. | आरती हकीम | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | स्टॅटिस्टिक्स |
| 16. | सानिका बाम | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | योग आणि निसर्गोपचार |
| 17. | डॉ. श्रद्धा खंपारिया | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | अभियांत्रिकी विज्ञान |



०७




# पायाभूत सुविधा

# भौतिक पायाभूत सुविधा

## एसएपी आय 360 लॅब

विश्वकर्मा विद्यापीठाने एसएपीच्या सहकार्याने आय 360 इनोव्हेशन लॅब उभारली आहे. प्रत्यक्ष उद्योगजगतातील समस्यांवर काम करण्यासाठीचे व्यासपीठ या निमित्ताने विद्यार्थ्यांना मिळाले आहे. 'डिजिटल तंत्रज्ञानावर काम करण्याचा चांगला अनुभव गाठीशी राहील असे भविष्यसज्ज व्यावसायिक तयार करणे, हा आय 360 केंद्राचा उद्देश आहे. केवळ उद्योगांच्याच नाही, तर राष्ट्राच्याही सध्याच्या आणि भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठीची कल्पक वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये रुजावणे असा आमचा विश्वकर्मा विद्यापीठाबरोबर सहकार्य करण्याचा उद्देश आहे.' तंत्रज्ञानसज्जतेच्या पातळीचा वेध घेऊन विद्यार्थ्यांच्या गटाने चार प्रकल्पांचा संकल्पित आराखडा तयार केला आहे. विश्वकर्मा विद्यापीठाच्या एसएपी आय360 लॅबच्या विद्यार्थ्यांनी 5 ऑक्टोबर, 2019 रोजी इतिहास रचला. झी बिझनेस 'एसएपी डेअर टू ड्रीम अवॉर्ड्स 2019' या कार्यक्रमात प्रथमच विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि प्रकल्प सादर झाले. आपल्या हटके कल्पनांनी उद्योगजगतात नवी वाट निर्माण करणारे सीईओ आणि भव्य स्वप्न पाहण्याचे धाडस करणाऱ्यांना हे पुरस्कार दिले जातात. या कार्यक्रमाला 150 सीईओ आणि उद्योजक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रकल्प कल्पनांना चांगली दाद तर मिळालीच; शिवाय त्यांची आता लवकरच उद्योगांमध्येही अंमलबजावणी होईल. यामध्ये आदरातिथ्य, वाहनउद्योग आणि सामाजिक क्षेत्रांतील प्रकल्प कल्पनांचा समावेश होता.



## विश्वकर्मा विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांचा सारांश

- संशोधन/पीएचडी विभाह
- मानसशास्त्र प्रयोगशाळा
- संगणक प्रयोगशाळा
- संगणक केंद्र
- विलो प्रयोगशाळा
- ई अँड टीसी/इलेक्ट्रिकल प्रयोगशाळा
- मेकॅनिकल प्रयोगशाळा
- टाटा प्रयोगशाळा
- एसएपी प्रयोगशाळा
- औषधनिर्माणशास्त्र प्रयोगशाळा
- चित्रकला सभागृह
- चित्र कर्मशाळा
- सुतारकाम कर्मशाळा
- लेझर कटिंग अँड थ्री-डी प्रिंटिंग
- क्ले आणि सिरॅमिक कर्मशाळा
- डाइंग आणि मुद्रण
- सीएनसी आणि मिलिंग
- हस्तकला स्टुडिओ
- धातू कर्मशाळा
- निर्मितीपश्चात कक्ष
- स्टुडिओ
- छायाचित्रण स्टुडिओ
- फॅशन स्टुडिओ
- फॅशन स्टुडिओ आणि रॅम्प
- पॅटर्न मेकिंग स्टुडिओ
- शिवण प्रयोगशाळा
- डिझाइन थिंकिंग स्टुडिओ
- एनिमेशन स्टुडिओ
- ग्रंथालय
- कार्यक्रमस्थळ
- सभागृह
- बोर्ड रूम
- क्रीडा मैदान
- खुली व्यायामशाळा
- कँटीन
- वैद्यकीय सुविधा
- एटीएम
- बँक
- रुग्णवाहिका सुविधा
- स्टेशनरी स्टोअर
- झेरॉक्स केंद्र
- योग केंद्र

## इको-कॅम्पस आणि लिव्हिंग लॅब

विश्वकर्मा विद्यापीठाला नव्या तंत्रज्ञानाच्या संशोधन आणि विकासासाठीची 'जिवंत प्रयोगशाळा' किंवा 'चाचणी केंद्र' म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. इको-कॅम्पसमध्ये दैनंदिन जीवनातील समस्यांवर उपाय असलेले, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेले प्रकल्प पाहायला मिळतात. त्याचप्रमाणे ऊर्जासंवर्धन करण्यासाठीचे उपाय सुचवून; तसेच ऊर्जा प्रतिमाने तयार करून विविध प्रकारच्या इमारतींच्या कामगिरीचे मूल्यमापनही येथे होते. विश्वकर्मा विद्यापीठाचे आवार 22 एकरांत पसरले असून, आवारात 9 पेक्षा अधिक इमारती आहेत. शैक्षणिक (तासिकांसाठीचे वर्ग, प्रयोगशाळा) आणि प्रशासकीय इमारतींव्यतिरिक्त व्यावसायिक बांधकामांमुळे आवारातील इमारत प्रकारांच्या वैविध्यात भर पडली आहे. ज्या काही नव्या इमारती उभारण्यात आल्या आहेत, त्या उभारताना अगदी त्यांच्या संरचनेपासून नियोजनापर्यंत त्यामध्ये पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

**अ. ग्रंथालय** – ग्रंथालय हा कॅम्पसचा केंद्रबिंदू आहे. येथे विविध विषयांवरील हजारो पुस्तके उपलब्ध असून, त्याचबरोबर वाचन कक्ष, चर्चा कक्ष, संदर्भ कक्ष आणि संगणक प्रयोगशाळाही आहे.



**ब. विविध सभागृहं**, परिषदांसाठीची छोटी सभागृहं; शिवाय पारंपरिक वर्ग विद्यापीठात असल्याने आवश्यकतेनुसार विविध कार्यक्रमांसाठी त्यांचा सुयोग्य वापर केला जातो. वर्गात विद्यार्थी गटांमध्ये काम करत असले, तरी प्रत्येकाकडे वैयक्तिक लक्ष देणे शक्य व्हावे, अध्ययनात त्यांचा सक्रिय सहभाग असावा, या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण रचना करण्यात आली आहे.



**क. विद्यापीठातील प्रयोगशाळा संशोधन** आणि प्रयोगांना सुयोग्य अवकाश देणाऱ्या आहेत. नियंत्रित प्रयोग करणे शक्य होण्यासाठी बाक, ओटे आणि आवश्यक उपकरणे येथे आहेत.





**ड.** नाट्यकला, संगीत, नृत्य आणि चित्रपट व दूरचित्रवाणी माध्यमांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **ललित कला केंद्र** आहे. येथील खुली आणि लवचीक वास्तुरचना नाट्यगृहाचा आनंद देणारी आहे. त्यामुळे सर्व प्रमुख सांस्कृतिक कार्यक्रम; तसेच विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम येथे आयोजित केले जातात.

**ई. दृश्यकला केंद्रात चित्रकला;** तसेच डिझाइन आणि शिल्पकला स्टुडिओ आहे. डाव्या आणि उजव्या बाजूच्या मेंदूचे महत्त्व समजून घेऊन विद्यार्थी येथे सर्जक तंत्रे शिकताना दृश्यकलेबाबतची जाणीवही विकसित करू शकतात.





**फ. ध्वनिमुद्रण** स्टुडिओमध्ये ध्वनिमुद्रण आणि ध्वनिमिश्रणाची (मिक्सिंग) सुविधा आहे. ध्वनिमुद्रणामध्ये बाहेरच्या आवाजांचा अडथळा येऊ नये, यासाठी सुयोग्य व्यवस्था आहे. या ठिकाणी एक पूर्वप्रदर्शन चित्रपटगृहही आहे, जेथे विद्यार्थी त्यांनी तयार केलेल्या चित्रपटांचे प्रदर्शन करून, त्यावर आलेल्या सूचनांनुसार आणखी सुधारणा करू शकतात.

**ग. विविध प्रकारचे सादरीकरण**, स्नेहसंमेलन किंवा अगदी वर्ग भरविण्यासाठीही खुले रंगमंच (एम्फी थिएटर) उपलब्ध आहे. सादरीकरण चांगल्या पद्धतीने पाहण्यायोग्य अशी त्याची उतरती बैठकरचना करण्यात आली आहे. या ठिकाणी गटचर्चा आणि अतिथी व्याख्यानेही होतात.





**ह.** विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बराच काळ विद्यापीठ आवारात असतात, हे लक्षात घेऊन विद्यापीठाने त्यांच्या सोयीसाठी आवारातच **एटीएम केंद्र, स्टेशनरी स्टोअर आणि उपहारगृहांची व्यवस्था** केली आहे.

**ई. क्रीडा सुविधा** – विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीचेही चांगले संतुलन साधले जावे, यासाठीही विश्वकर्मा विद्यापीठात प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांना एक तरी खेळ खेळणे सक्तीचे आहे. विद्यापीठातील 14 वेगवेगळ्या शाखांसाठी इनडोअर; तसेच मैदानी खेळांच्या आंतरइयत्ता, आंतरसंस्था अशा पातळ्यांवर स्पर्धाही आयोजित केल्या जातात.



०८



# पदवीप्रदान

## दुसरे पदवीप्रदान २०२१

**विश्वकर्मा विद्यापीठाच्या दुसऱ्या तुकडीचा पदवीप्रदान समारंभ 26 जुलै, 2021 रोजी आभासी पद्धतीने; पण दिमाखात साजरा झाला. न्यूयॉर्क राज्य विद्यापीठाच्या बिंगहॅम्टन विद्यापीठाचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) हार्वे स्टेन्गर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अग्रीकल्चरचे अध्यक्ष सुधीर मेहता सन्माननीय अतिथी होते. विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अग्रवाल  अध्यक्षस्थानी होती.**

विद्यार्थ्यांनी आयुष्यभर नवे शिकण्याची तयारी बाळगून आपल्यातील जिज्ञासा जिवंत ठेवावी आणि प्रश्न विचारत राहावेत, असे आवाहन स्टेन्गर यांनी केले. पदवीप्रदान सोहळा अतिशय हृद्य होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा महत्त्वाच्या टप्पा साजरा करण्यात आला, यशस्वितांची प्रशंसा करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

समारंभातील पदवीप्रदान मिरवणुकीचे नेतृत्व परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. युवराज लाहोटी यांनी केले. व्यवस्थापन, मानव्यविद्या, विधी आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेतील पदव्या या वेळी प्रदान करण्यात आल्या.



०९



# पाठ्यक्रम

| अनुक्रम | नियामक मंडळ | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर | बी. आर्किटेक्चर |
| २ | एआयसीटीई | बी. डिझाइन |
| ३ | एआयसीटीई | बी. टेक – कम्प्युटर, मेकॅनिकल इंजिनीअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स |
| ४ | एआयसीटीई | एमबीए |
| ५ | फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया | डी. फार्म, बी. फार्म |
| ६ | बार कौन्सिल ऑफ इंडिया | एलएलबी (3 वर्षे), बीबीए एलएलबी (एकात्मिक) 5 वर्षे |
| ७ | यूज़ीसी – १२ बी | सर्व |





# वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखा











## वास्तुरचनाशास्त्र विभाग

वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखेच्या स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंगअंतर्गत वास्तुरचनाशास्त्रातील संशोधन आणि अध्ययनासाठीचा प्रगत डिझाइन स्टुडिओ अशा पद्धतीने वास्तुरचनाशास्त्र विभाग स्थापन करण्यात आला. कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरने मान्यता दिल्यानंतर 2019 मध्ये पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाने या विभागाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना इमारत रचनेचे आवश्यक ज्ञान प्राप्त व्हावे आणि त्यात संशोधन करता यावे, अशा प्रकारे या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. या व्यवसायाच्या काळानुरुप गरजांशी सुसंगत अशा प्रकारचे वास्तुरचनातज्ज्ञ घडविण्याची आमची धडपड आहे.

### वास्तुरचनाशास्त्र पदवी अभ्यासक्रम (बॅचलर ऑफ आर्किटेक्चर)

बॅचलर ऑफ आर्किटेक्चर हा कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरने मान्यता दिलेला पाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. विविध व्याप्तींच्या आणि प्रकारांच्या परिसंस्थांची रचना करण्यासाठी आवश्यक असे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, अशा प्रकारे या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ सर्जनशील जगतात प्रवेश करण्याची क्षमता देतो असे नाही, तर सर्जक कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक ज्ञानानेही त्यांना सज्ज करतो.









# आर्ट अँड डिझाइन विद्याशाखा









## एनिमेशन विभाग

आधुनिक काळात एनिमेशन आणि व्हीएफएक्स अनेक शाखांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असून, यामध्ये करिअरच्या अनेक संधीही निर्माण होत आहेत. एनिमेशन विभाग 2017 मध्ये आर्ट अँड डिझाइन विद्याशाखेंतर्गत स्थापन करण्यात आला. या विभागातर्फे एनिमेशन अँड मल्टीमीडिया विषयातील तीन वर्षांचा पदवी आणि दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येतो. डिझाइन आणि एनिमेशन तंत्रज्ञानांमध्ये आवश्यक अशी कालसुसंगत कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावीत, अशा प्रकारे हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. एनिमेशन, मल्टीमीडिया आणि मोशन ग्राफिक्समधील सध्याचे कल समजून घेण्यावरही यात भर देण्यात आला आहे. हा विभाग अद्ययावत साधनांनी सुसज्ज असून, संगणक प्रयोगशाळा; तसेच टू-डी ग्राफिक डिझाइन, थ्री-डी एनिमेशन, स्टॉप मोशन, टू-डी एनिमेशन, छायाचित्रण, नवीन प्रयोगशील एनिमेशन, ध्वनी, व्हिडिओ संकलन व व्हीएफएक्स इत्यादी शिकता येईल, असा स्वतंत्र फिल्म स्टुडिओही विभागात उपलब्ध आहे. या उद्योगात प्रभावीपणे काम करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान शिकण्यासाठी; तसेच सर्जनशील दृष्टिकोन घडविण्यासाठी आम्ही वापरत असलेली अध्यापन पद्धत नक्कीच उपयोगी पडतील, असा आम्हाला विश्वास आहे.

### बॅचलर ऑफ आर्ट इन एनिमेशन अँड मल्टीमीडिया

प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन उद्योगाची झपाट्याने तर वाढ होतच आहे; पण त्याचबरोबर ते प्रेक्षकांशी साधत असलेल्या संवादामध्येही अनेक महत्त्वाचे बदल होत आहेत. विश्वकर्मा विद्यापीठातील बीए (एनिमेशन अँड मल्टीमीडिया) हा एक अनोखा अभ्यासक्रम आहे. एनिमेशनच्या कला आणि तंत्राचा पाया पक्का करण्यावर यामध्ये भर देण्यात आला आहे. प्रकल्प, सैद्धान्तिक संकल्पनांचे अध्यापन, चित्रपटांचे प्रदर्शन आणि त्यांचे विश्लेषण, कार्यशाळा; तसेच उद्योगजगतातील व्यावसायिकांशी संवाद अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवला जातो.

आमचा पारितोषिकप्राप्त एनिमेशन अँड मल्टिमीडिया अभ्यासक्रम इतर एनिमेशन अभ्यासक्रमांपेक्षा खूप वेगळा आहे. या अभ्यासक्रमात आम्ही ब्लॉक अध्यापन, प्रात्यक्षिके आणि तज्ज्ञांकडून संबोधित केल्या जाणाऱ्या कार्यशाळा याद्वारे अध्यापन करतो. मातीकामापासून चित्रकलेतील प्रावीण्यापर्यंत, विद्यार्थी कॅमेरा आणि सीजीआय दोन्हीची हाताळणी कशी करायची, याचे शिक्षण घेतात. चित्रपट, माहितीपट आणि शिल्पं तयार करण्यासाठी ते वैयक्तिक किंवा सांघिक काम करतात. या अभ्यासक्रमात एनिमेशनची अभिजात तंत्रे आणि अभिनव तंत्रज्ञानांचा मिलाफ असल्याने त्याचा विशेष फायदा होतो.

### मास्टर ऑफ आर्ट्स इन एनिमेशन अँड मल्टीमीडिया

मास्टर ऑफ आर्ट्स (एनिमेशन अँड मल्टीमीडिया) हा विश्वकर्मा विद्यापीठाचा दोन वर्षांचा, 82 श्रेयांकांचा (क्रेडिट्स) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे. यामध्ये एनिमेशन व ई-लर्निंग, वेब डिझाइन, टू-डी आणि थ्री-डी एनिमेशन – लाइटिंग अँड रेंडरिंग विथ स्पेशल इफेक्ट्स, डिझाइन गेम इन युनिटी प्लॅटफॉर्म यावर भर आहे.

एनिमेशन अँड मल्टीमीडिया या विषयातील विविध प्रगत दृष्टिकोन, पद्धती आणि तंत्रांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, असा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. सातत्यपूर्ण संशोधन आणि विकास, जागतिक पातळीवरील ज्ञानप्राप्ती, दर्जेदार अध्यापन, विद्यार्थ्यांसाठी साधने आणि आशयनिर्मिती; तसेच विद्यार्थ्यांना एनिमेशन आणि आयटी उद्योगात निष्णात करणे याद्वारे भारतातील एनिमेशन प्रशिक्षणाचे सर्वोत्तमता केंद्र म्हणून उदयास येणे, हे आमचे ध्येय आहे.

## फॅशन विभाग

फॅशन डिझाइन ही वस्त्राला; तसेच त्याच्या प्रावरणांना डिझाइन, सौंदर्यशास्त्र, वस्त्रकलेद्वारे नैसर्गिक सौंदर्य प्रदान करण्याची कला आहे. सन 2017 मध्ये स्थापन झालेला विश्वकर्मा विद्यापीठाचा डिझाइन विभाग हे फॅशन क्षेत्रातील शिक्षणासाठीचे पुण्यातील एक प्रतिष्ठित स्थान आहे. सध्याच्या काळातील अतिशय स्पर्धात्मक आणि वैविध्यपूर्ण अशा वस्त्ररचना उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम असलेले सर्जनशील आणि जबाबदार डिझायनर घडविणे हा या विभागाचा उद्देश आहे. या विभागात प्रकल्पाधारित अध्ययन-अध्यापन पद्धतीवर भर देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील पारंपरिक हस्तकला शिकण्यासाठी अस्सल पारंपरिक काम करणाऱ्या कारागिरांबरोबर काम करण्याचीही संधी मिळते. विभागात सुसज्ज आणि अद्ययावत असा फॅशन स्टुडिओ; तसेच डिझाइनबाबतची विचारप्रक्रिया आणि कल्पकतेला वाव देणारे सर्वोत्तमता केंद्रही (सेंटर ऑफ एक्सलन्स) आहे. विभागातर्फे विविध ठिकाणी उमेदवारीची; तसेच प्रत्यक्ष प्रकल्पावर काम करण्याची संधीही दिली जाते. वस्त्रोद्योग आणि फॅशन जगतातील सर्वोत्तम पद्धतींचा वापर करण्याबाबतचा कल्पक आणि एकात्मिक दृष्टिकोन विभागाने कायम ठेवला आहे.

### बॅचलर ऑफ आर्ट इन फॅशन अँड अपारेल डिझाइन

फॅशनच्या संदर्भातील जागतिक पातळीवरील सौंदर्यानुभवांची भारतीय मानसिकतेशी सांगड घालण्याबाबतची संवेदना तयार व्हावी, अशा प्रकारे फॅशन डिझाइन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. यामध्ये निर्यात बाजारपेठेच्या; तसेच भारतीय वस्त्रबाजाराच्या गरजांचाही विचार केला आहे. वस्त्रकलेबाबत सर्जनशीलतेला चालना देणारा; पण तरीही सर्वंकष असा दृष्टिकोन तयार व्हावा, अशी याची रचना आहे. प्रत्यक्ष काम करायला मिळत असल्याने डिझाइन संकल्पित करणे, पॅटर्न तयार करणे, नेसकाम आणि अत्यंत दर्जेदार असे कापड तयार करणे यामध्ये विद्यार्थी तरबेज होतात. या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना अस्सल देशी पारंपरिक काम करणाऱ्या कारागिरांबरोबर पारंपरिक ग्रामीण हस्तकलेचे काम प्रत्यक्ष करता येते. उमेदवारीदरम्यान भारतीय फॅशन जगतातील आघाडीच्या फॅशन उद्योगांत काम करता येत असल्याने या क्षेत्रातील ज्ञान वृद्धिंगत होण्याबरोबरच विद्यार्थ्यांना यातील आव्हानांचीही कल्पना येते. वर्षाखेरीस होणाऱ्या डिझाइन कलेक्शन सादरीकरणात विद्यार्थ्यांना मिळालेल्या वैविध्यपूर्ण ज्ञानाची आणि अनुभवांची प्रचिती प्रत्यक्ष त्यांच्या कामातूनच मिळते.

### मास्टर ऑफ आर्ट इन फॅशन अँड अपारेल डिझाइन

जगभरातील वस्त्रशैलीची भारतीय मानसिकतेशी सांगड घालण्याचा दृष्टिकोन अधिक टोकदार करण्यासाठी फॅशन डिझाइनमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या या अभ्यासक्रमात पेहरावकलेच्या पद्धतीवरही भर दिला जातो. अत्यंत दर्जेदार वस्त्रनिर्मितीसाठी आवश्यक संकल्पना, डिझाइननिर्मिती करण्याकरिता विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे काम हा अभ्यासक्रम करतो. एकात्मिक अभ्यासक्रम असल्याने अस्सल देशी पारंपरिक काम करणाऱ्या कारागिरांबरोबर काम करण्याची संधीही मिळते. विविध डिझाइन आस्थापनांत तात्पुरते काम करता करता विद्यार्थ्यांना भारतीय शैलीत असलेले वैविध्य शिकता येत असल्याने माहितीत तर भर पडतेच; शिवाय कामांत येणाऱ्या आव्हानांवर मात करण्याची दृष्टीही मिळते. पदवीप्रदानाच्या वेळी आयोजित डिझाइन कलेक्शनमध्ये प्रदर्शित होणारे विद्यार्थ्यांचे काम त्यांच्या उद्योगजगताशी जुळवून घेण्याच्या क्षमतेची चुणुक दाखवते.



## इंटेरिअर स्पेसेस विभाग

इंटेरिअर स्पेसेस विद्याशाखेच्या स्कूल ऑफ आर्ट अँड डिझाइनअंतर्गत डिझाइनमधील संशोधन आणि अध्ययनासाठी इंटेरिअर स्पेसेस विभाग स्थापन करण्यात आला. सन 2017 मध्ये हा विभाग सुरू झाला. बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाइन अँड डेकोरेशन हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम, तर मास्टर ऑफ आर्ट इन इंटेरिअर डिझाइन अँड डेकोरेशनमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम येथे राबविला जातो. संरचित परिसंस्थांची निर्मिती आणि त्यांचे अध्ययन व अंमलबजावणीतील संशोधन आदींचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, अशा पद्धतीने या विभागाची रचना करण्यात आली आहे.



### बॅचलर ऑफ आर्ट इन इंटेरिअर डिझाइन

विद्यार्थीभिमुख अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रमाचा भर आहे. तंत्रज्ञानामुळे हरघडी बदलणाऱ्या सध्याच्या जगात डिझाइनसंबंधी अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर, आमचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सर्जनशील जोखमी घेण्यास प्रोत्साहन देतो. वास्तव जगातील गरजांची पूर्तता करणाऱ्या आणि उपलब्ध जागेचा सर्वंकष अनुभव देणाऱ्या अत्यंत कल्पक रचना विद्यार्थी करतात. विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढीस लागावीत, यासाठी प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव दिली जातो; तसेच या उद्योगातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते. हा इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रम सर्जनशील असण्याची क्षमता वृद्धिंगत करण्याबरोबरच डिझाइनच्या एकापेक्षा अधिक शक्यता असलेल्या कार्यक्षम आणि सौंदर्यपूर्ण जागांची तपशीलवार रचना करण्यास उद्युक्त करणारा आहे. या अत्यंत स्पर्धात्मक अशा अभ्यासक्रमात पाठ्यक्रमाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांची रुची आणि सातत्य तपासण्यासाठी मूल्यमापन केले जाते. विद्यार्थ्यांनी डिझाइन व्यवसायात शिरताना अत्यंत कठोर कार्यसंस्कृती जोपासावी आणि सर्वंकष अध्ययन गाठीशी असावे, या दृष्टीने आम्ही या डिझाइन महाविद्यालयात विद्यार्थी घडवतो. विद्यार्थ्यांच्या आवडीला तांत्रिकता, डिझाइन प्रक्रिया आणि स्टुडिओचे तंत्राच्या सखोल अभ्यासाची जोड आमच्या इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रमात अध्यापनाद्वारे दिली जाते. अध्ययन करणारे जुळवून घेणारे आणि सातत्याने उत्क्रांत होत असलेल्या भविष्यात दिशा गवसण्याएवढे ज्ञानसुसज्जही असतात.

### मास्टर ऑफ आर्ट इन इंटेरिअर डिझाइन

विश्वकर्मा विद्यापीठाचा एमए इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना डिझाइन उद्योगातील वरिष्ठ पदासाठी तयार करतो. इंटेरिअर्ससाठीचे नवे तंत्रज्ञान शिकणे, नवे ट्रेंड शिकणे आणि त्याबाबत सजग राहणे; तसेच विविध संस्कृतींसाठी इंटेरिअर तयार करणे आदी बाबी एमए इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रमाचा भाग आहेत. इंटेरिअर स्पेसेसची सर्जनशील बांधणी आणि संकल्पनेचे योग्य प्रदर्शन कसे करायचे याची दृष्टी विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमातून मिळेल. एमए इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रमात विद्यार्थीभिमुख अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर भर देण्यात आला आहे. सर्वंकष अशा या इंटेरिअर डिझाइन अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना त्यांचे डिझाइन ज्ञान आणि कौशल्ये वृद्धिंगत करण्यासाठी पुरेसा वैविध्यपूर्ण अनुभव दिला जातो.

## डिझाइन विभाग

विश्वकर्मा विद्यापीठातील डिझाइन विभागातील डिझाइन शिक्षण सर्वसमावेशक आणि डिझाइन शिक्षण, डिझाइन संशोधन आणि डिझाइन पद्धती यांचा मिलाफ असलेले आहे. डिझाइनमधील अध्यापनपद्धती संशोधनातील विविध आयाम; तसेच स्थापित प्रक्रियांमधील कल्पकतेचा वेध घेते. या विभागातील सर्जनशील पद्धती हात, मन आणि डोळे यांतील पक्का बंध अधिक दृढ करतात. संकल्पनात्मक विचार, कौशल्ये आणि कलात्मकतेद्वारे कल्पना प्रत्यक्ष अनुभवात परावर्तित होणे, ही डिझाइनप्रती असलेल्या समीक्षात्मक दृष्टिकोनाची मागणी असते. शिक्षण, उद्योग आणि सरकारी संस्थांमध्ये दीर्घकालीन संवाद निर्माण व्हावा, असाही या विभागाचा प्रयत्न आहे.

### बॅचलर ऑफ डिझाइन इन ग्राफिक डिझाइन/प्रॉडक्ट डिझाइन/युजर एक्स्पीरिअन्स डिझाइन

विद्यार्थ्यांनी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन ठेवून भविष्यासाठीची दृष्टी तयार करावी, असा विश्वकर्मा विद्यापीठाच्या आर्ट अँड डिझाइन विद्याशाखेच्या बी.डिझाइन अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. या अभ्यासक्रमांतर्गत ग्राफिक डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन आणि युजर एक्स्पीरिअन्स डिझाइन या तीन विषयांतील पदव्या प्रदान केल्या जातात. डिझाइन ही निरीक्षण, प्रयोगशीलता आणि निर्मितीची सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. विश्वकर्मा विद्यापीठातील डिझाइन विभागातील डिझाइन शिक्षण सर्वसमावेशक आणि डिझाइन शिक्षण, डिझाइन संशोधन आणि डिझाइन पद्धती यांचा मिलाफ असलेले आहे. दृश्ये, मजकूर, रंग आणि चिन्हे यांचा मिलाफ करुन निर्मिलेल्या कल्पनांद्वारे डिझायनर संवाद साधत असतात.

संकल्पनात्मक विचार, कौशल्ये आणि कलात्मकतेद्वारे कल्पना सौंदर्यपूर्ण कामांत परावर्तित व्हाव्यात, अशी या अभ्यासक्रमाची अपेक्षा आहे. समस्यांचे सर्जनशीलतेने निवारण व्हावे आणि उद्योगामध्ये कल्पकतेला प्रोत्साहन मिळावे, असा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. शिक्षण, उद्योग आणि सरकारी संस्थांमध्ये दीर्घकालीन संवाद निर्माण व्हावा, असाही या अभ्यासक्रमाचा प्रयत्न आहे.

### मास्टर ऑफ डिझाइन इन ग्राफिक डिझाइन/प्रॉडक्ट डिझाइन/युजर एक्स्पीरिअन्स डिझाइन

समस्यांचे सर्जनशील निवारण व्हावे आणि उद्योगात कल्पकतेचे प्रतिबिंब उमटावे, यासाठी विद्यार्थ्यांमधील ज्ञान, कौशल्ये, क्षमता आणि कल वृद्धिंगत करण्यास प्रोत्साहन देणे, असा विश्वकर्मा विद्यापीठाच्या मास्टर ऑफ डिझाइन अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. शिक्षण, उद्योग आणि सरकारी संस्थांमध्ये दीर्घकालीन संवाद निर्माण व्हावा, असाही या अभ्यासक्रमाचा प्रयत्न आहे. या अभ्यासक्रमांतर्गत ग्राफिक डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन आणि युजर एक्स्पीरिअन्स डिझाइन अशी तीन स्पेशलायझेशन उपलब्ध आहेत.

दृश्यात्मकदृष्ट्या मोहक; पण कळायला सोपा अशा पद्धतीचा संदेश तयार करण्यासाठी दृश्यात्मक उतरंड, नकाशे आणि चित्रे यांवर ग्राफिक डिझाइन अभ्यासक्रमात भर दिला जातो.

प्रॉडक्ट डिझाइन अभ्यासक्रमात आम्ही विद्यार्थ्यांना त्यांच्या डिझाइन कल्पना आणि विचार सूत्रबद्ध करण्यासाठी विविध डिझाइन कौशल्ये आणि विचारप्रक्रियांनी सुसज्ज करतो.

डिझाइनचा अनुभव अधिक समृद्ध व्हावा, यासाठी विद्यार्थ्यांना विविध डिजिटल आणि संशोधन साधनांची; तसेच आवश्यक आणि सर्जक संकल्पनांची ओळख युजर एक्स्पीरिअन्स डिझाइन अभ्यासक्रमाद्वारे करून दिली जाते.







# वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा






## वाणिज्य आणि व्यवस्थापन

विविध विद्याशाखांतील विद्यार्थी आणि शिक्षकांना देशातील उद्योगक्षेत्राच्या सध्याच्या गरजांशी सुसंगत सर्वोत्तम अध्ययन अनुभव देणारा भविष्यवेधी असा हा विभाग आहे. प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण, थेट कॉर्पोरेट जगतातील तज्ज्ञांकडून दिले जाणारे धडे, बाजारांचे आकलन यांवर अभ्यासक्रमांत भर दिला जातो. विद्यार्थ्यांना येथे त्यांच्या कामात सर्वोत्तम कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच वाणिज्य आणि उद्योगक्षेत्रांत उत्तम नोकऱ्या मिळविण्यासाठी सक्षम केले जाते. या विभागाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक घटकाचा उत्कर्ष साधण्याच्या उद्देशाने विश्वकर्मा विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागात संशोधन, अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेत अधिक सुधारणा करण्यावर भर दिला जातो.

### बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन

बीबीए या पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना बिझनेस व्यवस्थापनातील विपणन, मनुष्यबळ विकास, वित्त, कार्यपरिचलन, पुरवठा साखळी आणि इतर कार्यकारी क्षेत्रांतील आवश्यक ज्ञान दिले जाते.

विद्यार्थ्यांना विविध विषयांतून स्पेशलायझेशनचे विषय निवडण्याची मुभा बीबीए अभ्यासक्रम देतो. यामुळे सर्वसाधारण बीबीए पदवी किंवा कोणत्या तरी एका विषयात स्पेशलायझेशन असलेली बीबीए पदवी मिळविण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. वर्गात दिले जाणारे शिक्षण आणि जोडीने प्रात्यक्षिकांवर भर (केस स्टडीज, इंटर्नशिप्स, प्रकल्प, उद्योगभेटी, उद्योगातील तज्ज्ञांबरोबर संवाद इ.) यामुळे बीबीएच्या विद्यार्थ्यांना आधुनिक साधने आणि तंत्रं शिकायला मिळतात; तसेच व्यवस्थापन कौशल्येही आत्मसात करता येतात.




## बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन – इंटरनॅशनल बिझनेस

विद्यार्थ्यांना जगभरातील विविध बिझनेस व्यवस्थापन पद्धतींचे आकलन व्हावे; तसेच त्यांची परदेशातील कंपनीत किंवा जागतिक पातळीवर काम करणाऱ्या व्यवसायात करिअर करण्याची तयारी व्हावी, अशा उद्देशाने बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस) या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बिझनेस व्यवहारांतील उत्तम करिअरसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे यासाठीचा हा विशेषत्वाने तयार केलेला व्यवस्थापन अभ्यासक्रम आहे.

बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस) या अभ्यासक्रमात एखाद्या कंपनीच्या आंतरराष्ट्रीय व्यवसाय संधींवर पडणाऱ्या जागतिक प्रभावांचा अभ्यास करता येतो. हा अभ्यासक्रम व्यूहरचना, संघटन, धोरणे, पद्धती आणि व्यवसाय कार्ये याबाबतचा दृष्टिकोन तयार करतो; तसेच यासाठी आवश्यक वैधानिक आणि नियामक प्रक्रिया, निकषपूर्ती आणि दस्तावेजीकरण याबाबतचे आकलन वाढविण्यासही हातभार लावतो. आंतरराष्ट्रीय ग्राहक, पुरवठादार, भागीदार आणि सहकाऱ्यांबरोबर संवाद कसा साधायचा, याचीही माहिती बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस) अभ्यासक्रमात मिळते. जागतिक विद्यार्थ्यांबाबतचा दृष्टिकोन घडविण्याबरोबरच त्यांना एनिमेशन आणि माहिती तंत्रज्ञान उद्योगात निष्णात बनवतो.

## बॅचलर ऑफ कॉमर्स इन कंपनी सेक्रेटरी

कंपनी सेक्रेटरी हे कंपनीतील एक महत्त्वाचे पद आहे. सीएस हा कंपनीचा नैतिक आवाज असतो. कंपनीचे करविवरण भरणे, नोंदी ठेवणे, संचालक मंडळाला सल्ला देणे आणि कंपनी सर्व कायदेशीर आणि वैधानिक नियमांचे पालन करत असल्याची खात्री करणे अशी सीएसची जबाबदारी असते. कंपनी विधेयक, 2013 लागू झाल्याने कंपनी सेक्रेटरी पदाची व्याप्ती, खोली, अधिकार आणि मागणीही वाढली आहे.

विश्वकर्मा विद्यापीठातील बीकॉम इन कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रम हा विशेष अभ्यासक्रम आहे.

वित्त, कररचना, लेखापरीक्षण आणि निकषपूर्ती याबाबतची संकल्पनात्मक स्पष्टता असलेले पदवीधर तयार करणे असा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाच्या कंपनी सेक्रेटरी पात्रतेसाठीचा पक्का पाया याद्वारे तयार होतो. बीकॉम (कंपनी सेक्रेटरी) हा बीकॉम आणि सीएस अभ्यासक्रमांचा अतिशय योग्य असा मिलाफ आहे. सीएसचे विषय बीकॉम पाठ्यक्रमात कुशलतेने गुंफण्यात आले आहेत. एखाद्या कार्यक्षम प्रशासकासाठी आवश्यक कौशल्ये शिकणे हे कंपनी सेक्रेटरी अभ्यासक्रमाचा महत्त्वाचे अंग असते. या अभ्यासक्रमात असलेले मूलभूत कौशल्ये, विषयाचे आकलन आणि तज्ज्ञता यांचे मिश्रण सातत्याने बदलणाऱ्या व्यावसायिक पर्यावरणाशी जुळवून घेणे सुकर करते.

## मास्टर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन

व्यवसायातील कार्यकारी घटकांच्या आवश्यक ज्ञानाच्या जोडीने बिझनेसबाबतचा सर्वंकष दृष्टिकोन तयार करण्याच्या उद्देशाने एमबीए अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. व्यवस्थापकीय आणि व्यावसायिक निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक विश्लेषणात्मक कौशल्ये, संवाद कौशल्ये, डेटा व्यवस्थापन आणि समस्यानिवारण कौशल्ये विकसित करणे यावर या अभ्यासक्रमात भर आहे. संकल्पनात्मक व्यावसायिक ज्ञान आणि व्यवस्थापन तंत्रांचे प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारांत उपयोजन करण्याचा उद्देश यात आहे.

खऱ्या अर्थाने बहुविद्याशाखीय पर्यावरणात सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक अध्ययन करता यावे, ज्यायोगे विविध विषयांमधील बंध आणि एकूणच अध्ययनाला प्रोत्साहन मिळावे, याची या अभ्यासक्रमात खातरजमा करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगताचा सर्वोत्तम अनुभव मिळावा, अशी एमबीए अभ्यासक्रमाची रचना आहे. व्यवसायाचे जागतिक दृष्टिकोन समजून घेण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशीलता निर्माण व्हावी, अशीही ही रचना आहे. वर्गातील शिक्षण त्यांना, त्यांनी निवडलेल्या स्पेशलायझेशन विषयातील उद्याचे नेते होण्यासाठी सक्षमही करते.








# मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा











## मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र विषयातील पदव्युत्तर स्पेशलायझेशन अभ्यासक्रमांसाठी मानसशास्त्र विभाग 2017 मध्ये स्थापन करण्यात आला. आजघडीला देशभरातील 150 हून अधिक विद्यार्थी या विभागात मानसशास्त्र विषयाचा पदवी वा पदव्युत्तर अभ्यासक्रम करीत आहेत.

या विभागात मानसशास्त्रीय प्रयोगांसाठीची सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल सुविधा आणि मानसशास्त्र विषयातील विविध स्पेशलायझेशन असलेला शिक्षकवर्ग उपलब्ध आहे. समाजाला मानसशास्त्र विषयातील सर्वोत्तम व्यावसायिक मिळावेत यासाठी हा विभाग काम करतो. त्यासाठी विभागाने संशोधनपूरक आणि सामाजिकदृष्ट्या सजग असा दृष्टिकोन विकसित केला आहे.

### बॅचलर ऑफ आर्ट (ऑनर्स) इन सायकॉलॉजी

बीए इन सायकॉलॉजी या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मानसशास्त्र, त्यातील विविध शाखा, विविध विचारपंथ, या विषयातील अलीकडच्या काळातील ट्रेंड, सैद्धान्तिक; तसेच उपयोजित संधी आणि संशोधनपद्धती यांची ओळख करून देण्यात येते. विद्यार्थ्यांना निरीक्षण कौशल्ये, संवाद कौशल्ये, सक्रिय श्रुत कौशल्ये आणि मानवी नातेसंबंध आकलन कौशल्ये शिकवण्यावर येथे भर दिला जातो. विद्यार्थी या मानसशास्त्रीय तत्त्वांचा विविध ठिकाणी प्रभावी वापर करु शकतात.

बीए सायकॉलॉजी या अभ्यासक्रमात सैद्धान्तिक संकल्पनांचा पाया पक्का करण्याबरोबरच त्याचे उपयोजनही शिकवले जाते. त्याचप्रमाणे मानसशास्त्रातील ताज्या घडामोडींचीही ओळख करून दिली जाते. विद्यार्थ्यांना विविध मानसशास्त्रीय प्रक्रियांचे मूल्यमापन करता यावे, विचार आणि निरीक्षणशक्ती वाढावी, असाही या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे.

### मास्टर ऑफ आर्ट इन सायकॉलॉजी

एमए सायकॉलॉजी हा अभ्यासक्रम मानसशास्त्रीय संशोधन अभ्यास करण्यासाठी एखाद्या माहितीची संरचना, विश्लेषण आणि अन्वयार्थ लावण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करतो. मानसशास्त्रातील संशोधन आणि उपचार पद्धतीचा समावेश असलेले उच्च पातळीचे उपयोजित, सक्रिय अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देणे हेही या अभ्यासक्रमाचे एक अविभाज्य अंग आहे. अतिशय पक्का संशोधन दृष्टिकोन आणि प्रत्यक्ष अनुभव असलेला शिक्षकवर्ग विश्वकर्मा विद्यापीठात मानसशास्त्र शिकवत असल्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक जडणघडण होतानाच, त्यांना उपचार पद्धतींचे प्रशिक्षणही मिळते.

विद्यार्थ्यांना उपचारपद्धती, समुपदेशन आणि औद्योगिक उपयोजन यातील सैद्धान्तिक; तसेच प्रात्यक्षिक ज्ञान मिळावे अशी या अभ्यासक्रमाची रचना आहे. विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी मिळू शकणाऱ्या उमेदवारीच्या संधींमुळे (इंटर्नशिप) प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभवही मिळतो. मानसशास्त्रीय संशोधन अभ्यास करण्यासाठी आवश्यक संशोधनपूरक ज्ञान आणि मार्गदर्शन मिळत असल्याने, एखाद्या माहितीची संरचना, विश्लेषण आणि अन्वयार्थ लावण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध पाठविण्यासाठीही आम्ही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतो.

# ट्रॅव्हल अँड टुरिझम विभाग

विश्वकर्मा विद्यापीठात 2018 मध्ये ट्रॅव्हल अँड टुरिझम विभाग सुरु झाला. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी, या दृष्टीने आम्ही त्यांना घडवतो. परकीय संस्कृती, परकीय भाषा आणि जागतिक इतिहासाची ओळख त्यांना करून दिली जाते. वर्गाबाहेरही शिकता येते, यावर आमचा विश्वास असून, उद्योगसज्ज होण्यासाठी विद्यार्थ्यांना आम्ही प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याच्या विविध संधी उपलब्ध करून देतो.

## बॅचलर ऑफ आर्ट इन ट्रॅव्हल अँड टुरिझम

बीए इन ट्रॅव्हल अँड टुरिझम हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. या क्षेत्रातील आकर्षक करिअरसंधींसाठी आवश्यक कौशल्ये आणि या उद्योगाचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, अशी याची रचना करण्यात आली आहे. देशांतर्गत आणि परदेशी पर्यटन ही एक महत्त्वाची आर्थिक घडामोड बनली आहे. हा एक वेगाने वाढणारा उद्योग असून, त्यामध्ये काम करण्यासाठी अत्यंत व्यावसायिक दृष्टिकोन लागतो. ट्रॅव्हल अँड टुरिझम क्षेत्रात यशस्वी करिअर करण्यासाठीची सुयोग्य चौकट हा अभ्यासक्रम उपलब्ध करून देतो. देशांतर्गत आणि परदेशी पर्यटन वाढत असल्याने या क्षेत्रात खरोखरच अनेक करिअरसंधी वाट पाहत आहेत.



विश्वकर्मा विद्यापीठातील बीए अभ्यासक्रम वेगाने वाढणाऱ्या ट्रॅव्हल अँड टुरिझम क्षेत्रातील असंख्य करिअरसंधींची दारे विद्यार्थ्यांना खुली करतो. या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांना ट्रॅव्हल एजन्सी, सरकारी पर्यटन विभाग, सहल संचलन, इमिग्रेशन आणि कस्टम सेवा, विमानवाहतूकसेवा, हॉटेल आदी अनेक ठिकाणी काम करणे शक्य आहे.

## मास्टर ऑफ आर्ट इन ट्रॅव्हल अँड टुरिझम

एमए इन ट्रॅव्हल अँड टुरिझम हा पदवीधरांना पर्यटन आणि सहल उद्योगातील विशेषज्ञ आणि व्यवस्थापकीय पदांवर काम करण्यास पात्र ठरण्यासाठी उपयुक्त ठरणारा अभ्यासक्रम आहे. सातत्याने विस्तारणाऱ्या पर्यटन उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी शिकावे लागणारे मूलभूत विषय आणि काही अतिरिक्त विषयही या अभ्यासक्रमात शिकवले जातात. पर्यटन हा केवळ एखाद्या व्यक्तीच्या विरंगुळ्यापुरता मर्यादित असा विषय नसून, ते एखाद्या देशाच्या आर्थिक उन्नतीतही महत्त्वाची भूमिका बजावणारे क्षेत्र आहे. यातून महसुलाला मोठा फायदा होतो; तसेच देशाच्या देशांतर्गत सकल उत्पन्नातही (जीडीपी) भर पडते. विद्यापीठातील एमए अभ्यासक्रम ट्रॅव्हल अँड टुरिझमसारख्या झपाट्याने विस्तारणाऱ्या क्षेत्रात असंख्य करिअरसंधी उपलब्ध करून देतो. यामध्ये पर्यटन आणि आदरातिथ्य उद्योग आणि व्यवसाय प्रशासनाच्या विविध बाबींचाही समावेश होते.

## ट्रॅव्हल अँड टुरिझम विभाग



अर्थशास्त्र विभागाची सुरुवात 2018 मध्ये झाली. अर्थशास्त्र सिद्धान्त, गेम थिअरी, वर्तणूक अर्थशास्त्र, प्रायोगिक अर्थशास्त्र, सूक्ष्मअर्थशास्त्र, नाणिक अर्थशास्त्र, आर्थिक वृद्धी, विकास अर्थशास्त्र; तसेच उपयोजित सूक्ष्मअर्थशास्त्र अशा अर्थशास्त्रातील विविध प्रकारांत संशोधन आणि अध्यापनात रुची असलेला शिक्षकवर्ग या विभागात शिकवतो. या विभागात अर्थशास्त्राबरोबरच अर्थशास्त्र आणि वित्त, अर्थशास्त्र आणि इतिहास, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान असे आंतरविद्याशाखीय विषय स्पेशलायझेशनचे विषय म्हणून शिकता येतात.

### बॅचलर ऑफ सायन्स इन इकॉनॉमिक्स

विश्वकर्मा विद्यापीठातील बीएस्सी इकॉनॉमिक्स हा 3 वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. अर्थशास्त्राबरोबरच संख्याशास्त्रीय आणि गणितीय साधनांचे आवश्यक कौशल्याधारित ज्ञान या अभ्यासक्रमाद्वारे दिले जाते. अर्थव्यवस्था, व्यवसाय, सार्वजनिक धोरण आणि समाजाशी संबंधित समस्यांचे विद्यार्थ्यांना साक्षेपी विश्लेषण करता यावे, अशा रीतीने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

अर्थशास्त्रातील तांत्रिक ज्ञान, निर्णयक्षमता आणि व्यवस्थापकीय क्षमता आत्मसात करून विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट जगतात प्रवेश करावा, अशा पद्धतीने आम्ही त्यांची तयारी करून घेतो. बीएस्सी इकॉनॉमिक्स अभ्यासक्रमाचा हा अविभाज्य भाग आहे. अर्थव्यवस्थेचे तांत्रिक आणि परिचलनात्मक घटक आणि अर्थव्यवस्थेचा इतर शाखांशी असलेला आंतरसंबंध याचे विस्तृत ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, याची आम्ही काळजी घेतो.

पुढे जाऊन पदव्युत्तर किंवा डॉक्टरल स्वरूपाचे उच्च शिक्षण घेता यावे, यासाठीचे व्यासपीठ तयार करून देण्यावर या अभ्यासक्रमाचा भर आहे. उद्योगजगत, वित्तीय, शैक्षणिक संशोधन आणि कृषी क्षेत्रात मिळवलेले ज्ञान पदवीधर पुढे वापरु शकतात.

### मास्टर ऑफ सायन्स इन इकॉनॉमिक्स

विद्यार्थ्यांना गणितीय आणि संख्याशास्त्रीय साधनांच्या साह्याने अर्थशास्त्रातील उत्तम करिअरसंधींसाठी तयार करण्याचे या विशेष अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट आहे. निर्णयप्रक्रिया आणि धोरणनिर्मितीसाठी अर्थशास्त्र ही मूलभूत विद्याशाखा आहे. या अभ्यासक्रमातील वर्णनात्मक आणि अन्वयार्थक घटक हे सध्याच्या जगात जवळपास सर्वच क्षेत्रांतील वृद्धीसाठी आवश्यक असलेला पाया तयार करण्यासाठी उपयुक्त असून, यामुळे शिक्षण क्षेत्रापासून व्यवसाय विश्लेषण क्षेत्रातील अपारंपरिक रोजगारसंधी उपलब्ध होऊ शकतात. एमएस्सी इकॉनॉमिक्स अभ्यासक्रमाचा भर आर्थिक सिद्धान्त आणि त्याच्या वास्तव जगतातील उपयोजनावर आहे. विद्यार्थ्यांना पदवीनंतर उत्तमोत्तम करिअरसंधी किंवा पोस्ट डॉक्टोरल अभ्यास करण्याच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यावरही अभ्यासक्रमाचा भर आहे. अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थी सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक कौशल्यांचा वापर करण्यास सक्षम होतील. अर्थव्यवस्थेचे तांत्रिक आणि परिचलनात्मक घटक आणि अर्थव्यवस्थेचा इतर शाखांशी असलेला आंतरसंबंध याचे विस्तृत ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, याची आम्ही काळजी घेतो. उद्योगजगत, वित्तीय, शैक्षणिक संशोधन आणि कृषी क्षेत्रात मिळवलेले ज्ञान पदवीधर पुढे वापरु शकतात.

## संगीत विभाग

विश्वकर्मा विद्यापीठात लक्ष्मीनारायण ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलन्सच्या सहकार्याने 2019 मध्ये स्कूल ऑफ म्युझिकचा प्रारंभ झाला. जागतिक दृष्टिकोन असलेले सर्वंकष संगीत शिक्षण देणे असा याचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी या क्षेत्राला आवश्यक कौशल्ये विकसित व्हावीत; तसेच जागतिक पातळीवर दखल घेतली जाईल, अशी पात्रता निर्माण व्हावी, अशा पद्धतीने या विभागात विद्यार्थ्यांना घडवले जाते.

विद्यार्थ्यांना व्यावसायिक कलाकार आणि तज्ज्ञांकडून हिंदुस्तानी, कर्नाटक अभिजात संगीत, तालवाद्ये आणि पाश्चात्य संगीतातील प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवाजाची, सादरीकरण कलेची आणि शैलीची ओळख करून देणे हे या विभागातील शिक्षणाचे अविभाज्य अंग आहे. भारतीय आणि जागतिक संगीतप्रवाहांचा उत्तम संगम या विभागाद्वारे विद्यार्थ्यांसमोर खुला केला जात असल्याने त्यांच्या सादरकर्ते, वादक म्हणून होत असलेल्या सांगीतिक करिअरला प्रोत्साहन मिळते.



### बॅचलर ऑफ आर्ट (ऑनररी) इन म्युझिक

लक्ष्मीनारायण ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलन्सच्या सहकार्याने सुरु असलेला बीए (ऑनर्स) इन म्युझिक हा 3 वर्षांचा पदवी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर ज्याची दखल घेतली जाऊ शकेल, अशी कालसुसंगत कौशल्ये आत्मसात करण्याची तयारी करून घेतो. विद्यार्थ्यांना तीन वर्षांच्या कालावधीत हिंदुस्तानी, कर्नाटक अभिजात संगीत, तालवाद्ये आणि पाश्चात्य संगीताच्या प्रशिक्षणासह जागतिक संगीताचीही दृष्टी दिली जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवाजाची, सादरीकरण कलेची आणि शैलीची ओळख करून देणे हे बीए (ऑनर्स) म्युझिक अभ्यासक्रमाचे अविभाज्य अंग आहे. भारतीय आणि जागतिक संगीतप्रवाहांचा उत्तम संगम या संस्थेद्वारे विद्यार्थ्यांसमोर खुला केला जात असल्याने त्यांच्या सादरकर्ते, वादक म्हणून होत असलेल्या सांगीतिक करिअरला प्रोत्साहन मिळते.

### बीए म्युझिक अभ्यासक्रमात या तीन वैशिष्ट्यांचा समावेश आहे...

प्रात्यक्षिक : व्यावसायिक संगीत क्षेत्रात पाऊल ठेवताना मिळालेल्या शिक्षणाचे प्रत्यक्ष उपयोजन करता यावे, अशाप्रकारे या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमातील शिक्षणात मुख्य भर सादरीकरण आणि नव्या युगातील सांगीतिक ज्ञानावर आहे. त्या-त्या विषयातील प्रात्यक्षिक आणि सर्वसमावेशक ज्ञानामुळे विद्यार्थ्यांची व्यावसायिक संधी मिळविण्यासाठीची परिपूर्ण तयारी होती.

संतुलित पाठ्यक्रम : संगीतातील सर्व शाखांप्रती या अभ्यासक्रमाचा संतुलित दृष्टिकोन आहे. हिंदुस्तानी आणि कर्नाटक अभिजात संगीत, तालवाद्ये, पाश्चात्य संगीत याबरोबरच ध्वनी आणि चित्रफित अभियांत्रिकी, डिजिटल मार्केटिंग अशा एकविसाव्या शतकातील आवश्यक साधनांच्या शिक्षणावरही सारखाच भर देण्यात येतो.

जागतिक दृष्टिकोन : पाठ्यक्रमात असलेला जागतिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना भारतीय आणि जागतिक संगीत पूर्णतः अनोख्या पद्धतीने शिकण्याची, आत्मसात करण्याची आणि अनुभवण्याची संधी देतो. सादरकर्ते, वादक किंवा संगीत क्षेत्रातील कोणतेही व्यावसायिक होण्याकरिता हे आवश्यक आहे.












# विधी आणि प्रशासन विद्याशाखा









## प्रशासन विभाग

विधी विद्याशाखेच्या स्कूल ऑफ लॉ अँड गव्हर्नन्सअंतर्गत 2018 मध्ये विधी संशोधन आणि शिक्षण केंद्र म्हणून विधी विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागात आधी एक वर्षाचा एलएलएम अभ्यासक्रम, पीएचडी अभ्यासक्रम आणि नंतर पाच व तीन वर्षांचे पदवी अभ्यासक्रम 2019 मध्ये सुरु झाले. या अभ्यासक्रमांना बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून मान्यता मिळाली आहे. शैक्षणिक कामगिरी, निष्णात संशोधन या मूल्यांची जपणूक आम्ही करतो. सर्वोत्तम विधी व्यावसायिक तयार करण्याचे आमचे ध्येय आहे.

### बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन – बॅचलर ऑफ लॉ

बीबीए-एलएलबी हा विधी शाखेतील एकात्मिक स्वरुपाचा पाच वर्षांचा अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमात बिझनेस एडमिनिस्ट्रेशन आणि मूलभूत कायद्यांचे ज्ञान प्रदान केले जाते. यामध्ये अशा सर्व कायदा अभ्यासांचा समावेश आहे, ज्याचा उपयोग त्यांना विधी व्यावसायिक म्हणून काम करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

या पाठ्यक्रमांतर्गत वैकल्पिक विषय दिले जातात. याद्वारे विद्यार्थ्यांना घटना कायदा, व्यवसाय आणि आंतरराष्ट्रीय व्यापार कायदे, दंडविधान कायदे आणि सायबर कायदा, आंतरराष्ट्रीय कायदा आणि आयपीआर यातील स्पेशलायझेशन करण्याचीही संधी मिळते. विद्यार्थ्यांना कायद्याचे योग्य उपयोजन करून कायदा समस्या सोडविता येण्यास सक्षम करणे, हा देशातील एक आघाडीचे विधी महाविद्यालय म्हणून आमचा प्रयत्न आहे.

### बॅचलर ऑफ लॉ

एलएलबी हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत कायद्यांचे आवश्यक ज्ञान मिळावे आणि त्यांनी कुशल विधी व्यावसायिक व्हावे, यावर या अभ्यासक्रमाचा भर आहे. विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण करुन विविध सार्वजनिक; तसेच खासगी क्षेत्रांत काम करु शकतात.

या पाठ्यक्रमांतर्गत वैकल्पिक विषय दिले जातात. याद्वारे विद्यार्थ्यांना घटना कायदा, व्यवसाय आणि आंतरराष्ट्रीय व्यापार कायदे, दंडविधान कायदे आणि सायबर कायदा, आंतरराष्ट्रीय कायदा आणि आयपीआर यातील स्पेशलायझेशन करण्याचीही संधी मिळते. विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांतील प्रश्न, माध्यम कायदे, शेती उद्योगांतील कायदे आदींतील सध्याचे ट्रेंड आत्मसात करता यावेत, अशी या पाठ्यक्रमाची रचना आहे. भारतीय कायदा व्यवस्था, त्याची तात्त्विक बैठक आणि सैद्धान्तिक संकल्पना यांचे विद्यार्थ्यांना चांगले आकलन होईल, असे या अभ्यासक्रमाचे स्वरुप आहे.

### मास्टर ऑफ लॉ

मास्टर ऑफ लॉज (एलएलएम) हा एक वर्षाचा पूर्ण वेळ अभ्यासक्रम आहे. दंडविधान कायदा, व्यावसायिक कायदे, आंतरराष्ट्रीय कायदे आणि लवाद, सायबर कायदा आणि बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) कायदा अशा विविध विषयांत या अभ्यासक्रमांतर्गत स्पेशलायझेशन करणे शक्य आहे. तज्ज्ञ शिक्षकवर्ग आणि संशोधनपूरक अध्यापन यामुळे विश्वकर्मा विद्यापीठातील एलएलएम अभ्यासक्रम इतरांपेक्षा वेगळा ठरतो. कायद्याचे ज्ञान संपादन करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन दृष्टिकोन रुजविण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे.

एलएलएम अभ्यासक्रम विश्लेषणात्मक विचारप्रक्रियेबरोबरच प्रश्न विचारण्याची क्षमताही विकसित करतो. विद्यार्थ्यांना आम्ही सामाजिकदृष्ट्या सुसंगत समस्यांवर संशोधन करण्यास उद्युक्त करतो. विद्यार्थ्यांमध्ये विधी कौशल्ये, विश्लेषणात्मक मूल्यमापन, संशोधन आणि सादरीकरण कौशल्ये विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे.





# माध्यमे आणि जनसंज्ञापन विद्याशाखा













## माध्यमे आणि जनसंज्ञापन विभाग

माध्यमे आणि जनसंज्ञापन विभाग 2017 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्थापन झाला. या विभागात माध्यमांतील दोन पूर्ण वेळ अभ्यासक्रम चालवले जातात. त्यामध्ये तीन वर्षांचा पूर्ण वेळ बॅचलर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन आणि दोन वर्षांचा पूर्ण वेळ मास्टर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. पत्रकारितेचे अभ्यासक्रम युनेस्कोने नेमलेल्या पाठ्यक्रमानुसार आहेत. जाहिरात आणि नवमाध्यमे ही इतर दोन स्पेशलायझेशनही पदवी स्तरावर उपलब्ध आहेत. पदव्युत्तर स्तरावर पत्रकारिता, जाहिरात आणि माध्यम निर्मिती अशी स्पेशलायझेशन उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून हे अभ्यासक्रम शिकवले जातात. या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना अद्ययावत दृकश्राव्य स्टुडिओमध्ये प्रात्यक्षिके करता येतात.

### बॅचलर ऑफ आर्ट इन जर्नलिझम अँड कम्युनिकेशन

बीए इन जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांना पत्रकारिता, जाहिरात आणि मनोरंजन या क्षेत्रांत उज्ज्वल करिअर घडविता यावे, या उद्देशाने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या या कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या क्षेत्रात जनसंज्ञापन विषयाच्या विद्यार्थ्यांना कल्पनाही करता येणार नाही, अशा संधी उपलब्ध आहेत.
माध्यमांसारख्या प्रत्यही बदलणाऱ्या क्षेत्रात उडी मारून उत्तम करिअर करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्यांसाठी जनसंज्ञापन आणि पत्रकारिता क्षेत्रातील पदवी हे उत्तम साधन आहे. जनसंज्ञापनातील विविध कार्यक्षेत्रांत कार्यरत असलेल्या तज्ज्ञ व्यक्तींकडून दिले जाणारे धडे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

या अभ्यासक्रमाला प्रवेश म्हणजे विविध माध्यम कंपन्यांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक प्रात्यक्षिक ज्ञान आणि कौशल्ये विकसित करण्याची हमी आहे. जनसंज्ञापनाचे विविध दृष्टिकोन; तसेच प्रेक्षकांच्या विविध प्रकारच्या गरजांबाबतचे आकलन करून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. जाहिरात, नवमाध्यमे आणि पत्रकारितेच्या या अभ्यासक्रमात नव्या युगातील आशयविचार, कार्यक्रमनिर्मिती आणि पत्रकारितेची तत्त्वे अंतर्भूत आहेत.

### मास्टर ऑफ आर्ट इन जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन

एमए इन जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन हा दोन वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांना पत्रकारिता, जाहिरात आणि मनोरंजन या क्षेत्रांत उज्ज्वल करिअर घडविता यावे, या उद्देशाने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. माध्यमांसारख्या प्रत्यही बदलणाऱ्या क्षेत्रात उडी मारून उत्तम करिअर करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या कोणत्याही पदवीधरांसाठी जनसंज्ञापन आणि पत्रकारिता क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी हे उत्तम साधन आहे. सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या या सर्जनशील सेवा क्षेत्रात जनसंज्ञापन आणि पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनेकानेक संधी आहेत. सातत्याने बदलणाऱ्या बहुमाध्यमे आणि सातत्याने अभिसरण होणाऱ्या वातावरणात टिकण्याची कौशल्ये एमएच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावीत, असा आमचा ध्यास आहे.

संशोधनाधारित दृष्टिकोन असलेले उद्योगसज्ज व्यावसायिक घडविणे हा जनसंज्ञापनातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. हा दृष्टिकोन एका न्याय्य समाजासाठी नवी क्षितिजे निर्माण करील, असा आमचा विश्वास आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून, वर्गातील अध्यापन व स्टुडिओतील उपक्रमांत सातत्याने बदलणाऱ्या माध्यम क्षेत्रातील घडामोडींचे प्रतिबिंब पडेल, अशी काळजी घेण्यात आली आहे







# औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा









# औषधनिर्माणशास्त्र विभाग

औषधनिर्माणशास्त्र उद्योगांमध्ये उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून, जागतिक औषधोपचार क्षेत्रात ते महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. औषधनिर्माणशास्त्र विभागात सध्याच्या गरजांनुसार पाठ्यक्रम, अध्यापन पद्धती, प्रशिक्षण पद्धती आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीसीआय) गरजांनुसार औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर हा विभाग भर देतो. त्यासाठी सर्व प्रयोगशाळा अद्ययावत आणि आधुनिक वैज्ञानिक उपकरणांनी सज्ज करण्यात आल्या आहेत, तर ग्रंथालयातही सर्वोत्तम संदर्भ पुस्तके, वैज्ञानिक नियतकालिके आणि शोधनिबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत. समाजाच्या आणि उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्ये निर्माण करणे हे या विभागाचे अविभाज्य अंग आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक गरजांबाबत आणि समाजातील औषधनिर्मात्यांच्या भूमिकेबाबत जागरूकता निर्माण होईल, याचीही दक्षता विभाग घेते.

## बॅचलर ऑफ फार्मसी

बी.फार्म (बॅचलर ऑफ फार्मसी) या अभ्यासक्रमात सजीवांसाठी औषधांची रचना आणि निर्मिती यांचा समावेश होतो. हा उत्पादनकेंद्री उद्योग आहे. औषधनिर्माण कंपन्या अत्यंत उच्च तंत्रज्ञान वापरत असून, जागतिक औषधोपचार क्षेत्रात आज महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. विद्यार्थ्यांनी सर्व नव्या आव्हानांसाठी सज्ज राहणे गरजेचे आहे. विश्वकर्मा विद्यापीठाचा बी.फार्म अभ्यासक्रमातील पाठ्यक्रम, अध्यापन पद्धती, प्रशिक्षण पद्धती आणि पायाभूत सुविधांची सध्याच्या गरजांनुसार रचना करण्यात आली आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीसीआय) गरजांनुसार औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीवर हा विभाग भर देतो. त्यासाठी सर्व प्रयोगशाळा अद्ययावत आणि आधुनिक वैज्ञानिक उपकरणांनी सज्ज करण्यात आल्या आहेत, तर ग्रंथालयातही सर्वोत्तम संदर्भ पुस्तके, वैज्ञानिक नियतकालिके आणि शोधनिबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

समाजाच्या आणि उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्ये निर्माण करणे हे या विभागाचे अविभाज्य अंग आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक गरजांबाबत आणि समाजातील औषधनिर्मात्यांच्या भूमिकेबाबत जागरूकता निर्माण होईल, अशी खात्री या अभ्यासक्रमाच्या प्रवेशामुळे नक्की मिळेल.

## डिप्लोमा इन फार्मसी

भारतात नोंदणीकृत औषधनिर्माता वा विक्रेता होण्यासाठी डी.फार्म (डिप्लोमा इन फार्मसी) ही किमान पात्रता आवश्यक आहे. स्वतंत्र औषधविक्री दुकाने, रुग्णालयांतील औषधविक्री दुकाने; तसेच औषधनिर्माण कंपन्यांतील विविध पदांसाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावीत, यावर अभ्यासक्रमाचा भर आहे. विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमातून उपचारशास्त्र आणि जैवरासायनिक विज्ञानातील ज्ञान मिळते. औषधनिर्माणशास्त्रातील तज्ज्ञ शिक्षक, क्लिनिकल संशोधक आणि औषधनिर्माणशास्त्र वैज्ञानिक म्हणून काम करण्याची पात्रता त्यांच्या अंगी निर्माण होते. विद्यार्थ्यांना काही विशेष क्षेत्रांतील सखोल ज्ञान आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभवही मिळतो. सरकारी क्षेत्रातीलही काही ठरावीक संधींची दारे त्यांच्यासाठी खुली होतात. हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करून विद्यार्थी स्वतंत्र उद्योजक म्हणूनही उभा राहू शकतो.

विश्वकर्मा विद्यापीठातील सर्व प्रयोगशाळा औषधनिर्माणशास्त्रातील तंत्रज्ञान प्रगतीनुसार आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीसीआय) गरजांनुरूप अद्ययावत आणि आधुनिक वैज्ञानिक उपकरणांनी सज्ज करण्यात आल्या आहेत, तर ग्रंथालयातही सर्वोत्तम संदर्भ पुस्तके, वैज्ञानिक नियतकालिके आणि शोधनिबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.







# विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा








## संगणकशास्त्र विभाग

संगणकविज्ञान आणि पूरक क्षेत्रातील दर्जेदार शिक्षण देणे, हेच विश्वकर्मा विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे उद्दिष्ट आहे. या विभागांतर्गत बीएस्सी कम्प्युटर सायन्स हा पदवी अभ्यासक्रम; तसेच एमएस्सी कम्प्युटर सायन्स हा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवला जातो. हे दोन्ही अभ्यासक्रम टीसीएस आयओएन या डेटा विज्ञानातील विशेषज्ञाच्या सहकार्याने राबवले जातात.

मूल्यवर्धित अभ्यासक्रमांची गरज लक्षात घेऊन विभागातर्फे वेब अँड मोबाइल एप्लिकेशन डेव्हलपमेंटसारखे लघु कालावधीचे अभ्यासक्रमही चालवले जातात. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यासाठी याचा उपयोग होतो. विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी आदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना परदेशातही शिकण्याची संधी मिळते.

विभागामध्ये अत्यंत उच्च पात्रता असलेला शिक्षकवर्ग असून, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी ते विशेष कष्ट घेतात. अध्ययन-अध्यापनाच्या जोडीने शिक्षकवर्ग संशोधन, सल्लासेवा आणि कौशल्यवृद्धी अभ्यासक्रमावरही भर देतो, जी विभागाचीही दीर्घ दृष्टी आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनाही अभ्यासक्रमपूरक, संशोधनपूरक आणि सल्लासेवा उपक्रमांत सहभागी करून घेतले जाते. विद्यार्थ्यांना विभागातर्फे शैक्षणिक, अशैक्षणिक आणि भरती प्रक्रियेतही मदत केली जाते.

### बॅचलर ऑफ सायन्स अँड कम्प्युटर सायन्स

बीएस्सी कम्प्युटर सायन्स हा विद्यार्थ्यांना संगणशास्त्र शाखेतील मूलभूत सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक घटकांचा सखोल पाया तयार करुन घेणारा पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर विविध उद्योगांमध्ये विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.
विद्यार्थ्यांची तांत्रिक कौशल्ये आणि रोजगारक्षमता वाढण्यास हातभार लावतील, असे विविध मूलभूत, व्यावसायिक आणि क्षमतावर्धक पाठ्यक्रम या अभ्यासक्रमांतर्गत दिले जातात. प्रत्यक्ष व्यावसायिक क्षेत्रात उतरण्यासाठीचा योग्य असा पाया हा अभ्यासक्रम निर्माण करतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपर, सिस्टीम इंटिग्रेटर, सिस्टीम एनलिस्ट आदी करिअरमध्ये स्वत:ला सिद्ध करता येऊ शकते.

माहिती तंत्रज्ञान उद्योगात आजच्या घडीला आवश्यक असलेले डेटा विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, क्लाउड कम्प्युटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आदी विषय वैकल्पिक विषय म्हणून शिकवले जातात. हा अभ्यासक्रम उभरत्या तंत्रज्ञांची संगणक जगाबाबतची; तसेच त्याच्या व्यावसायिक उपयोजनाची नजर घडविण्यासाठी उपयुक्त आहे.

### मास्टर ऑफ सायन्स इन कम्प्युटर सायन्स

एमएस्सी कम्प्युटर सायन्स हा विद्यार्थ्यांना संगणशास्त्र शाखेतील मूलभूत सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक घटकांचा सखोल पाया तयार करुन घेणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर विविध उद्योगांमध्ये विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

विद्यार्थ्यांची तांत्रिक कौशल्ये आणि रोजगारक्षमता वाढण्यास हातभार लावतील, असे विविध मूलभूत, व्यावसायिक आणि क्षमतावर्धक पाठ्यक्रम या अभ्यासक्रमांतर्गत दिले जातात. प्रत्यक्ष व्यावसायिक क्षेत्रात उतरण्यासाठीचा योग्य असा पाया हा अभ्यासक्रम निर्माण करतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपर, सिस्टीम इंटिग्रेटर, सिस्टीम एनलिस्ट आदी करिअरमध्ये स्वत:ला सिद्ध करता येऊ शकते.

## संख्याशास्त्र विभाग

निर्णयप्रक्रिया आणि धोरणनिर्मितीच्या दृष्टीने संख्याशास्त्र ही फार महत्त्वाची शाखा आहे. संख्याशास्त्र विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन विश्वकर्मा विद्यापीठाने विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत संख्याशास्त्र विभागाची स्थापना केली. बीएस्सी (ऑनर्स) – स्टॅटिस्टिक्स (बिग डेटा एनॅलिटिक्स) आणि एमएस्सी (ऑनर्स) – स्टॅटिस्टिक्स (बिग डेटा एनॅलिटिक्स) हे दोन अभ्यासक्रम 2018 मध्ये सुरु करण्यात आले. दोन्हींची प्रवेशक्षमता अनुक्रमे 60 आणि 30 इतकी आहे.

शैक्षणिक वर्ष 2021 पासून हा अभ्यासक्रम टीसीएस आयओएन-इंडस्ट्री ऑनर प्रोग्रामच्या (आयएचपी) सहकार्याने राबवला जाईल. यामध्ये उन्हाळी आणि हिवाळी उमेदवारीची (इंटर्नशिप) संधीही मिळेल. आघाडीच्या 10 टक्के विद्यार्थ्यांना टीसीएस-आयओएनतर्फे पूर्ण सत्रभर उमेदवारीची संधी दिली जाईल. विद्यार्थ्यांना उद्योग आणि तंत्रज्ञानातील महत्त्वाची दृष्टी प्राप्त व्हावी आणि ते उद्योगातील करिअरसाठी सज्ज व्हावेत, असा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. सैद्धान्तिक संकल्पना आणि त्यांचे प्रत्यक्ष उद्योगांतील उपयोजन यांचा उत्तम समतोल या अभ्याक्रमात साधला गेला आहे. त्यामुळे अध्यापनातही पारंपरिक सैद्धान्तिक पद्धतींबरोबरच डेटा एनॅलिटिक्समधील आधुनिक कल्पनांचा वापर केला जातो.

### बॅचलर ऑफ सायन्स (ऑनर्स) इन स्टॅटिस्टिक्स – बिग डेटा एनॅलिटिक्स

निर्णयप्रक्रिया आणि धोरणनिश्चतीमध्ये संख्याशास्त्र ही विद्याशाखा मूलभूत समजली जाते. संख्याशास्त्राची वर्णनात्मक आणि अन्वयार्थक भूमिका हा आधुनिक जगातील जवळपास सर्वच विद्याशाखांतील वृद्धीचा आधार आहे. क्रीडा विश्लेषक ते व्यवसाय विश्लेषक अशा विविध अपारंपरिक क्षेत्रांतील करिअरच्या वाटा हा अभ्यासक्रम उपलब्ध करून देतो. संख्याशास्त्रीय विज्ञान आणि त्याचे वास्तवातील समस्या सोडविण्यासाठीचे उपयोजन यावर बीएस्सी स्टॅटिस्टिक्स अभ्यासक्रमाचा भर आहे. पदवीनंतर लगेचच आश्वासक व्यावसायिक आयुष्यात शिरकाव करण्यासाठीची विद्यार्थ्यांची तयारी करून घेणारा हा अभ्यासक्रम आहे.

हा अभ्यासक्रम संख्याशास्त्रातील उच्च शिक्षण किंवा डॉक्टोरल शिक्षणासाठीचे व्यासपीठ तयार करणाराही आहे. विद्यार्थ्यांची सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक कौशल्ये घासूनपुसून तयार करण्यासाठी संख्याशास्त्रीय पॅकेजेस उपयुक्त असतात. या अभ्यासक्रमात मिळालेले ज्ञान विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान, उत्पादन उद्योग, वित्त, आरोग्य आणि कृषी क्षेत्रात वापरू शकतात.

### मास्टर ऑफ सायन्स इन स्टॅटिस्टिक्स – बिग डेटा एनॅलिटिक्स

संख्याशास्त्रीय विज्ञानातील प्रगत अध्ययन आणि संशोधन प्रकल्प आणि त्यांचा प्रत्यक्ष समस्या निवारणासाठी होणारा उपयोग यामध्ये रस असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विश्वकर्मा विद्यापीठाचा एमएस्सी स्टॅटिस्टिक्स हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. बिग डेटा आणि डेटा एनॅलिटिक्स हा एमएस्सी स्टॅटिस्टिक्स अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. डेटा विज्ञान क्षेत्रात माहिती गोळा करण्याच्या, त्याचे विश्लेषण करण्याच्या तंत्रात विद्यार्थी प्रवीण होतील, हे या अभ्यासक्रमात पाहिले जाते.

सैद्धान्तिक संकल्पना आणि त्यांचे उपयोजन यांत उत्तम संतुलन साधणारा हा अभ्यासक्रम आहे. त्यामुळे अध्यापनातही पारंपरिक सैद्धान्तिक पद्धतींबरोबरच डेटा एनॅलिटिक्समधील आधुनिक कल्पनांचा वापर केला जातो. सध्याच्या जगात विज्ञानातील सर्वच क्षेत्रांत निर्माण होत असलेल्या माहितीचा प्रचंड साठ्याचे विश्लेषण करण्याकरिता उपयुक्त अशी साधने आणि तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवली जातात.



## संगणक अभियांत्रिकी विभाग



सध्याच्या डिजिटल युगात वैद्यकीय उपयोजन, उत्पादन असो, की बँकिंग, अनेक क्लिष्ट समस्या कमी वेळात सोडविण्यासाठी संगणकाचा व्यापक वापर होतो. त्यामुळे जगभरातच संगणक अभियंत्यांची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भविष्यातील व्यावसायिक आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे प्रशिक्षित करतो.

तंत्रज्ञान आणि त्यातील संशोधनातील करिअरसाठी विद्यार्थ्यांना हा पदवी अभ्यासक्रम तयार करतो. संगणक अभियांत्रिकीचा गाभा, व्यावसायिक जग आणि त्यातील आधुनिक प्रवाह यांचा हा अभ्यासक्रम उत्तम संगम आहे.

विद्यार्थ्यांना संगणक अभियांत्रिकी क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान देण्याच्या उद्देशाने बीटेक संगणक अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना संगणन शाखेतील विविध प्रकारांतील सखोल ज्ञान तर मिळतेच; शिवाय या उद्योगांतील विविध पदांसाठी; तसेच शैक्षणिक व संशोधन क्षेत्रांतील विविध संधींसाठी त्यांना तयार करते.

### बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी इन कम्प्युटर इंजिनीअरिंग

सध्याच्या डिजिटल युगात वैद्यकीय उपयोजन, उत्पादन असो, की बँकिंग, अनेक क्लिष्ट समस्या कमी वेळात सोडविण्यासाठी संगणकाचा व्यापक वापर होतो. त्यामुळे जगभरातच संगणक अभियंत्यांची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भविष्यातील व्यावसायिक आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे प्रशिक्षित करतो.

तंत्रज्ञान आणि त्यातील संशोधनातील करिअरसाठी विद्यार्थ्यांना हा पदवी अभ्यासक्रम तयार करतो. संगणक अभियांत्रिकीचा गाभा, व्यावसायिक जग आणि त्यातील आधुनिक प्रवाह यांचा हा अभ्यासक्रम उत्तम संगम आहे.

### मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी इन कम्प्युटर इंजिनीअरिंग

संगणक अभियांत्रिकी क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान विद्यार्थ्यांना मिळतील, अशा पद्धतीने एमटेक कम्प्युटर इंजिनीअरिंग अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना संगणन शाखेतील विविध प्रकारांतील सखोल ज्ञान तर मिळतेच; शिवाय या उद्योगांतील विविध पदांसाठी; तसेच शैक्षणिक व संशोधन क्षेत्रांतील विविध संधींसाठी त्यांना तयार करते.

## यांत्रिक अभियांत्रिकी विभाग

विश्वकर्मा विद्यापीठात 2017 मध्ये यांत्रिक अभियांत्रिकी विभाग सुरु झाला. या ठिकाणी विद्यार्थ्यांना उद्योगपूरक कौशल्ये शिकवली जातात. डिझाइन, विश्लेषण आणि उत्पादननिर्मिती यातील मूलभूत ज्ञान मिळावे, असा विभागाचा सर्वंकष दृष्टिकोन आहे. प्रत्यक्ष अनुभवाधारित उच्च दर्जाच्या एकात्मिक संवादी अध्ययन-अध्यापन पद्धतीद्वारे आवश्यक विश्लेषण कौशल्ये; तसेच नैदानिक समस्या निवारण कौशल्ये विकसित करण्यावर या अभ्यासक्रमात

भर देण्यात आला आहे.

## बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग

मिळवलेले ज्ञान, कौशल्ये आणि यांत्रिक अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या संदर्भाने वापरता येण्याच्या क्षमतेसह विद्यार्थ्यांना त्यांचा करिअरमार्ग शोधण्यास बीटेक मेकॅनिकल इंजिनीअरिंग हा अभ्यासक्रम तयार करतो. विद्यार्थ्यांची उत्पादन, कास्टिंग, वाहनउद्योग, एअरोस्पेस आदी विविध क्षेत्रांत काम करण्याच्या दृष्टीने तयारी करून घेणे, हा आमचा उद्देश आहे.

डिझाइन, मटेरिअल्स, थर्मल, उत्पादन, ऑटोमेशन आदी क्षेत्रांतील करिअरवाटांसाठी विद्यार्थ्याला सक्षम बनवणे हा बीटेक मेकॅनिकल इंजिनीअरिंग अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, अभियांत्रिकीतील मूलभूत तत्त्वे आणि अभियांत्रिकीतील स्पेशलायझेशन्समधील ज्ञानाचे क्लिष्ट अभियांत्रिकी समस्यांवर मात करण्यासाठी उपयोजन करता येईल, याकडे आम्ही लक्ष पुरवतो.
या अभ्यासक्रमात दोन स्पेशलायझेशन्स उपलब्ध आहेत...
- फ्युचर मोबिलिटी
- स्मार्ट आणि सस्टेनेबल सिस्टीम्स

उद्याच्या तंत्रज्ञानाला सुसंगत असे ज्ञान आणि कौशल्ये विकसित करण्याची संधी या स्पेशलायझेशन्सद्वारे विद्यार्थ्यांना मिळते.

## मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग

एमटेक (मेकॅनिकल) अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये खऱ्या अर्थाने बहुविद्याशाखीय दृष्टिकोन रुजावतो. ऑनर्स इन रोबोटिक्स अँड इलेक्ट्रिक व्हेइकल्समधील स्पेशलायझेशन; तसेच सायबर सिक्युरिटी, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), व्हर्च्युअल आणि ऑगमेंटेड रिएलिटी, डेटा सायन्स, प्रॉडक्ट डिझाइन, वेब अँड मोबाइल एप्लिकेशन डेव्हलपमेंट आणि डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन यातील लघु अभ्यासक्रम यांचा पाठ्यक्रमात समावेश आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभाग

आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्समध्ये स्पेशलायझेशन करण्याची संधी देणारे विश्वकर्मा विद्यापीठ हे पुण्यातील एक आघाडीचे राज्य खासगी विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपयोजनासाठी डेटा विश्लेषणावर आधारित बुद्धिमान निर्णय घेण्याची कौशल्ये हा अभ्यासक्रम देतो.

या अभ्यासक्रमात केवळ मशिन लर्निंग, डेटा वेअरहाउस, डेटा माइनिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आदी मूलभूत तंत्रज्ञानांवर भर नसून,





आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्क्स फझी टेक्निक्स, बिग डेटा एनॅलिटिक्स आणि आणखी बऱ्याच क्षेत्रातील सखोल ज्ञान दिले जाते. डेटा एनॅलिस्ट, डेटा सायंटिस्टमध्ये करिअर करण्यासाठी; तसेच मशिन लर्निंग, संख्याशास्त्र, नॉलेज डिस्कव्हरी आणि व्हिज्युअलायझेशनशी संबंधित मोठ्या समस्या सोडविण्यासाठी आमचे विद्यार्थी ज्ञानवंत आणि उद्योगसज्ज व्हावेत, असा आमचा उद्देश आहे. संगणक विज्ञान, उपयोजन आणि सिस्टीम्समधील उत्तम ज्ञान, कौशल्ये आणि पद्धती आत्मसात करून या क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी भरारी घ्यावी, याकडे आम्ही लक्ष पुरवतो.



## बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स

विश्वकर्मा विद्यापीठाचा आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स अभ्यासक्रम डेटा विश्लेषणावर आधारित बुद्धिमान निर्णय घेण्याची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करते, जो प्रत्यक्ष जगातील विविध उपयोजनातील महत्त्वाचा घटक आहे.

या अभ्यासक्रमात केवळ मशिन लर्निंग, डेटा वेअरहाउस, डेटा माइनिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आदी मूलभूत तंत्रज्ञानांवर भर नसून, आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्क्स फझी टेक्निक्स, बिग डेटा एनॅलिटिक्स आणि आणखी बऱ्याच क्षेत्रातील सखोल ज्ञान दिले जाते. . डेटा एनॅलिस्ट, डेटा सायंटिस्टमध्ये करिअर करण्यासाठी; तसेच मशिन लर्निंग, संख्याशास्त्र, नॉलेज डिस्कव्हरी आणि व्हिज्युअलायझेशनशी संबंधित मोठ्या समस्या सोडविण्यासाठी आमचे विद्यार्थी ज्ञानवंत आणि उद्योगसज्ज व्हावेत, असा आमचा उद्देश आहे. संगणक विज्ञान, उपयोजन आणि सिस्टीम्समधील उत्तम ज्ञान, कौशल्ये आणि पद्धती आत्मसात करून या क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी भरारी घ्यावी, याकडे आम्ही लक्ष पुरवतो.

## वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट

समाजाच्या स्वास्थ्यासाठी सांडपाण्यावर प्रक्रिया आणि निर्जंतुकीकरण नियोजन चांगल्या पद्धतीने व्हावे आणि त्यासाठी या क्षेत्रातील अधिक चांगले व्यावसायिक तयार व्हावेत, या उद्देशाने 2020 मध्ये वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन विभाग स्थापन करण्यात आला. सांडपाणी आणि निर्जंतुकीकरण व्यवस्थापनाबाबत विद्यार्थ्यांना सखोल माहिती देणारा असा हा अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित करण्यासही हा अभ्यासक्रम हातभार लावतो. विभागातर्फे अद्ययावत पायाभूत सुविधा असलेल्या वॉटर क्वालिटी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात आली आहे.

विभागातर्फे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील उमेदवारी, प्रत्यक्ष प्रकल्पावर कामाची संधी दिली जाते; तसेच कल्पक अध्यापन पद्धतींचा वापर केला जातो. सांडपाणी प्रक्रिया, निर्जंतुकीकरण आणि शहर विकासाबाबत विभागातर्फे नावीन्यपूर्ण आणि एकात्मिक दृष्टिकोन व जागतिक पद्धतींचा अवलंब केला जातो.

विश्वकर्मा विद्यापीठ आणि एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये (एआयटी) असलेल्या सहकार्याचा विद्यार्थ्यांना जागतिक पातळीचा अनुभव मिळण्यात आणि आंतरसांस्कृतिक संशोधन सहकार्यात उपयोग होतो. या विभागांतर्गत चालवला जाणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम आयएचई डेल्फ्ट इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर एज्युकेशन नेदरलँड्सच्या ग्लोबल सॅनिटेशन ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूटअंतर्गत येतो. विश्वकर्मा विद्यापीठ ग्लोबल सॅनिटेशन ग्रॅज्युएट स्कूलचे सदस्य असून, एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सहायक संघात आहे. मास्टर ऑफ सायन्स इन वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट वॉटर

हे जागतिक नेत्यांनी मान्य केलेल्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये (एसडीजी) समाविष्ट 17 प्राधान्यांपैकी एक आहे. एसडीजी 6 च्या ध्येयांमध्ये 2030 पर्यंत सांडपाणी प्रक्रिया आणि पुरेशा निर्जंतुकीकरणाची तरतूद यांचा समावेश आहे.



ही आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान, अनुभव आणि व्यावसायिक संपर्कजाळे असलेले मनुष्यबळ; तसेच शाश्वत पाणी व निर्जंतुकीकरण उपाय पुरविण्याच्या संधी देणे हा एमएस्सी वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. सामाजिक स्वास्थ्यासाठी सांडपाणी प्रक्रिया आणि निर्जंतुकीकरण व्यवस्थापनातील व्यावसायिक मनुष्यबळ निर्माण करण्याची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल.

हा अभ्यासक्रम एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, थायलंडच्या सहकार्याने जीएसजीएस ग्लोबल सॅनिटेशन ग्रॅज्युएट स्कूल, आयएचई, डेल्फ्ट नेदरलँड्सअंतर्गत चालवला जातो. शाश्वत विकास ध्येयांच्या संदर्भात पाणी, सांडपाणी आणि निर्जंतुकीकरण व्यवस्थापनामध्ये व्यावसायिक मनुष्यबळ तयार करणे ही नितांत गरज आहे. सांडपाणी प्रक्रिया आणि निर्जंतुकीकरण व्यवस्थापनातील सखोल दृष्टी तयार करण्यासाठी ज्ञानदान करणे हे या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि संघभावना निर्माण करण्यासाठी त्यांना तांत्रिक, सामाजिक आणि वैयक्तिक कौशल्येही शिकवली जातात.

## योग आणि निसर्गोपचार विभाग

आरोग्य आणि तंदुरुस्ती हा जगातील एक महत्त्वाचा उद्योग म्हणून उदयास आला असून, या वेगाने वाढणाऱ्या उद्योगात व्यावसायिक दृष्टिकोनाची गरजही वाढली आहे. योग, तंदुरुस्ती आणि निसर्गोपचारात यशस्वी करिअर करण्यासाठी योग आणि निसर्गोपचार विभाग हे यासाठी उत्तम ठिकाण आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर तंदुरुस्ती क्षेत्राला मोठा वाव निर्माण झाल्याने या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत.

योग आणि निसर्गोपचार विभागात योगाचे पारंपरिक आणि आधुनिक प्रकार शिकवले जातात. तंदुरुस्ती आणि आरोग्य क्षेत्रात करिअर करु इच्छिणारे उमेदवार फिटनेस क्लब, व्यायामशाळा, कॉर्पोरेट्स आणि रुग्णालयांत यासंबंधीचे काम करू शकतात.

### बॅचलर ऑफ सायन्स इन योग अँड नॅचरोपॅथी

अनेक वर्षांपूर्वी साधुसंतांनी ध्यानधारणेद्वारे निसर्ग आणि विश्वाचे विश्लेषण केले. एकविसाव्या शतकाने अनेक क्षेत्रांना बहरण्याची नवी दिशा दिली. गेल्या काही वर्षांत योगोपचाराच्या अनुयायांत मोठी वाढ झाली आहे. यामुळे या क्षेत्रात व्यावसायिक; तसेच उभरत्या तंदुरुस्ती शिक्षकांना त्यांचे सर्वोत्तम देण्याचा मोठा वाव मिळाला आहे. तंदुरुस्तीबाबत बोलायचे, तर योग ही केवळ व्यायामपद्धती नाही, तर जीवन बदलण्याची क्षमता असलेली परिपूर्ण पद्धती आहे. या पार्श्वभूमीवर, पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम योग आणि निसर्गोपचारातील झळाळत्या करिअरसाठी तयार करतो. हा पाठ्यक्रम मूलतत्त्वे, व्यावसायिक आणि आधुनिक अभ्यासक्रमांचे योग्य संतुलन आहे. तंदुरुस्तीसंदर्भातील कौशल्ये आणि ज्ञान बीएस्सी योग अँड नॅचरोपॅथी अभ्यासक्रमात पुरवली जातात. विद्यार्थ्यांना यात प्राचीन आणि आधुनिक योग आणि निसर्गोपचार तंत्रांचे सखोल ज्ञान मिळते.

## गणित विभाग

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सर्व शाखांच्या गरजांना पुऱ्या पडणाऱ्या महत्त्वाच्या विषयांपैकी एक म्हणजे गणित. विश्वकर्मा विद्यापीठात 2018 मध्ये गणित विभाग स्थापन झाला. थोड्याच कालावधीत विभागाने दखल घ्यावी अशी प्रगती केली आहे. सर्व अभियांत्रिकी शाखांतील प्रथम वर्ष; तसेच संख्याशास्त्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात या विभागातर्फे गणित विषय शिकवला जातो.

सध्या या विभागातर्फे गणितातील पदव्युत्तर आणि पीएचडी अभ्यासक्रम राबवले जातात. गणितातील विविध विषय, तंत्रज्ञान क्षमता, वैयक्तिक व जीवन कौशल्ये यांचा पाया पक्का करण्यावर पाठ्यक्रमाचा भर आहे. मॅटलॅब, सायलॅब, जीओजिब्रा आणि पायथॉन आदी साधने पदव्युत्तर पदवी स्तरावर डेटा विश्लेषण आणि संगणनासाठी वापरली जातात. आमचा पाठ्यक्रम संशोधन आणि रोजगारकेंद्री असून, सीबीएसई मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणारा आहे. वर्गातील शिक्षणाच्या जोडीनेच विभागात मूल्यवर्धित लघु अभ्यासक्रम, इंटर्नशिप, मूक्सद्वारे स्वयंअध्ययन, प्रकल्प कार्य आणि सेट, नेट, गेट, एमकॅटबाबत मार्गदर्शनही केले जाते.

आमचे शिक्षक पुढील संशोधन क्षेत्रांत कार्यरत आहेत : बीजगणित, विश्लेषण, नंबर थिअरी, डिफरन्शिअल इक्वेशन्स, कम्प्युटेशनल फ्लुइड मेकॅनिक्स इ. विभागातील चार संशोधकांनी विभागातीलच अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडीसाठी नोंदणी केली आहे.









# आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा







## इव्हेंट मॅनेजमेंट विभाग

इव्हेंट मॅनेजमेंट विभाग 2021 मध्ये स्थापन करण्यात आला. इव्हेंट उद्योगात करिअर करु इच्छिणाऱ्या आणि त्यात यश मिळवू पाहणाऱ्या पदवीपूर्व आणि पदवीप्राप्त विद्यार्थ्यांसाठी उत्तमोत्तम अभ्यासक्रम या विभागातर्फे चालवले जातात. विझक्राफ्ट एमआयएमईच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग सुरु करण्यात आला. माध्यमे आणि इव्हेंट उद्योगातील बौद्धिक कुतुहल व तज्ज्ञतेला पुढावा देण्यासाठी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील आवश्यक ते सर्व ज्ञान जागतिक दर्जाच्या समावेशक, सहकारी आणि भविष्यवेधी अध्ययन वातावरणात मिळावे, असा प्रयत्न आहे.

WIZCRAFT MIME
MANAGEMENT INSTITUTE OF MEDIA & ENTERTAINMENT







# नवीन अभ्यासक्रम









# नवीन अभ्यासक्रम

## बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन इन इव्हेंट मॅनेजमेंट

बीबीए इव्हेंट मॅनेजमेंट हा विश्वकर्मा विद्यापीठाचा विझक्राफ्ट एमआयएमईच्या सहकार्याने चालवला जाणारा पदवी अभ्यासक्रम आहे. माध्यमे आणि इव्हेंट उद्योगातील बौद्धिक कुतुहल व तज्ज्ञतेला पुढावा देण्यासाठी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील आवश्यक ते सर्व ज्ञान जागतिक दर्जाच्या समावेशक, सहकारी आणि भविष्यवेधी अध्ययन वातावरणात मिळावे, असा प्रयत्न आहे. इव्हेंट मॅनेजमेंट हा सर्जनशीलतेच्या दृष्टीने आव्हानात्मक आणि सातत्याने बदल होत राहणारा उद्योग असून, काही संस्मरणीय घटनांची उत्तम नोंद किंवा दस्तावेजीकरण करण्यासाठी वैविध्यपूर्ण कौशल्ये असलेल्या व्यावसायिकांची गरज आहे. या उद्योगातील आघाडीच्या व्यावसायिकांकडून विद्यार्थ्यांना शिकता येते. कोणत्याही व्याप्तीचे किंवा प्रकारचे इव्हेंट, कार्यक्रम यशस्वीपणे आखणी करुन पार पाडण्यासाठी आवश्यक प्रत्यक्षानुभव, विशेष कौशल्ये आणि नेतृत्व मानसिकता तयार करण्यासाठी हे शिक्षण उपयोगी पडेल, असे आहे. वर्गातील अध्यापन आणि जोडीने प्रत्यक्षानुभव याद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक साधने आणि तंत्रे शिकायला मिळण्याबरोबरच इव्हेंट व्यवस्थापनाच्या नव्या जगात शिरण्यासाठी आवश्यक व्यवस्थापकीय क्षमताही विकसित करता येतात.

## मास्टर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन इन इव्हेंट मॅनेजमेंट

इव्हेंट मॅनेजमेंट हा सर्जनशीलतेच्या दृष्टीने आव्हानात्मक आणि सातत्याने बदल होत राहणारा उद्योग असून, काही संस्मरणीय घटनांची उत्तम नोंद किंवा दस्तावेजीकरण करण्यासाठी वैविध्यपूर्ण कौशल्ये असलेल्या व्यावसायिकांची गरज आहे. माध्यमे आणि इव्हेंट उद्योगातील बौद्धिक कुतुहल व तज्ज्ञतेला पुढावा देण्यासाठी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील आवश्यक ते सर्व ज्ञान जागतिक दर्जाच्या समावेशक, सहकारी आणि भविष्यवेधी अध्ययन वातावरणात मिळावे, असा प्रयत्न करणारा असा हा विश्वकर्मा विद्यापीठाचा विझक्राफ्ट-एमआयएमईच्या सहकार्याने राबवला जाणारा इव्हेंट मॅनेजमेंटमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. या उद्योगातील आघाडीच्या व्यावसायिकांकडून विद्यार्थ्यांना शिकता येते. कोणत्याही व्याप्तीचे किंवा प्रकारचे इव्हेंट, कार्यक्रम यशस्वीपणे आखणी करुन पार पाडण्यासाठी आवश्यक प्रत्यक्षानुभव, विशेष कौशल्ये आणि नेतृत्व मानसिकता तयार करण्यासाठी हे शिक्षण उपयोगी पडेल, असे आहे.

## बॅचलर ऑफ व्हिज्युअल आर्ट इन डिजिटल फिल्ममेकिंग

चित्रपट उद्योगातील सखोल ज्ञान आणि त्याची व्याप्ती विद्यार्थ्यांना समजावी, अशा पद्धतीने डिजिटल फिल्ममेकिंग अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. डिजिटल फिल्ममेकिंगच्या विविध प्रक्रिया, सर्जनशीलता आणि सौंदर्यदृष्टीबाबतच्या क्षमता, कल्पनाशक्ती आणि प्रत्यक्ष अनुभव याबाबतच्या आकलनाची विद्यार्थ्यांची पातळी या अभ्यासक्रमाद्वारे निश्चितच वाढू शकते. आयुष्य गोष्टीरूपात आणण्यासाठीचे मूलभूत निकष विद्यार्थ्यांना शिकवले जातात. चित्रपटनिर्मितीची कौशल्ये इथे शिकून चित्रपटकर्ता म्हणून आयुष्य घडविणे शक्य आहे. विद्यार्थ्यांना चित्रपटनिर्मितीची दोन महत्त्वाची अंगे शिकवली जातात – कथाकथन आणि निर्मिती. हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केलेले तज्ज्ञ अनुभवी शिक्षक तर आहेतच; शिवाय प्रत्यक्ष या क्षेत्रात काम करणारे व्यावसायिकही अतिथी व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. या अभ्यासक्रमाचा पाठ्यक्रम प्रगत असून, त्यात चित्रपटनिर्मिती, एनिमेशन आणि व्हीएफएक्सचे सौंदर्यात्मक पद्धतीने आकलन होण्यासाठीच्या सैद्धान्तिक संकल्पना, प्रक्रिया, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाचा समावेश आहे. संकल्पनेपासून प्रत्यक्ष निर्मितीतील उपयोजनांपर्यंतची व्हीएफएक्सची मूलभूत तत्त्वे या अभ्यासक्रमात शिकवली जातात. कॅमेरा, संकलन आणि ध्वनीसंयोजनाचा प्रत्यक्ष अनुभव घेत, दृश्यात्मक आणि ध्वन्य कारागिरीच्या माध्यमातून चित्रपटनिर्मिती कला शिकण्यावर या अभ्यासक्रमाचा भर आहे. दिग्दर्शन, ध्वनीसंयोजन, छायाचित्रण आणि संकलनातीलही करिअरची दिशा चित्रपटनिर्मितीच्या या वाटेवरुन पकडता येऊ शकते. हे विशेष शिक्षण विद्यार्थ्यांची निर्मिती कौशल्ये विकसित करतानाच चित्रपटनिर्मितीला सर्जनशील माध्यम म्हणून पुढावाही देते.

## मास्टर ऑफ व्हिज्युअल आर्ट इन डिजिटल फिल्ममेकिंग

पदवी अभ्यासक्रमात शिकलेली कौशल्ये आणखी घासूनपुसून पक्की करण्याच्या उद्देशाने मास्टर इन डिजिटल फिल्ममेकिंग हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. कथाकथनाची कला, चित्रपटांसाठी लेखन, रचितांची कला, दिग्दर्शन याचे आणखी चांगले आकलन व्हावे आणि इतर काही विषयांची विशेष ओळख व्हावी, अशीही याची रचना आहे. हे सगळे विषय तंत्रज्ञान, इतिहास, कलाकौशल्ये, सैद्धान्तिक संकल्पना आणि उद्योगांतील पद्धतींनुसार अतिशय बारकाईने विशद करण्यात आले आहेत. मास्टर इन डिजिटल फिल्ममेकिंग हा अभ्यासक्रम करिअरच्या अनेक वाटा खुल्या करणारा आहे. चित्रपट आणि दूरचित्रवाणी उद्योगांतील विविध करिअरबरोबरच चित्रपटकर्ता, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका निर्माता, माध्यमांतील निर्मितीसाठीचे सहकार्य, चित्रपट आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन अशाही करिअरच्या संधी यातून मिळू शकतात.



मास्टर इन डिजिटल फिल्ममेकिंगच्या विद्यार्थ्यांना कथाकथन, कल्पनाशक्तीला वाव देण्याची कौशल्ये, दिग्दर्शन, निर्मिती व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, वैधानिक निकषपूर्तता आणि तांत्रिक कौशल्येही शिकवली जातात. त्यामुळे हा अभ्यासक्रम केलेले विद्यार्थी केवळ सर्जनशीलच नाहीत, तर अतिशय सुविहित काम करणारे, मेहनती आणि विश्लेषणात्मक विचार करणारे असल्याचे चित्रपट निर्मात्यांना जाणवते. डिजिटल फिल्ममेकिंगमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम शोधणाऱ्यांसाठी हा अभ्यासक्रम सुयोग्य आहे. भारतात चित्रपट उद्योग सातत्याने विस्तारत आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ओटीटी व यूट्युब व्यासपीठे वाढत असून, त्यासाठी अनेक चित्रपट तयार होत असल्याने या क्षेत्राला सातत्याने कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना स्वतंत्र चित्रपटकर्ता म्हणून उभे राहण्यासाठी आवश्यक सर्जनशील आणि तांत्रिक कौशल्ये देतोच; शिवाय देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी चित्रपट महोत्सवांत स्वतःच्या चित्रपटाला नामांकन मिळण्याची संधीही देतो.

## बॅचलर ऑफ व्हिज्युअल आर्ट इन व्हिज्युअल इफेक्ट्स

बीव्हीए इन व्हिज्युअल इफेक्ट्स हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सातत्याने विस्तारत असलेल्या डिजिटल व्हिज्युअल इफेक्ट्स उद्योगांतील आकर्षक करिअरसाठी तयार करतो. चित्रपट, दूरचित्रवाणी, गेम्स आणि वास्तुरचनात्मक कल्पनादृष्टीतील वास्तवदर्शी व्हिज्युअल इफेक्ट्सचा वापर विद्यार्थी या अभ्यासक्रमात शिकतात. ते संकल्पनात्मक रेखाटने आणि कथाफलक तयार करतात, प्रतिकृती तयार करतात, दृश्य रंगमंचस्थ करतात आणि हालचाली त्रिमितीत मांडतात. व्यावसायिक कौशल्ये विकसित होण्यासाठी प्रात्यक्षिके, प्रयोगशाळेत अद्ययावत साधनांसह आणि उद्योगप्रमाणित सॉफ्टवेअरचा वापर करून काम, व्हिज्युअल, डिजिटल आणि स्पेशल इफेक्ट्स कलेतील महत्त्वाचे कल आदींच्या प्रशिक्षणावर या अभ्यासक्रमात भर आहे. कलेतील मूलभूत तत्त्वे, व्हिज्युअलायझेशन डिझाइन, स्केलिंग अँड प्रपोर्शन, कलर थिअरी, सेट एक्स्टेन्शन, व्हीएफएक्स फिल्ममेकिंग, चित्रीकरणासाठी क्रोमा कीइंग तंत्र व सीजीआय ग्राफिक्स आदी कालसुसंगत कौशल्येही विद्यार्थी शिकतात. त्रिमितीय कम्प्युटर ग्राफिक्सचे जगही त्यांच्यासाठी खुले केले जाते. या प्रशिक्षणासाठी आवश्यक फ्लोअर ग्रीन रूम आणि एडिट सूटही विद्यापीठात आहे. प्रत्यक्ष उद्योगात केल्या जाणाऱ्या

निर्मितीचा अनुभव विद्यार्थी येथे घेऊ शकतात. वास्तवातील पात्रांमध्ये सीजीआय घटक सुविहितपणे कसे मिसळायचे; तसेच कम्पोझिट तंत्रांसह फोटोरिअलिस्टिक लायटिंगची प्रक्रिया पूर्ण कशी करायची, हेही विद्यार्थ्यांना शिकवले जाते.

## बॅचलर ऑफ डिझाइन इन गेम आर्ट अँड डिझाइन

गेम डिझाइन अँड डेव्हलपमेंटचा भर एनिमेशन आणि गेम्सच्या रचनेवर व कलेवर आहे. या विशेष अभ्यासक्रमात गेम विकसनातील व्यूहरचना, सर्जनशीलता आणि अंमलबजावणी या घटकांचा समावेश आहे. विद्यार्थी गोष्टी आणि संकल्पनांचा विचार करून गेम्स यशस्वी का होतात, याचे विश्लेषण करतात. यानंतर गेम संकल्पनेपासून त्याचे प्रकाशन, कथा आरेखन, गेमप्ले आणि पात्रांचे अर्क आणि त्यातून नवे जग निर्माण करण्यासाठी त्यांची जोडणी, असे गेम विकसन केले जाते. गेम डिझाइन आणि विकसनाचे सर्वंकष आकलन हा पदवी अभ्यासक्रम देतो. एनिमेशन आणि आधुनिक प्रोग्रामिंग सॉफ्टवेअरचा वापर करून गेम डिझाइन आणि विकसन शिकण्याच्या जोडीनेच विद्यार्थी कथाकथन आणि इलस्ट्रेशन कौशल्येही विकसित करतात. उद्योगातील तज्ज्ञांकडून विद्यार्थी गेमिंग जगतातील सखोल ज्ञान प्राप्त करतात. आधुनिक सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानाचा वापर करून मॉडेलिंग, टेक्स्चरिंग आणि गेम इंजिन इंटिग्रेशनसारखी गेम आर्ट तंत्रेही ते विकसित करतात.

## बॅचलर ऑफ डिझाइन इन एनिमेशन आर्ट अँड डिझाइन

विद्यार्थ्यांना सभोवतालच्या जगाच्या निरीक्षणांतून प्रेरणा घेऊन पात्रे आणि गोष्टी सुचाव्यात, अशा पद्धतीने या विशेष अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. कल्पक विचार कसा करायचा आणि विविध टप्प्यांत कल्पना कशा विकसित करायच्या हे शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. पात्रांचा गोष्टीतील विकास, कथ्य आणि सादरीकरण यावरही भर दिला जातो. बॅचलर ऑफ डिझाइन इन एनिमेशन आर्ट अँड डिझाइन या पदवी अभ्यासक्रमामध्ये चित्रकला, त्रिमिती, व्हिज्युअल आर्ट, शिल्पकला, कथाकथन आदी घटकांचा समावेश होतो. या चार वर्षांच्या अभ्यासक्रमात चित्रकृती, विश्लेषणात्मक विचार आणि कथाकथन कौशल्ये विकसित करण्यावर भर आहे.

विद्यार्थ्यांना एनिमेशन चित्रपटनिर्मितीतील पारंपरिक आणि आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळावे, अशीही या अभ्यासक्रमाची रचना आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे एनिमेशन उद्योग विस्तारत असून, तेथे कुशल व्यावसायिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना एनिमेशन चित्रपटनिर्मितीतील योग्य कौशल्ये आणि ज्ञान दिले जाते. प्रगत एनिमेशन कौशल्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रपट, दूरचित्रवाणी, जाहिरात आदी विविध माध्यमांसाठीचा नैसर्गिक आशय सर्जनशीलपणे निर्माण करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते. दीर्घ मुदतीचा हा अभ्यासक्रम असून, विद्यार्थ्यांना मल्टीमीडिया आणि एनिमेशन उद्योगात यशस्वी करिअर करण्यासाठी सज्ज केले जाते.

## मास्टर्स इन एनिमेशन आर्ट अँड डिझाइन

विश्वकर्मा विद्यापीठातील मास्टर्स इन एनिमेशन आर्ट अँड डिझाइन हा अभ्यासक्रम उद्योगातील दिग्गजांनी अतिशय विचारपूर्वक आखला आहे. पदवी अभ्यासक्रमात शिकलेल्या कौशल्यांचा वापर करून पारंपरिक एनिमेशन, मिक्स्ड मीडिया एनिमेशन, एक्स्परिमेन्टल एनिमेशन, एनिमेशनचे विविध प्रकार आणि विविध माध्यमांत एनिमेशनचा वापर यांतील आकलन वाढविण्याचे काम हा अभ्यासक्रम करतो. हे सर्व तंत्रज्ञान, इतिहास, कलात्मक कौशल्ये, सैद्धान्तिक संकल्पना आणि उद्योगांतील पद्धतींशी संबंधित आहे. एनिमेशनमधील मास्टर्स पदवीसाठी विद्यार्थ्यांना कलात्मक कौशल्ये, व्यवस्थापकीय कौशल्ये आणि तांत्रिक कौशल्यांच्या योग्य मिश्रणाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे उद्योगांतील अनेकांना हे विद्यार्थी केवळ सर्जनशील नाही, तर विश्लेषण क्षमता चांगली असलेले आहेत, असे आढळते. यामुळे पदवीधर केवळ एनिमेशन उद्योगांतच नाही, तर मल्टीमीडिया आणि एनिमेशन वापरल्या जाणाऱ्या इतर उद्योगांतही अधिक रोजगारक्षम होतात.







# लघु मुदतीचे अभ्यासक्रम



## लघु मुदतीचे अभ्यासक्रम

लघु मुदतीचे अभ्यासक्रमांसाठी विश्वकर्मा विद्यापीठात स्वतंत्र विभाग आहेत. विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय अध्ययन संधी मिळाव्यात, असे विश्वकर्मा विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक साधने मिळावीत; तसेच चांगल्या पद्धतीने संशोधन करून तयार केलेल्या लघु अभ्यासक्रमांचा एक विस्तृत पर्याय मिळावा, असा आमचा मानस आहे.

आंतरविद्याशाखीय पाठ्यक्रमाद्वारे अध्यापनाच्या अधिक सक्षम संधी निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यास गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी लघु अभ्यासक्रम उपयुक्त ठरतात. विशेष कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना त्यांची आवड जोपासण्यासाठी अवकाश मिळावे, असा विश्वकर्मा विद्यापीठाच्या लघु मुदतीच्या अभ्यासक्रम विभागाचा हेतू आहे. असा अद्ययावत कौशल्यसंच हा कालसुसंगत असून, विश्वकर्मा विद्यापीठाच्या वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी असलेल्या शिक्षकवर्गाकडून तो शिकवला जातो. विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम पूर्ण करताना प्रारूप आराखड्यानुसार नेमून दिलेले श्रेयांक मिळविण्यास हे लघु अभ्यासक्रम साह्यभूत ठरतात. ज्या विद्याशाखेचा अभ्यासक्रम विद्यार्थी करतात, त्याच्याशी सुसंगत वैकल्पिक लघु अभ्यासक्रम निवडण्याची मुभा मिळत असल्याने अध्ययनात लवचीकता येते. विद्यार्थ्यांनी आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम करावेत, असाही याचा उद्देश आहे. एका विद्याशाखेद्वारे जी समस्या सुटू शकत नाही किंवा मूलभूत आकलन अधिक पक्के करण्यासाठी दोन वा अधिक विद्याशाखांचा अभ्यास करावा लागतो अशा वेळी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनामुळे फायदा होतो. संकल्पना, सैद्धान्तिक तत्त्वे, तंत्रे आणखी पक्की करण्यासाठीही याचा फायदा होतो आणि विद्यार्थ्याचा सर्वंकष विकास साधला जाऊन तो उद्योगांत काम करायला सज्ज होतो. जगभरातील बहुतांश विद्यापीठांत आंतरविद्याशाखीय ज्ञानाचा विद्यार्थ्यांना त्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्या नाही, तर सर्वंकष विकासाच्या दृष्टीने त्याचा फायदा होत असल्याचे आढळले आहे. विद्यार्थ्यांमध्ये निरंतर शिकण्याची वृत्ती तयार होण्यासाठी लागणारी मानसिक लवचीकता या लघु अभ्यासक्रमांतून तयार होते. अत्यंत क्लिष्ट समस्या सोडविण्यासाठी लागणारा सर्वंकष दृष्टिकोन तयार होण्यासाठी बौद्धिक चालना देण्याचे काम हे अभ्यासक्रम करतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर या कल्पनांची देवाण-घेवाण शक्य आहे. आवड जोपासण्यासाठीही हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत. नॉर्थ-वेस्टर्न, हार्वर्ड, एमआयटी आदी जगभरातील आघाडीची महाविद्यालये, विद्यापीठे आंतरविद्याशाखीय विषयांतील लघु अभ्यासक्रम राबवतात. सध्याच्या शैक्षणिक पार्श्वभूमीवर या लघु अभ्यासक्रमांची किती गरज आहे, हेच यातून अधोरेखित होते.

विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या विभागाव्यतिरिक्त अधिकृतपणे इतर विषय शिकण्याची; तसेच स्वतंत्र श्रेयांकही मिळविण्याची मुभा हे लघु मुदतीचे अभ्यासक्रम देतात. मूळ पदवीला आणखी मूल्य देण्यासाठी; तसेच ज्या क्षेत्रातील लघु अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्यातील संधींचे दार खुले करण्यासाठीही या लघु अभ्यासक्रमांचा उपयोग होतो. आंतरविद्याशाखीय संशोधन करण्याचे पुरेसे ज्ञान मिळविण्याबरोबरच त्या-त्या विषयांतील उच्च शिक्षण घेण्याची वाटही या लघु अभ्यासक्रमांतून दिसू शकते. एखाद्या विषयात खरोखरच आवड आहे म्हणून कोणत्याही ध्येयाविना लघु मुदतीचे अभ्यासक्रम निवडणे शक्य असले, तरी मूळ पदवी अभ्यासक्रमाला पूरक संशोधनाभिमुख आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून उपयोगी पडतील असे किंवा कोणताही अभियंता वा शास्त्रज्ञाला सर्वसामान्यपणे उपयोगी पडतील असे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी निवडावेत. विद्यापीठातील विविध विद्याशाखांतील 18 ते 20 श्रेयांक विद्यार्थ्यांनी मिळवल्यास लघु अभ्यासक्रम हे एक अतिरिक्त प्रमाणीकरण प्राप्त होते.

## लघु मुदतीचे अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहेत...

| विद्याशाखा | विश्वकर्मा विद्यापीठाचे विभाग | लघु अभ्यासक्रम |
|---|---|---|
| विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | संगणक विज्ञान विभाग | वेब अँड मोबाइल एप्लिकेशन डेव्हलपमेंट |
| | संगणक अभियांत्रिकी विभाग | सायबर सुरक्षा;<br>इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी);<br>व्हर्च्युअल अँड ऑगमेंटेड रिएलिटी;<br>डेटा सायन्स |
| | यांत्रिक अभियांत्रिकी विभाग | रोबोटिक्स; इलेक्ट्रिक वाहने |
| | संख्याशास्त्र विभाग | डेटा एनॅलिटिक्स |
| मानव्यविद्या आणि समाजविज्ञान विद्याशाखा | ट्रॅव्हल अँड टुरिझम विभाग | पर्यटन व्यवस्थापन |
| औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा | | औषधनिर्माण विज्ञान |
| वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | एमबीए | फिनटेक;<br>सार्वजनिक धोरण आणि प्रशासन;<br>हेल्थकेअर व्यवस्थापन;<br>नेतृत्व व्यूहरचना;<br>कृषीव्यवसाय व्यवस्थापन;<br>ग्राहकसंबंध व्यवस्थापन;<br>डिजिटल मार्केटिंग;<br>प्रकल्प व्यवस्थापन;<br>सेवा व्यवस्थापन |
| | बीबीए | पर्यावरणीय अर्थशास्त्र आणि शाश्वत विकास;<br>कौटुंबिक व्यवसाय |
| स्कूल ऑफ आर्ट अँड डिझाइन | | डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन्स |
| माध्यमे आणि जनसंज्ञापन विद्याशाखा | जनसंज्ञापन अभ्यास विभाग | मीडिया ऑम्नीबस |

## अभ्यागत व्याख्यान

तुम्ही कोणताही अभ्यासक्रम निवडा, अभ्यागत व्याख्यानांना खूप महत्त्व आहे, असा आमचा विश्वकर्मा विद्यापीठाचा विश्वास आहे. विद्यार्थी अधिक प्रभावीपणे शिकू शकतात; तसेच दुसरा दृष्टिकोनही समोर येतो. उद्योगांत काम करणारे व्यावसायिक आणि त्या विषयातील तज्ज्ञ विविध दृष्टिकोन यातून मांडू शकतात. सध्याच्या व्यावसायिक जगात काय स्थिती आहे, याबाबतची जाणीव अभ्यागत व्याख्याते विद्यार्थ्यांना देऊ शकतात. विद्यार्थी वर्गातील शिक्षणात संकल्पना शिकू शकतात; पण अभ्यागत व्याख्याते प्रत्यक्ष काम करताना कोणत्या समस्या येतात याविषयी तसेच त्यावर उपाय काय करायचे, याबाबतही आपले अनुभव मांडू शकत असल्याने त्या विषयाचा व्यापक दृष्टिकोन विद्यार्थ्यांसमोर येऊ शकतो. बीजभाषण करणारे असे वक्ते विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा यशाचा प्रवास सांगू शकतात; तसेच त्यांना मोठे होण्यासाठीची प्रेरणाही देऊ शकतात. यशस्वी उद्योजक, माजी विद्यार्थी यांच्याशी विद्यार्थी संवाद साधतात, तेव्हा त्यांना त्यांच्या संघर्षाची जाणीव होते आणि त्यांच्या प्रवासातून शिकत त्यांना त्यांच्या आयुष्यात येऊ शकणाऱ्या संघर्षाचीही तयारी करता येते. विद्यार्थ्यांना नैमित्तिक वर्गातील शिक्षण अनेकदा कंटाळवाणे वटू शकते. अभ्यागत व्याख्याने हा एकसुरीपणा मोडून विद्यार्थ्यांना नवनव्या क्षेत्रातील करिअरवाटांची ओळख करून देतात. नव्या करिअरवाटांची ओळख आत्मविश्वास वाढविण्यास प्रोत्साहन देते; तसेच विद्यार्थ्यांना सैद्धान्तिक संकल्पना आणि जोडीने प्रत्यक्ष कामाचीही कल्पना देते, जी नियमित अभ्यासक्रमात होईलच असे नाही. प्रत्यक्ष कामात सैद्धान्तिक संकल्पनांत होणारे बदल जाणून घेणे विद्यार्थ्यांसाठी औत्सुक्याचे असते. विद्यार्थ्यांना एका नव्या शिक्षकाकडून शिकायला मिळते; शिवाय अध्यापन आणि अध्ययनाच्या नव्या पद्धतीही अनुभवता येतात. हाच सगळा विचार करून आमचे सगळे विभाग अनेक अभ्यागत व्याख्याने आयोजित करतात. त्या-त्या क्षेत्रातील प्रगत संकल्पना माहीत असलेल्या तज्ज्ञांकडून ती दिली जातात. विश्वकर्मा विद्यापीठात आयोजित अभ्यागत व्याख्यानांची यादी पुढीलप्रमाणे...



## उद्योगांतील व्याख्याते

| अभ्यागत व्याख्यानाचे शीर्षक | व्याख्यात्याचे नाव | पदनाम | कंपनीचे नाव |
|---|---|---|---|
| इंटिग्रेटिंग एचआर स्ट्रॅटेजी विथ बिझनेस | श्री. जितेंद्र पातुरकर, एचआर व्यावसायिक, पुणे | एचआर | स्वतंत्र व्यावसायिक |
| बेसिक्स ऑफ इनोव्हेशन अँड सेक्टोरल इनोव्हेशन | श्री. आदर्श भार्गव, सरव्यवस्थापक | माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ | विप्रो, यूएसए |
| सोलो टू पब्लिक – जर्नी ऑफ एन आंत्रप्रेन्युअर | श्री. विजयकुमार क्षीरसागर, अध्यक्ष व कार्यकारी संचालक | उत्पादन उद्योग तज्ज्ञ | आरएम ड्रिप अँड स्प्रिंकलर्स लि. यूएसए |
| अजाइल प्रोजेक्ट मॅनेजमेंट | संग्राम खरे, वरिष्ठ व्यवस्थापक | उत्पादन उद्योग तज्ज्ञ | एआय फुतैम, दुबई |
| गोल्ड मार्केट | श्री. वास्तुपाल रांका | दागिने उद्योग तज्ज्ञ | रांका ज्वेलर्स |
| गेमिफिकेशन | राजीव चौधरी | माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ | गेमिफिकेशन कंपनी |
| चेंजिंग मार्केट डायनॅमिक्स इन आयटी इंडस्ट्री | दीपक जुगूलार सहयोगी संचालक | माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ | कॉग्निझंट पुणे |
| लीन स्टार्टअप – कॅनव्हास | श्री. निखिल जैन | शिक्षण सेवा | फॉरीन एडमिट्स |
| हाउ फायनान्शिअल मार्केट्स वर्क : बाँड, कमोडिटिज अँड डेरिव्हेटिव्ह्ज | श्री. सुधाकर कुलकर्णी | सल्लागार | सल्लागार, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे पोलिस |
| मेंटल हेल्थ ऑफ एलजीबीटीक्यू कम्युनिटी | डॉ. अरबाज मुश्ताक | उद्योग तज्ज्ञ | संस्थापक, सायहेल्प क्लिनिक |
| रेमेडियल एज्युकेशन | इशिता थिटे | प्रतिनिधी | संस्थापक, ग्रो टू फ्लाय |
| स्पोर्ट्स सायकॉलॉजी | श्री. मनेश नम्बियार | उद्योग तज्ज्ञ | ट्रायथलॉन, आयर्नमॅन ऑफ मलेशिया |
| इंट्रोडक्शन टू सायकोपॅथॉलॉजी | पूर्वा कडगांची | संस्थापक | टेंडिंग माइंड्स |

| अभ्यागत व्याख्यानाचे शीर्षक | व्याख्यात्याचे नाव | पदनाम | कंपनीचे नाव |
|---|---|---|---|
| सेक्शुअल डिसऑर्डर्स | डॉ. राजीव नगरकर | फ्रीलान्स मानसतज्ज्ञ | |
| टर्निंग इंटरनेट ऑफ थिंग्ज इनटू रिएलिटी | श्री. शरद कांती | क्लाउड सोल्युशन आर्किटेक्ट | आयओटी मायक्रोसॉफ्ट |
| सिक्स सिग्मा ग्रीन बेल्ट अवेअरनेस | डॉ. संजीवा राव | सीईओ, एसक्यूसी कन्सल्टंट्स आणि माजी राष्ट्रीय अध्यक्ष | एनआयक्यूआर |
| इमर्जिंग ट्रेंड्स इन स्टॅटिस्टिक्स विथ स्पेशल रेफरन्स टू एप्लिकेशन्स इन पब्लिक अँड प्रायव्हेट सेक्टर | प्रीती पंधू | संस्थापक आणि संचालक | डेटा सायन्स लॅब कन्सल्टिंग प्रा. लि. |
| आयबीएम एसएमई लेक्चर्स | आयबीएम रिसोर्स पर्सन | - | आयबीएम |
| कॅम्पस फ्रान्स : हायर एज्युकेशन अँड स्कॉलरशिप अपॉर्च्युनिटीज इन फ्रान्स | कॅम्पस फ्रान्स | - | कॅम्पस फ्रान्स |
| कम्युनिकेशन एथिक्स अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट | श्री. स्वप्नील इंगळे | एनिमेशन तज्ज्ञ | टेक्रोकलर इंडिया |
| एक्टिंग फॉर थ्री-डी एनिमेशन | श्री. विवेक बोरीकर | क्रिएटिव्ह संचालक | रिओ एनिमेशन, पुणे |
| स्किलिंग, अपस्किलिंग अँड रिस्किलिंग फॉर फार्मा इंडस्ट्री | सचिन कुंभोजे | सहसंस्थापक आणि सीईओ | ऑप एक्स एक्सिलरेटर प्रा. लि., प्लॅन बी डिजिटल स्टार्ट अप मीडिया |
| पिव्होटल अपॉर्च्युनिटी फॉर फार्मसी टू स्पीअरहेड द टेक्टॉनिक शिफ्ट इन ग्लोबल हेल्थ एपिसेंटर फ्रॉम एस्कलेटिंग डिसऑर्डर टू वेलनेस अँड वेल | डॉ. प्रफुल्ल नाईक | संस्थापक संचालक आणि सीईओ | प्रशाक टेक्नो एंटरप्राइझेस प्रा. लि. |





| अभ्यागत व्याख्यानाचे शीर्षक | व्याख्यात्याचे नाव | पदनाम | कंपनीचे नाव |
|---|---|---|---|
| एन्हान्सिंग स्किन पर्मिएशन ऑफ द स्मॉल अँड मॅक्रो मॉलेक्यूल युजिंग पॅसिव्ह अँड एक्टिव्ह एन्हान्समेंट टेक्निक्स | डॉ. योगेश्वर बच्छाव | संचालक | एडेक्स फार्मास्युटिकल कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, मुंबई |
| इन्शुरन्स सेक्टर इन इंडिया | श्री. अमोल सावरखांदे | विमा तज्ज्ञ | एचडीएफसी लाइफ |
| डिस्कशन ऑन इन्व्हेस्टमेंट्स अँड इन्फ्लेशन इन इंडिया | श्री. गणेश मुदलियार | उपाध्यक्ष (विक्री) | एचएसबीसी |
| इंडियन लेबर मार्केट | श्री. मकरंद कुलकर्णी | व्यवसाय विकास व्यवस्थापक | व्हिजन इंडिया |
| पोस्ट कोव्हिड इकॉनॉमी : चॅलेंजेस अँड अपॉर्च्युनिटीज | श्री. प्रवीणकुमार वर्मा | मार्केटिंग टीम | फ्लीटगार्ड फिल्टर्स |
| रोबोटिक्स सेशन | श्री. खरे | उद्योग तज्ज्ञ | - |
| इंट्रोडक्शन टू जॅपनीज | सुजाता कोळकर आणि संतोष साळी | प्रतिनिधी | पगमार्क |







## शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील व्याख्याते

| अभ्यागत व्याख्यानाचे शीर्षक | व्याख्यात्याचे नाव | पदनाम | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| एन्व्हायर्न्मेंटल लॉ अँड टुरिझम | चंद्रशेखर एम. वानखेडे | काँट्रिब्युटरी असिस्टंट प्रोफेसर, उपसंपादक, कार्यकारी संपादक | जनसंज्ञापन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर, लोकमत टाइम्स, नर्चरिंग एज |
| करिअर अपॉर्च्युनिटीज इन रिस्पॉन्सिबल टुरिझम... एन आंत्रप्रेन्युअर पर्स्पेक्टिव्ह | डॉ. ए. लाजवंती नायडू | सहायक संचालक, क्षमतावृद्धी | आंध्र प्रदेश पर्यटन प्राधिकरण |
| अजंठा केव्ह्ज : आर्ट, एप्रिसिएशन अँड मॅनेजमेंट | डॉ. माधुरी सावंत | संचालक आणि सहायक प्राध्यापक | इंटरनॅशनल सेंटर फॉर बुद्धिस्ट टुरिझम, पर्यटन प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ |
| वर्ल्ड हेरिटेज इन डेंजर | डॉ. राजेश रगडे | संचालक, पर्यटन प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | पर्यटन प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ |
| ट्रेंड्स इन न्यूरो कॉग्निटिव्ह सायन्स | डॉ. अमरेंद्र सिंग | अलाहाबाद विद्यापीठ, अशोका विद्यापीठ | पोस्ट-डॉक्टोरल डीएसटी-सीएसआरआय, अलाहाबाद विद्यापीठ |
| कॉन्फिडन्स – द की टू कन्व्हर्ट ए क्रायसिस इनटू एन अपॉर्च्युनिटी | बतुल बालासिनोरवाला | सहसंस्थापक | बी आर फिनिशिंग स्कूल, कर्वेनगर, पुणे |
| व्हॉट इज इंटरेस्टिंग? फिजिक्स!! | डॉ. सिद्धलिंगेश्वर बी. | अध्यापक | एम. एस. रामय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, विद्या सौंधा, बेंगळुरु |
| इंजिनीअरिंग फिजिक्स फॉर टेक्नॉलॉजी अँड सोसायटी | डॉ. उदयकुमार खडके | अध्यापक | व्हीएसके विद्यापीठ, बेल्लारी |
| केमिस्ट्री फॉर इंजिनीअर्स | डॉ. सी. सर्वानन | अध्यापक | प्रेसिडेन्सी विद्यापीठ, बेंगळुरु |

| अभ्यागत व्याख्यानाचे शीर्षक | व्याख्यात्याचे नाव | Designation | Name of Organization |
|---|---|---|---|
| द रोल ऑफ मॅथेटिक्स इन इंजिनीअरिंग | डॉ. एन. संदीप | अध्यापक | केंद्रीय विद्यापीठ, कडागांची, कलबुर्गी |
| इमर्जिंग ट्रेंड्स इन स्टॅटिस्टिक्स विथ स्पेशल रेफरन्स टू एप्लिकेशन्स इन पब्लिक अँड प्रायव्हेट सेक्टर | प्रा. (डॉ.) मुरली धर | प्राध्यापक | इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस (स्वायत्त संस्था, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय) |
| सरफेस अँड इंटरफेशियल फिनॉमिनन : बेसिक कन्सेप्ट्स अँड एप्लिकेशन्स | डॉ. वंदना पत्रावळे | प्राध्यापक, औषधनिर्माणविज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग | इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी |
| एडव्हेंचर्स इन ड्रग डिस्कव्हरी | डॉ. प्रशांत आर. मुरुमकर | सहायक प्राध्यापक, औषधनिर्माणशास्त्र विभाग | द महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा, गुजरात |
| प्लॅनिंग द करिअर इन फार्मसी | डॉ. आनंद महाजन | सहयोगी प्राध्यापक | गोवा कॉलेज ऑफ फार्मसी |
| क्रिएटिव्ह मूव्हमेंट थेरपी | मुग्धा शिवपूरकर | तज्ज्ञ | उद्योग |
| इंट्रोडक्शन टू डी-एडिक्शन | श्री. इंद्रजित देशमुख | अध्यापक | प्रॅक्टिकल लाइफ स्किल्स |
| ब्रेसिंग टू गेट इनटू कॉर्पोरेट वर्ल्ड | श्री. सचिन कुलकर्णी | तज्ज्ञ | उद्योग |
| फायनान्शिअल सेक्टर इन इंडिया | डॉ. सोनाली परचुरे | अध्यापक | - |
| इंट्रोडक्शन टू कम्प्युटर इंजिनीअरिंग डिपार्टमेंट (एफवाय इंडक्शन) | डॉ. एस. एस. पवळे, प्रा. एन. झेड. तारापोर | प्राध्यापक | विश्वकर्मा विद्यापीठ शिक्षक |
| पॉवर ऑफ कम्पाउंडिंग (एफवाय इंडक्शन) | प्रा. एन. झेड. तारापोर | प्राध्यापक | विश्वकर्मा विद्यापीठ शिक्षक |
| इंटरनॅशनल एक्स्पोजर अपॉर्च्युनिटीज (एफवाय इंडक्शन) | डॉ. कैलास पाटील | प्राध्यापक | विश्वकर्मा विद्यापीठ शिक्षक |

१०



# संशोधन, अभिनवता आणि उद्योजकता

## लघु मुदतीचे अभ्यासक्रम

शिक्षक, संशोधक, विद्यार्थी आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या इतर सर्व कर्मचाऱ्यांमध्ये संशोधन वृत्ती रुजवून संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यास विश्वकर्मा विद्यापीठ कटिबद्ध आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे सहकार्य करण्याचा विश्वकर्मा विद्यापीठाचा प्रयत्न आहे

- **अ) प्रशिक्षणासाठी शिक्षकांची रवानगी/एसटीटीपी/कार्यशाळा/सेमिनार**
- **ब) शोधनिबंध प्रकाशनासाठी वित्तसाह्य**
- **क) संसाधनांना चालना**

## विश्वकर्मा विद्यापीठ संशोधन साह्य

मानवी क्षमतेची वृद्धी ही विश्वकर्मा विद्यापीठाची दृष्टी असून, उच्च दर्जाच्या संशोधनासाठीचा पाया विद्यापीठ रचते आहे. यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेणारे किंवा सरकारी वा अशासकीय संस्थांना संशोधन प्रस्ताव देणारे शिक्षक, संशोधक, विद्यार्थी आणि विद्यापीठाच्या इतर कर्मचाऱ्यांना वित्तसाह्य देण्याबाबत विश्वकर्मा विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. तरुण शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी संशोधन हाती घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विश्वकर्मा विद्यापीठातर्फे संशोधन निधी दिला जातो.

## विश्वकर्मा विद्यापीठातील पेटंट

| शिक्षकाचे नाव | पेटंट क्रमांक | पेटंटरचे नाव |
|---|---|---|
| डॉ. कैलास पाटील | 201921046386 | सिस्टीम अँड प्रोसेस फॉर इंटेलिजंट वेस्ट मॅनेजमेंट इन व्हेइकल |
| डॉ. कैलास पाटील | 201921046385 | सिस्टीम अँड प्रोसेस फॉर डिजिटल अँड ऑटोमेटेड हॉस्पिटॅलिटी |
| डॉ. कैलास पाटील | 201921046384 | सिस्टीम अँड प्रोसेस फॉर डिजिटल अँड ऑटोमेटेड मोबिलिटी |
| डॉ. भारती ऐनापुरे | 2020101968 | लो लेव्हल इन्स्ट्रुमेंटेशन लेयर फॉर कम्पोनन्ट लेव्हल डायग्नोसिस ऑफ फेल्युअर इन इंडस्ट्री आयओटी सिस्टीम्स |
| डॉ. भारती ऐनापुरे | 2020103055 | एडाप्टिव्ह डेटा रेट कॉन्फिगरेशन फॉर अल्ट्रा-डेन्झ इंडस्ट्रीयल आयओटी नेटवर्क्स युजिंग डीप लर्निंग अल्गोरिदम्स |
| रंजन सी. खुंट, विजय एम. खेडकर, कौशिककुमार एस. लुणगारिया, ज्योती एन. गोहेल, कौशिक डी. पंभार | 201821043831 | क्रोमेन कम्पाउंड्स एज अँटी-कॅन्सर एजंट्स |

AAI - Artificial Analytical Intelligence (GRIFFIN)



Patent Filling No: 201921046387

Digital and Automated Mobility



Patent Filling No: 201921046384

Digital and Automated Hospitality



Patent Filling No: 201921046385

Smart Cooling Shoes



Patent Filling No: 201921046388

Intelligent Waste Management in Vehicle



Patent Filling No: 201921046386

SAP i360 Student Innovations

SELECTED IN ZEE BUSINESS AWARD FUNCTION
STUDENT PRESENTATIONS, FIRST OF ITS KIND IN SUCH A FORUM

# विश्वकर्मा विद्यापीठ – शोधनिबंध प्रकाशन

| शोधनिबंधाचे शीर्षक | शिक्षकाचे नाव | नियतकालिकाचे नाव |
|---|---|---|
| ए कम्पॅरिटिव्ह स्टडी ऑफ स्पोर्ट्स मेंटल टफनेस बिटवीन स्पोर्ट्स प्लेयर्स परफॉर्मिंग अँड नॉट फॉर्मिंग एडिशनल फिटनेस एक्टिव्हिटी फ्रॉम गोवा | मोराजकर ए. आणि नवले आर | इंटरनॅशनल जर्नल ऑफ फिटनेस हेल्थ, फिजिकल एज्युकेशन अँड आयर्न गेम्स |
| एक्स्प्लोरिंग डेंटल एन्क्झायटी अमंग मेल अँड फिमेल अक्रॉस एडोलसन्ट्स, यंग एडल्ट्स अँड मिडल एडल्ट्स | बानो एस., अहमद एस. ए. आणि व्यास के. | जर्नल ऑफ डेन्टल रिसर्च अँड रिव्ह्यू |
| सीएसके-ईडी : क्रिप्टोग्राफी सिक्रेट की जनरेशन फॉर इव्हजड्रॉपिंग डिटेक्शन युजिंग क्रिप्टो मेकॅनिझम | रामकुमार कृष्णमूर्ती | डिझाइन इंजिनीअरिंग |
| प्रोग्नॉसिस ऑफ कोव्हिड-19 पेशंट्स विथ मशिन लर्निंग टेक्निक्स | रेश्मा पिसे | एनल्स ऑफ द रोमानियन सोसायटी फॉर सेल बायोलॉजी |
| झिग्बी अँड लाँग-रेंज आर्किटेक्चर बेस्ड मॉनिटरिंग सिस्टीम फॉर ऑइल पाइपलाइन मॉनिटरिंग विथ द इंटरनेट ऑफ थिंग्ज | ममून रशीद | सस्टेनिबिलिटी |
| एनॅलिसिस अँड कॅरक्टरायझेशन ऑफ कोव्हिड-19 युजिंग सीटी चेस्ट इमेजेस अँड डीप न्यूरल नेटवर्क्स | ममून रशीद | कम्प्युटर्स, मटेरियल्स अँड कॉन्टिन्युआ |
| ब्लॉकचेन एनेबल्ड ऑटोमॅटिक रिवॉर्ड सिस्टीम इन सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट | ममून रशीद | सिक्युरिटी अँड कम्युनिकेशन नेटवर्क्स |
| क्लस्टरिंग आयसोलेटेड नोड्स टू एन्हान्स नेटवर्क्स लाइफ टाइम ऑफ डब्ल्यूएसएन्स फॉर आयओटी एप्लिकेशन्स | ममून रशीद | आयईईई सिस्टीम्स जर्नल |
| वॉटर क्वालिटी मॉनिटरिंग अँड मॅनेजमेंट ऑफ बिल्डिंग वॉटर टँक युजिंग इंडस्ट्रीयल इंटरनेट ऑफ थिंग्ज | ममून रशीद | सस्टेनिबिलिटी |
| डीप लर्निंग अप्रोच फॉर डिस्कव्हरी ऑफ इन सिलिको ड्रग्ज फॉर कॉम्बॅटिंग कोव्हिड-19 | ममून रशीद | जर्नल ऑफ हेल्थकेअर इंजिनीअरिंग |
| ऑटोमॅटिक पीव्ही ग्रिड फॉल्ट डिटेक्शन सिस्टीम विथ आयओटी अँड लॅबव्ह्यू एज डेटा लॉगर | ममून रशीद | कम्प्युटर्स, मटेरियल्स अँड कॉन्टिन्युआ |
| सीपी-बीडीएचसीए : ब्लॉकचेन-बेस्ड कॉन्फिडेन्शिएलिटी-प्रायव्हसी प्रीझर्व्हिंग बिग डेटा स्कीम फॉर हेल्थकेअर क्लाउड्स अँड एप्लिकेशन्स | ममून रशीद | आयईईई सिस्टीम्स जर्नल |
| डिस्टन्स बेस्ड पॅटर्न ड्रिव्हन मायनिंग फॉर आउटलिअर डिटेक्शन इन हाय डायमेन्शनल बिग डेटासेट | ममून रशीद | ट्रॅन्झॅक्शन्स ऑन मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टीम्स |

| शोधनिबंधाचे शीर्षक | शिक्षकाचे नाव | नियतकालिकाचे नाव |
|---|---|---|
| आयओटी अँड एलओआरए बेस्ड स्मार्ट लॅम्प पोस्ट फॉर इल्युमिनेटिंग स्मार्ट सिटीज | मामून रशीद | सस्टेनिबिलिटी |
| आयओएमटी बेस्ड फेशिअल इमोशन रेकग्निशन सिस्टीम युजिंग डीप कॉन्व्होल्युशन न्यूरल नेटवर्क्स | मामून रशीद | इलेक्ट्रॉनिक्स |
| इमेज-बेस्ड इन्फर्मेशन हाइडिंग अँड फोरेन्सिक्स बाय कॉन्व्होल्युशन न्यूरल नेटवर्क्स | मामून रशीद | आयईटी इमेज प्रोसेसिंग |
| एलओआरए-एलबीओ : एक्स्परीमेंटल एनॅलिसिस ऑफ एलओआरए लिंक बजेट ऑप्टिमायझेशन इन कस्टम बिल्ड आयओटी टेस्ट बेड फॉर एग्रीकल्चर 4.0 | मामून रशीद | एग्रोनॉमी |
| परफॉर्मन्स एनॅलिसिस ऑफ आयओटी अँड लाँग-रेंज रेडिओ बेस्ड सेन्सर नोड अँड गेटवे आर्किटेक्चर फॉर सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट | मामून रशीद | सेन्सर्स |
| सिक्युअर डेटा ट्रन्समिशन इन आयओटीज बेस्ड ऑन सीएलओजी एज डिटेक्शन | मामून रशीद | फ्युचर जनरेशन कम्प्युटर सिस्टीम्स |
| ब्लॉकचेन बेस्ड ऑटोमेटेड सिस्टीम फॉर आयडेंटिफिकेशन अँड स्टोअरेज ऑफ नेटवर्क | मामून रशीद | सिक्युरिटी अँड कम्युनिकेशन नेटवर्क्स |
| नॉव्हेल टेक्निक टू डिटेक्ट नेटवर्क एरर ऑर मॉडिफिकेशन ऑफ व्होट्स ड्युरिंग ट्रान्समिशन इन ऑनलाइन व्होटिंग सिस्टीम | मामून रशीद | जर्नल ऑफ डिस्क्रिट मॅथेमॅटिकल सायन्सेस अँड क्रिप्टोग्राफी |
| ए नॉव्हेल सोल्युशन फॉर फाइंडिंग पोस्टपार्टम हिमरेज युजिंग फजी न्यूरल टेक्निक्स | मामून रशीद | न्यूरल कम्प्युटिंग अँड एप्लिकेशन्स |
| एमनेट : ए फ्रेमवर्क टू रिड्युस फ्रुट इमेड मिसक्लासिफिकेशन | डॉ. कैलास पाटील | इंजिनीअरे दे सिस्टेम्स डी इन्फर्मेशन, व्हॉल्युम 26, नं. 2, पी.पी. 159-170, डीओआय : 10,18280/ आयएसआय.260203 |
| एनओटू पोल्युटंट कॉन्सन्ट्रेशन फोरकास्टिंग फॉर एअर क्वालिटी मॉनिटरिंग बाय युजिंग एन ऑप्टिमाइज्ड डीप लर्निंग बायडिरेक्शनल जीआरयू मॉडेल | डॉ. कैलास पाटील | इंडरसायन्स इंटरनॅशनल जर्नल ऑफ कम्प्युटेशनल सायन्स अँड इंजिनीअरिंग (आयजेसीएसई), व्हॉल्युम 24, नं. 1, डीओआय : 10.1504/आयजेसीएसई.2021.10036021 |
| प्रोग्नॉसिस ऑफ कोव्हिड-19 पेशंट्स विथ मशिन लर्निंग टेक्निक्स | भारती ऐनापुरे | एनल्स ऑफ द रोमानियन सोसायटी फॉर सेल बायोलॉजी |
| प्रायव्हेट क्लाउड कॉन्फिगरेशन युजिंग एमेझॉन वेब सर्व्हिसेस | भारती ऐनापुरे | टेक्चर नोट्स इन नेटवर्क्स अँड सिस्टीम्स बुक सीरीज (एलएनएनएस, व्हॉल्युम 190) |
| इमेज रिस्टोरेशन युजिंग रिसेंट टेक्निक्स : ए सर्व्हे | भारती ऐनापुरे | डिझाइन इंजिनीअरिंग |

| शोधनिबंधाचे शीर्षक | शिक्षकाचे नाव | नियतकालिकाचे नाव |
|---|---|---|
| ए रिव्ह्यू ऑन कन्व्हेन्शनल इलेक्ट्रॉनिक सर्व्हेलन्स सिस्टीम्स फॉर सिक्युरिटी प्रोव्हिजनिंग | भारती ऐनापुरे | जर्नल ऑफ ग्रीन इंजिनीअरिंग |
| एनॅलिसिस ऑफ डेटासेट इन प्रायव्हेट क्लाउड फॉर क्लाउड फोरेन्सिक्स युजिंग युकॅलिप्टस अँड हाडूप | भारती ऐनापुरे | आयईईई |
| इंटिग्रेटिंग लीन सिक्स सिग्ममा अँड डिझाइन थिंकिंग फॉर सुपीरिअर रिझल्ट्स | डॉ. कैलास पाटील | प्रोसिडिंग्ज ऑफ द 2020 इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रीयल अँड सिस्टीम्स इंजिनीअरिंग (आयआयएसई) कॉन्फरन्स ऑन इंजिनीअरिंग लीन अँड सिक्स सिग्मा (ईएलएसएस), यूएसए |
| ऑनलाइन लर्निंग फॉर प्रॅक्टिकल सब्जेक्ट्स (इन स्पेशल रेफरन्स टू कोव्हिड-19 ड्युरेशन) | डॉ. मुक्ता शिर्के | कोव्हिड-19 क्रायसिस अँड इंडिया |
| इम्पॅक्ट ऑफ कोव्हिड-19 ऑनल द इंडियन हायर एज्युकेशन | डॉ. श्रद्धा काजे | कोव्हिड-19 क्रायसिस अँड इंडिया |
| इम्पॅक्ट ऑफ ट्रॅडिशन्स ऑन इंडियन कन्टेम्परारी आर्ट | राखी गिरीश चरवड | डिझाइन इंजिनीअरिंग |
| रोल ऑफ इन्स्पिरेशन इन वारली आर्ट | प्रा. निशा खांडेकर | जर्नल ऑफ हाउझाँग युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी |
| स्टडी ऑफ कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट इन द फील्ड ऑफ इंटेरिअर डिझायनिंग इन इंडिया | प्रा. श्रद्धा जाधव | (व्हॉल्युम 11, इश्यु 41, जानेवारी टू मार्च 2021) |
| स्टडी ऑफ स्मार्ट फॅब्रिक्स इन इंटेरिअर डिझाइन अँड अपहोल्स्टरी | प्रा. श्रद्धा जाधव | व्हॉल्युम 8, इश्यू 29, जानेवारी टू मार्च 2021 |
| इमर्जिंग पेरिल ऑफ मॉब लिंचिंग इन इंडिया | सिद्धी सिंग | जर्नल फॉर एडव्हान्स्ड लॉ अँड ज्युरिसप्रुडन्स व्हॉल्युम 1 इश्यू 1 |
| क्लाउड कम्प्युटिंग लेजिस्लेशन इन इंडिया : नेसिसिटी ऑफ न्यू लॉज | सिद्धी सिंग | फास्ट फॉरवर्ड जस्टीस जर्नल, व्हॉल्युम III इश्यू III |
| मॉड्युलेशन ऑफ सोरायटिक-लाइक स्किन इन्फ्लमेशन बाय ट्रॅडिशनल इंडियन मेडिसीन दिव्य-कायाकल्प-वटी अँड ऑइल थ्रू अटेन्युएशन ऑफ प्रो-इन्फ्लमेटरी सायटोकिन्स | डॉ. सचिन सकट | जर्नल ऑफ ट्रॅडिशनल अँड कॉम्प्लिमेंटरी मेडिसीन |
| सिलेक्टिव्ह ऑप्टिमायझेशन ऑफ साइड एक्टिव्हिटीज एज एन एफिशियंट अप्रोच फॉर जनरेशन ऑफ न्यू लीड्स फ्रॉम ओल्ड ड्रग्ज | डॉ. प्रीती मेहता | जर्नल ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च इंटरनॅशनल |
| कोव्हिड-19 : एन अकाउंट ऑन नॉव्हेल करोनाव्हायरस डीसिज | डॉ. प्रीती मेहता | एनल्स ऑफ आर.एस.सी.बी |
| स्फॅरन्थस इंडिकस लिन.अफार्मालॉजिकल रिव्ह्यू | बिंदुराणी एल. जी., पी. राम, देवेंद्र शिरोळे | एशियन पॅसिफिक जर्नल ऑफ हेल्थ सायन्सेस |
| नॅनोडायमंड्स (कम्युनिकेटेड) | पल्लवी ढेकळे आदी | करंट ड्रग टारगेट्स |

# विश्वकर्मा विद्यापीठ – प्रकाशने – पुस्तके

| शिक्षकाचे नाव | पुस्तकाचे नाव/प्रकाशित प्रकरणे | परिषदेचे नाव | प्रकाशन संस्थाconference |
|---|---|---|---|
| पश्मिना शहा | लीगल आस्पेक्ट्स ऑफ फायनान्शिअल अँड सिक्युरिटी लॉज | - | निराली प्रकाशन, पुणे |
| रुपाली नवले | लाइफ सॅटिस्फॅक्शन ऑफ फिजिकली एक्टिव्ह अँड नॉन-एक्टिव्ह पीपल फ्रॉम गोवा | एलईएपी : लीड टू एक्सलन्स इन एथलेटिक परफॉर्मन्स | - |
| रुपाली नवले | बीहेविअर अँड एटिट्यूड टोवड्‌र्स डाएटरी सप्लिमेंट्स ऑफ जिम मेम्बर्स | द एपिडेमिक चॅलेंजेस अँड फ्युचर पर्स्पेक्टिव्ह ऑफ द फिजिकल फिटनेस, योगा प्रॅक्टिसेस अँड कॉम्पिटिटिव्ह स्पोर्ट्स | - |
| रामकुमार कृष्णमूर्ती | सायबर इंटेलिजन्स अँड इन्फर्मेशन रिट्रिव्हल | सायबर इंटेलिजन्स अँड इन्फर्मेशन रिट्रिव्हल – सायबर इंटेलिजन्स अँड इन्फर्मेशन रिट्रिव्हल प्रोसिडिंग्ज ऑफ सीआयआयआर 2021 | स्प्रिंगर, नेचर |
| डॉ. प्रीती मेहता | (एसओएसए) एज एन एफिशिअन्ट अप्रोच फॉर जनरेशन ऑफ न्यू लीड्स फ्रॉम ओल्ड ड्रग्ज : ए सिस्टेमॅटिक रिव्ह्यू | (एसओएसए) एज एन एफिशिअन्ट अप्रोच फॉर जनरेशन ऑफ न्यू लीड्स फ्रॉम ओल्ड ड्रग्ज : ए सिस्टेमॅटिक रिव्ह्यू | भारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली |
| डॉ. पूनम इनामदार आणि सोनाली मानवतकर | फ्लिप्ड – ब्लेंडेड लर्निंग मेथडॉलॉजी : ए कंटेम्परी आयसीटी टूल इन एज्युकेशन | - | भारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली |



# अभिनवता आणि नवोद्योग धोरण

विश्वकर्मा विद्यापीठाने स्थापनेपासूनच सर्वोत्तम मानवी, बौद्धिक आणि सामाजिक-आर्थिक भांडवलाची सहउभारणी करण्यासाठी झटण्याचे धोरण स्वीकारले आहे. बुद्धिवंत, विचारवंत आणि नेतृत्वगुण असलेल्यांची फळी उभी करण्याच्या दृष्टीने परिसंस्था तयार करणे हे विद्यापीठाचे एक महत्त्वाचे ध्येय आहे. ही मूलभूत तत्त्वे आणि बांधीलकी प्रत्यक्षात आणण्याकरिता स्थापन केलेले इन्क्युबेशन अँड इनोव्हेशन सेल (आयआयसी) याचीच ग्वाही देणारे आहे. कल्पनाशक्ती, अभिनवता, उद्योजकता आणि नवोद्योगांना व्हीयू-आयक्यूब उपक्रमांतर्गत प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विश्वकर्मा विद्यापीठाच्या आयआयसीची रचना करण्यात आली आहे. याची स्थापना 2019 मध्ये झाली. प्रभावी आर्थिक वृद्धी, व्यूहरचनात्मक मूल्ये आणि सामाजिक सुसंगत्व यासाठी योगदान देण्यावर आयआयसीचा भर आहे. विद्यापीठात कल्पना, इन्क्युबेशन आणि नवता रुजविण्यासाठी या उपक्रमांच्या माध्यमातून साह्यकारी परिसंस्था उभी करण्याचे विद्यापीठाचे ध्येय आहे. यातूनच देश आणि समाजासाठी प्रभावी, तंत्र-व्यावसायिकदृष्ट्या सक्षम, सुसंगत आणि संदर्भसज्ज व्यावसायिक प्रारुपे देण्याचा प्रयत्न आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी आणि शिक्षकांना नवोद्योगांसाठी प्रारंभापासून विस्तार करण्यापर्यंतचे; तसेच संशोधन प्रक्रियांचे उद्योगांत रुपांतर करण्यासाठी बिझनेस इन्क्युबेशनद्वारे सहकार्य करण्याचा आराखडा या धोरणातून आणि प्रक्रियेतून आखला गेला आहे.

या धोरणात नवता आणि उद्योजकता परिसंस्थेच्या विविध घटकांचा पुढील प्रकारे विचार करण्यात आला आहे.

**1. नवता आणि नवोद्योगांची रुजवणूक**
**2. संस्थेत विकसित तंत्रज्ञानांसाठीच्या उत्पादन मालकी हक्कांचे प्रशासन करणारी तत्त्वे**
**3. शिक्षकांच्या नवोद्यागांसाठी निकष**
**4. उद्योजकता विकासासाठी अध्यापन-अध्ययन**
**5. पात्रता आणि अर्जप्रक्रिया**
**6. सुविधा आणि सहकार्य**



कॉमनवेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर पार्टनर्स, यूके आणि जार्डिन्स कन्सल्टंट्स, यूके यांच्याबरोबर भागीदारी करून 2020 मध्ये हे केंद्र स्थापन करण्यात आले. विद्यार्थ्यांना; तसेच पदवीधर व व्यावसायिकांनाही ऑनलाइन आणि प्रत्यक्ष वर्गातील शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे उच्च, व्यावसायिक आणि कौशल्य शिक्षणात सर्वोत्तम ज्ञानप्राप्ती करता यावी, या उद्देशाने विज्ञान सेंटर ऑफ एक्सलन्स (व्हीसीई) सुरु करण्यात आले आहे. सुशिक्षित तरुण-तरुणींची संख्या वाढविण्यासाठी विद्यापीठ हा अभ्यासक्रम व्यापक स्तरावर उपलब्ध करून देणार आहे.

भारत, यूके आणि इतर राष्ट्रकुल देशांतील शैक्षणिक आणि कौशल्यविकास अभ्यासक्रम, संशोधन आणि नवता; तसेच खासगी क्षेत्र आणि उद्योगांसाठी संघटनात्मक क्षमतावृद्धी आदी द्विस्तरीय व बहुस्तरीय सहकार्य उपक्रमांना चालना देण्यासाठी व्हीसीई हे सहकार्य केंद्र असेल.



# सेंटर ऑफ ई-लर्निंग – व्हीयू डिजिटल

मानवी क्षमतावृद्धी या आपल्या ध्येयवाक्याला जागत विश्वकर्मा विद्यापीठ व्हीयू डिजिटल (व्हीयूडी) हा नवा उपक्रम सुरू करत आहे. विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या सर्वांसाठी लघु मुदतीचे लवचीक अभ्यासक्रम ई-लर्निंग पोर्टलद्वारे देणारा व्हीयूडी हा निरंतर शिक्षणासाठीचा उपक्रम आहे. भविष्यातील शैक्षणिक आराखडा, ज्याचे आम्ही 'एज्युकेशन 4.0' असे नामकरण केले आहे, त्यासाठी व्हीयूडीला एक मोठी परिसंस्था निर्माण करायची आहे. विविध घटकांना (उद्योग, शैक्षणिक आणि युवा बुद्धिमान मने) आपापले योगदान देण्याकरिता एकत्र आणण्यासाठी; तसेच व्हीयू डिजिटललाही काही परत देण्यासाठी हा आराखडा एक पाया म्हणून उपयुक्त ठरेल. व्हीयू डिजिटलमध्ये उच्च दर्जाचे सुसंगत अभ्यासक्रम, नावीन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धती आणि भविष्यवेधी तंत्रज्ञान साधने असतील. ई-लर्निंगमधील कल, गरजा आणि सदा सुसंगत राहण्यासाठी आवश्यक साधने आदींची कंपनीचालक आणि व्यावसायिकांकडून माहिती मिळविण्याची व्हीयूडीची कल्पना आहे. ही प्रक्रिया आमच्यासाठी सतत उत्क्रांत होत जाणारी असेल.

व्हीयूडी हे अध्ययन करणाऱ्यांना हवी असणारी कौशल्ये, विद्यापीठांकडून दिली जाणारी कौशल्ये आणि उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये यांना एकत्र आणणारे एक चुंबकीय क्षेत्र असेल.



व्हीयूडीमध्ये उद्योगविशिष्ट क्षेत्र, कंपनीविशिष्ट क्षेत्र, उच्च शिक्षण क्षेत्र, नवोद्योग क्षेत्र, तज्ज्ञ क्षेत्र, तंत्रज्ञान क्षेत्र, नागरिक क्षेत्र आणि सर्वप्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी स्व-मदत क्षेत्र अशी विविध क्षेत्रे असतील.

### उद्योगविशिष्ट क्षेत्र

- उद्योगातील एखाद्या विशिष्ट नोकरीकरिता अर्ज करण्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम
- निकषपूर्तीसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- उद्योगातील उभरते कल आणि नवतेसाठीचे अभ्यासक्रम

### कंपनीविशिष्ट क्षेत्र

- प्रत्येक कंपनीत जबाबदारी- श्रेणी- कौशल्य पातळी यानुसार अध्ययन अभ्यासक्रम असतात.
- कॉर्पोरेट प्रशासन आणि निकषपूर्तीतील सर्वसामान्य अभ्यासक्रम सर्वांसाठी सारखे असतात.

### उच्च शिक्षण क्षेत्र

- जागतिक पातळीवरील विद्यापीठांच्या सहकार्याने राबवले जाणारे अभ्यासक्रम
- या क्षेत्रात संकरित अभ्यासक्रम राबवले जाऊ शकतात.
- विषयविशिष्ट लघु अभ्यासक्रम

### नवोद्योग क्षेत्र

- तंत्रज्ञान आणि मूळ विषयाबाबत नवोद्योगांना कर्मचाऱ्यांकडून काही विशिष्ट अपेक्षा असतात. त्यांच्या गरजा पूर्ण करणारे अभ्यासक्रम तयार करता येऊ शकतात.
- आशय आणि उमेदवारांना उपयुक्त अभ्यासक्रम व प्रकल्प देऊ शकता येतात.

### तज्ज्ञ क्षेत्र

- प्रसिद्ध विषयतज्ज्ञ शिकवत असलेले अभ्यासक्रम
- विशिष्ट विद्यार्थ्यांना थेट ऑनलाइन अभ्यासक्रम देण्याची क्षमता

### तंत्रज्ञान क्षेत्र

- हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमधील तज्ज्ञ त्यांचे तंत्रज्ञान अभ्यासक्रम देऊ शकतात.
- वर्गातील शिक्षण+ प्रत्यक्ष शिक्षण + ऑनलाइन अभ्यासक्रम

### नागरिक क्षेत्र

- उमेदवारांना सरकारी किंवा सार्वजनिक सेवेत भरती होण्यास सक्षम करणारे अभ्यासक्रम या क्षेत्रात येऊ शकतात.

### स्व-मदत क्षेत्र

- भाषा कौशल्ये
- संवाद कौशल्ये
- मनोरंजन कौशल्ये

## हेतूपूर्ण अध्ययन

### करिअरवाट
विद्याशाखा/उद्योगविशिष्ट अभ्यासक्रमांची शिफारस

### संशोधन अहवाल
रोजगार आणि ई-लर्निंग कल यावरील लेख आणि अहवालांची उपलब्धता

### प्रोत्साहन मुद्दे
मास्टर क्लासेस/वेबिनार इत्यादींसारख्या व्यासपीठाची अतिरिक्त सेवा वापरण्यासाठी

### उद्योगांबरोबर चर्चा
करिअर बांधणीसाठी तज्ज्ञ आणि प्रभावशाली व्यक्तींकडून महत्त्वपूर्ण सूचना

## व्हीयू डिजिटलवरील चालू अभ्यासक्रम

**हायब्रिड अँड इलेक्ट्रिक पॉवर ट्रेन्स**
प्रशिक्षक
डॉ. अंशुमान त्रिपाठी,
एनटीयू, सिंगापूर

**ग्लोबल माइंडसेट**
प्रशिक्षक
डॉ. जेफ्री क्लेमेंट्स,
कॉमनवेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर पार्टनर्स, यूके

**इमर्जिंग टेक्नॉलॉजी, ह्युमॅनिटीज अँड द ऑगमेंटेड एज**
प्रशिक्षक
डॉ. जी. लुईस होर्नयाक,
माजी प्राध्यापक, एआयटी, थायलंड

**इंट्रोडक्शन टू डिझाइन थिंकिंग**
प्रशिक्षक
प्रा. डॉ. मायकेल तेस्टानी,
बिंगहॅम्प्टन युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क

**अंडरस्टँडिंग द इनोव्हेशन अँड आयपीआर लँडस्केप**
प्रशिक्षक
प्रा. डॉ. प्रबुद्ध गांगुली,
आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेटंट एजंट आणि आयपीआर सल्लागार

## आमचा चमू

**(डॉ.) योगेश देशपांडे**

संचालक, व्हीयू डिजिटल, प्राध्यापक,
संगणक अभियांत्रिकी विभाह

---

**प्रा. डॉ. श्रद्धा खंपारिया**

विशेष सदस्य, व्हीयू डिजिटल, प्रमुख, जल, निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता विभाग

---

**प्रा. दीपशिखा शर्मा**

विशेष सदस्य, व्हीयू डिजिटल, सहायक प्राध्यापक, विधी विभाग

---

**अमृता अजित हळदणकर**

इन्स्ट्रक्शनल डिझायनर, व्हीयू डिजिटल

---

**प्रिया नाकडे**

प्रकल्प व्यवस्थापक, व्हीयू डिजिटल












## सेंटर ऑफ एक्सलन्स बायोसिस्टीम्स, बायोमेडिकल अँड ड्रग अँड डिलिव्हरी टेक्नॉलॉजीज

उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यावर नवता, प्रेरणा आणि शोध यांचा मानवी प्रगतीवर ठसा आहे. व्हीयू सेंटर एक्सलन्स बायोसिस्टीम्स, बायोमेडिकल अँड ड्रग अँड डिलिव्हरी टेक्नॉलॉजीजची (व्हीयू बीबीडीडीटी) स्थापना 2 मार्च 2021 ला झाली. संशोधन आणि विकासातील आव्हाने पेलण्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्राला संधी आणि संसाधने मिळावीत, या उद्देशाने हे सुरु झाले. विश्वकर्मा विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुविद्याशाखीय तज्ज्ञतेमुळे सेंटर ऑफ एक्सलन्स बायोसिस्टीम्स, बायोमेडिकल अँड ड्रग अँड डिलिव्हरी टेक्नॉलॉजीज सुरु करण्यास चालना मिळाली आहे. संबंधित सर्व घटक आणि समाजाला फायदेशीर ठरतील, अशी आव्हाने स्वीकारण्याचे यामागे उद्दिष्ट आहे.

व्हीयू बीबीडीडीटी उद्योग, शैक्षणिक संस्था, सरकारी संस्था, संशोधन केंद्रे, प्रयोगशाळा, क्लिनिकल संशोधन केंद्रे, नवोद्योग आणि लघुउद्योग, शिक्षक, विद्यार्थी आदींबरोबर सहकार्याने काम करते. औषधनिर्माण विज्ञानाची बहुविद्याशाखीय क्षेत्रे; तसेच विज्ञान आणि अभियांत्रिकी तंत्रज्ञानांचे मिश्रण यांतील संशोधन प्रकल्प या केंद्रांतर्गत हाती घेतले जातात.

बायोसिस्टीम्स, बायोमेडिकल अँड ड्रग अँड डिलिव्हरी टेक्नॉलॉजीजमधील नवता आणि शोधांसाठी सुपीक जमीन तयार करण्याचे काम हे केंद्र करते.





# पुरविल्या जाणाऱ्या सेवा




- मूलभूत संशोधन
- उपयोजित संशोधन
- विविध क्षेत्रांत उद्योगाला सेवा
- कम्प्युटर-एडेड ड्रग डिझाइन, डॉकिंग, मॉलेक्युलर मॉडेलिंग अँड होमोलॉजी मॉडेलिंग
- डिझाइन अँड सिंथेसिस ऑफ नॉव्हेल केमिकल एंटिटीज
- ड्रग एनॅलिसिस
- फॉर्म्युलेशन डेव्हलपमेंट
- क्रुड एक्स्ट्रॅक्शन – फायटोकेमिकल एनॅलिसिस
- स्टॅटिस्टिकल एनॅलिसिस
- डिव्हाइस डिझायनिंग अँड डेव्हलपमेंट
- एडीएमई प्रोफाइलिंग
- ड्रग-बायोमॉलेक्युल इंटरएक्शन
- नॅनोसायन्स/नॅनोटेक्नॉलॉजी
- बायोसेन्सर बेस्ड स्टडीज

## विश्वकर्मा विद्यापीठ आणि रोबोनिक इंडिया प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार

विश्वकर्मा विद्यापीठाच्या बीबीडीडीटी केंद्राने रोबोनिक इंडिया प्रा. लि. यांच्याबरोबर जैववैद्यकीय उपकरण विकासासाठी 25 मार्च 2021 ला उद्योग-शिक्षण सहकार्य अधिक मजबूत व्हावे, यासाठी सामंजस्य करार केला.

विद्यापीठ आणि रोबोनिक फार्मनि एकत्रितपणे पुढील सहकार्य क्षेत्रे निवडली आहेत.

**- जैववैद्यकीय उपकरणांतील नव्याने उद्भवणाऱ्या समस्यांवर संशोधन करणे**

**- तंत्रज्ञान विकास**

**- निधीसाठी प्रस्ताव लिहिणे.**

**- विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रशिक्षण देणे.**

**- उद्योगांमध्ये विद्यार्थ्यांना प्रकल्प आणि उमेदवारी करता यावी, यासाठी मदत करणे.**

**- नवकल्पना, नवे प्रकल्प आणि उद्योजकतेला सहकार्य**

**- उत्पादन किंवा प्रक्रिया विकसन आणि सुधारणा यांसाठी समस्यानिवारण किंवा नवतेतील संशोधन प्रकल्प हाती घेणे.**

**- विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढावी, यासाठी प्रयत्न करणे.**

---

## विश्वकर्मा विद्यापीठ आणि डायग्नोस्टिक सेंटर यांच्यात सामंजस्य करार

विद्यापीठाच्या बीबीडीडीटी केंद्राने जैववैद्यकीय उपकरण विकास क्षेत्रातील क्लिनिकिल चाचण्या आणि विकसित जैववैद्यकीय उपकरणांचे मूल्यमापन करण्यासाठी डायग्नोस्टिक सेंटरबरोबर सामंजस्य करार केला आहे.

**विद्यापीठ आणि सिंहगड पॅथॉलॉजी लॅबोरेटरीने एकत्रितपणे पुढील सहकार्य क्षेत्रे निवडली आहेत.**

**- तज्ज्ञतेची वाटणी**

**- क्लिनिकल अभ्यास**

**- संवेदनशील आणि विशिष्ट अभ्यास**

**- प्रशिक्षण**

**- सहकार्याने प्रस्ताव लिहिणे**

**- विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.**

## कार्यक्रम

‘सेल रिस्पॉन्सिव्ह फायटोकेमिकल बेस्ड पॉलिएक्टिव्ह नॅनोफॉर्म्युलेशन फॉर टारगेट डिलिव्हरी’ यावर 22 मे 2021 रोजी तज्ज्ञ चर्चासत्र झाले. हर्ब-ड्रग डिसिज इंटरएक्शन्स – ए प्रीरिक्विझिट फॉर इंटिग्रेटिव्ह मेडिसीन (आंतरविद्याशाखीय ‘आयुष’ संशोधनासाठी निधी संधी आणि दृष्टिकोन) हे डॉ. स्वप्नील बोरसे यांचे तज्ज्ञ व्याख्यान.

## आमचा चमू

**प्रा. सचिन साकेत**
संचालक

**प्रा. पूनम इनामदार**
सदस्य

**प्रा. मृणालिनी कुलकर्णी**
Member

**प्रा. विद्या देसाई**
सदस्य

**प्रा. सोनाली मानवतकर**
समन्वयक

**प्रा. स्वाती मुथा**
सदस्य

**प्रा. दीप्ती जोशी**
सदस्य

**प्रा. चेतन कापडणीस**
सदस्य

**प्रा. मकरंद पुरी**
Member

**प्रा. श्रीनिवास चिकलपट्टी**
सदस्य



## विलो-विश्वकर्मा विद्यापीठ (व्हीयू) सेंटर ऑफ एक्सलन्स

जल आणि निर्जंतुकीकरण क्षेत्रातील शिक्षण, संशोधन, अभिनवता आणि प्रसाराला व्हीयू कायमच प्रोत्साहन देते. गरज, सुसंगत्व, सामाजीकरण आणि स्थानिकीकरणाच्या संदर्भात समाजाच्या भल्यासाठी अभिनव तंत्रज्ञान, सर्वोत्तम पद्धती आणि विकास साधणे हे याचे ध्येय आहे. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना लाभ होईल, असा प्रयत्न आहे. पाण्यावरील प्रक्रिया, शुद्धिकरण याबरोबरच स्वच्छ पाणीसेवन आणि निर्जंतुकीकरणाबाबत जनजागृती करण्याचा उद्देश आहे.

जर्मनीच्या विलो फाउंडेशनच्या सहकार्याने उभारण्यात आलेले अद्ययावत असे जलगुणवत्ता केंद्र हे जल आणि निर्जंतुकीकरण क्षेत्रातील परिवर्तनात्मक संशोधन करण्याचे ध्येय पूर्ण करण्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल आहे.

VU VISHWAKARMA UNIVERSITY Maximising Human Potential | wilo | GLOBAL SANITATION GRADUATE SCHOOL

या केंद्रात पाण्याचे भौतिक, रासायनिक आणि जैविक निकष तपासण्यासाठी आधुनिक उपकरणे आहेत. याद्वारे संशोधनही केले जाते. जलगुणवत्ता केंद्राद्वारे पाण्यावरील प्रक्रिया, शुद्धिकरण याबरोबरच स्वच्छ पाणीसेवन आणि निर्जंतुकीकरणाबाबत जनजागृती करण्याचा उद्देश आहे. जर्मनीच्या विलो फाउंडेशनतर्फे मिळालेल्या निधीच्या साह्याने हे केंद्र उभारण्यात आले आहे.



## दिल्या जाणाऱ्या सेवा

- पिण्याचे पाणी, भूजल आणि जलसंधारण यातील पाण्याची गुणवत्ता
- बांधकामासाठी आणि शीतीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता
- जलनमुन्यांचे रासायनिक घटक विश्लेषण
- विविध उद्योगांमधून बाहेर येणाऱ्या सांडपाण्याची गुणवत्ता
- सांडपाणी प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांसाठी पद्धत विकसन
- सांडपाणी प्रक्रियेबाबत सल्लासेवा
- नमुने गोळा करण्यासाठी प्रशिक्षण सुविधा
- प्रकल्प मार्गदर्शन





हे केंद्र जलगुणवत्ता तपासण्यासाठी अद्ययावत उपकरणांनी सज्ज आहे. केंद्रात सर्व प्रकारच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक चाचण्या केल्या जातात आणि त्याचे निदान ग्राहकाला कळवले जाते.

- मायक्रो बॅलन्स
- केजलधल्स अपॅरेटस
- अनॅलिटिकल बॅलन्स
- मॅग्नेटिक स्टरर विथ हॉट प्लेट
- एचपीएलसी
- फिल्टरेशन युनिट
- हीटिंग मँटल
- पीएच मीटर
- मफल फरनेस
- बायोलॉजिकल इनक्युबेटर
- यूव्ही-व्हिस स्पेक्ट्रोफोटोमीटर
- फ्लेम फोटोमीटर
- मल्टी आयन मीटर
- मल्टी-इलेक्ट्रोड मीटर
- टर्बिडिटी मीटर
- एटॉमिक एब्सॉर्प्शन स्पेक्ट्रोफोटोमीटर
- ई-कोली टेस्ट किट
- सेंट्रिफ्युज
- कॉलनी काउंटर
- वॉटर बाथ

## प्रकल्प




### सल्लासेवा प्रकल्प

- विलोबरोबर प्रकल्प
- फिलिप्सबरोबर प्रकल्प
- एक्युरेट गेजिंगबरोबर प्रकल्प

### विद्यार्थ्यांचे प्रकल्प

सत्र कालावधीएवढ्या 10 हून अधिक, तर 20 हून अधिक लघु इंटर्नशिप असलेले विद्यार्थ्यांद्वारे 14 प्रकल्प

### कार्यक्रम

गोरेगाव, मुंबईत 'आयएफएटी'ला भेट

विलो-व्हीयू जलगुणवत्ता केंद्राच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांकडून पतंग प्रदर्शन

## आमचा चमू

**प्रा. डॉ. धनंजय भातखंडे**
संचालक

**प्रा. डॉ. श्रद्धा खंपारिया**
उपसंचालक

**प्रा. प्रणव धनेश्वर**
सदस्य

**प्रा. संदीप कुलकर्णी**
सदस्य



## ऊर्जा आणि शाश्वततेसाठीचे केंद्र

सर्व 17 शाश्वत विकास ध्येयांचा भर हा समाजाच्या पर्यावरण संवर्धनासाठीच्या गरजा पूर्ण करण्यावर आहे. विद्यापीठ आवारात वावरणाऱ्यांसाठीही शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याचा उद्देश प्राधान्याने ठेवून हा अनोखा इको-कॅम्पस व ऊर्जा आणि शाश्वततेसाठीचे केंद्र स्थापन करण्यात आले.

पुढील गोष्टींचा वापर करून विश्वकर्मा विद्यापीठातील शाश्वततेचे सर्वंकष पालन करण्यात येते...




विश्वकर्मा विद्यापीठाचे आवार नव्या तंत्रज्ञानाच्या संशोधन आणि विकासासाठीची जिवंत प्रयोगशाळा किंवा चाचणीकेंद्र व्हावे, असा यामागचा उद्देश आहे. एनर्जी मॉडेलिंग करून ऊर्जा संवर्धनाचे उपाय सुचवून विविध प्रकारच्या इमारतींची कामगिरी तपासण्याचेही उद्दिष्ट आहे.

ऊर्जा संवर्धनासाठी व्हीयू आणि इंटिग्रेटेड एन्व्हायर्न्मेंट सोल्युशन्स (आयईएस) यांच्यामध्ये मार्च 2019 मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर व्हीयू आणि क्यूआय स्क्वेअर प्रा. लि. (सिंगापूर) यांच्यातही मे 2019 मध्ये सामंजस्य करार झाला. एकूण 32 विद्यार्थ्यांनी 1 ते 10 महिन्यांच्या इंटर्नशिप पूर्ण केल्या आहेत. इमारतींमधील ऊर्जा संवर्धन, आयओटी आधारित ऊर्जावापर मोजणी आणि विश्लेषण, आभासी वातावरणात इमारतींचा ऊर्जा लेखाजोखा यावर संशोधनाचा भर आहे. इंटर्नशिपच्या दरम्यान विद्यार्थ्यांनी आंतरविभाग सहकार्याने 12 आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्पांवर काम केले. विद्यार्थ्यांच्या या गटात संगणक अभियांत्रिकी, यांत्रिक अभियांत्रिकी, संगणकविज्ञान, संख्याशास्त्र आणि डिझाइन विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या केंद्रांतर्गत राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमात आयईएसव्हीईच्या विविध मॉड्युल्सचे प्रशिक्षण दिले जाते. याचा वापर विविध हवामान स्थितींतील सध्याचा व भविष्यातील ऊर्जावापर जाणून घेण्यासाठी इमारतीचे त्रिमितीय प्रारूप तयार करण्यासाठी; तसेच विविध प्रकारच्या इमारतींची ऊर्जावापर माहिती, त्या माहितीचे विश्लेषण करून त्याचा ऊर्जासंवर्धनासाठीच्या उपायांसाठी वापर होऊ शकतो. यांत्रिक अभियांत्रिकी आणि वास्तुरचनाशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ऊर्जा लेखापरीक्षण हा वैकल्पिक विषयही शिकवला जातो.

## आमचा चमू

**डॉ. कैलास पाटील**
संचालक

**माया कुरुलेकर**
उपसंचालक

**प्रणव धनेश्वर**
सदस्य

**अभय चव्हाण**
सदस्य







# सेंटर ऑफ एक्सलन्स - इंडस्ट्री ४.०

सध्याच्या घडीला भौतिक आणि डिजिटल जग एकमेकांत मिसळून उत्पादन प्रक्रियांमध्ये नाट्यमय क्रांती घडवत आहेत. आपण याला इंडस्ट्री 4.0 किंवा चौथी औद्योगिक क्रांती म्हणतो. कारखाने अधिक स्मार्ट आणि ग्राहकाभिमुख करण्यासाठी उदयास येणाऱ्या विविध तंत्रज्ञानांचे इंडस्ट्री 4.0 हे मिश्रण आहे. या क्रांतीचा आधीच्या दशकांत झालेल्या वाफ, वीज, स्वयंचलीकरण आणि संगणकीकरणासारखाच आपल्या सर्व समाजावर परिणाम घडून येणार आहे.

उत्पादन उद्योगांबरोबर बंध विकसित करून स्मार्ट उत्पादन आस्थापनांसाठी संसाधने आणि मनुष्यबळ तयार करणे यासाठी इंडस्ट्री 4.0 केंद्र स्थापन करण्यात आले आहे. इंडस्ट्री 4.0 ची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाबाबत लोकांना हे केंद्र जागरुकही करील.



## अ) सी4आय4 लॅब्ज पुणेबरोबर सहकार्य

केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाने समर्थ (स्मार्ट ऑटोमेटेड मॅन्युफॅक्चरिंग अँड रॅपिड ट्रान्सपोर्टेशन हब) उद्योग या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत सी4आय4 लॅब पुणे स्थापन केली आहे. सी4आय4 लॅब्ज पुणेचा विश्वकर्मा विद्यापीठ हा संस्थापक सदस्य आणि शैक्षणिक भागीदार आहे. या केंद्रांतर्फे या सहकार्यांतर्गत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.






## कारखाना मूल्यमापन उमेदवारी

सी4आय4 लॅब्जने विकसित केलेल्या अभिनव साधनाद्वारे पुणे आणि परिसरातील सुमारे 25 उत्पादन उद्योगांचे, त्यांच्या इंडस्ट्री 4.0 साठी असलेल्या सज्जतेबाबत मूल्यमापन करण्यात आले. विद्यार्थ्यांना कारखान्यांना भेटी देऊन तेथील उच्चाधिकाऱ्यांना भेटण्याची आणि मूल्यमापनासाठी माहिती मिळविण्याची संधी मिळाली.

## ज्ञान मालिका व्याख्यानांत सहभाग

सी4आय4 लॅब्जच्या ज्ञान मालिका व्याख्यानांतर्गत विद्यार्थ्यांना इंडस्ट्री 4.0 मधील तज्ज्ञांकडून काही उत्तम व्याख्याने ऐकायला मिळाली. ही व्याख्याने विद्यार्थी आणि शिक्षकांना इंडस्ट्री 4.0 च्या संज्ञा आणि तंत्रज्ञानांबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता उपयोगी पडली.





## सुदूर उत्पादन देखभाल व्यवस्था प्रकल्प

i) जुन्या पारंपरिक लेथ मशिनभोवती डिजिटलायझेशन प्रयोग म्हणून स्मार्ट संवेदकआधारित व्यवस्था विकसित केली गेली. याचा यंत्राच्या प्रकृतीवर, उत्पादनक्षमतेवर आणि इतर प्रकारांवर संगणकीकृत डशबोर्डद्वारे देखरेख ठेवण्यास उपयोग झाला. उत्पादन डेटा मिळविण्यासाठी याचा स्मार्ट पद्धतीने प्रयोग म्हणून वापर करता येऊ शकतो; तसेच आणखी सखोल माहिती मिळविण्यासाठी डेटा एनॅलिटिक्सही वापरता येते.

ii) उद्योगांमध्ये ज्या नव्या घडामोडी घडत आहेत, त्याची विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी सी4आय4 ची भेट घडविण्यात आली.

### ब) प्रशिक्षण

आयओटीचा वापर करून सुदूर उत्पादन देखरेख व्यवस्थेसाठीचे प्रशिक्षण विद्यापीठ आवारात आयोजिण्यात आले. सुमारे 20 विद्यार्थ्यांना यंत्रांवर प्रत्यक्ष काम करु दिले गेले. एक लेथ मशिन डिजिटलाइज करून चालू वेळेत यंत्रातून डेटा गोळा करण्यासाठी आयओटी नियंत्रकाला जोडले गेले. आयओटी नियंत्रित व्यवस्थेचा वापर करून मुख्यालयातून दोन कारखाने नियंत्रित केल्या जाणाऱ्या इंडो-शोलेट पुणे या कारखान्याला दिलेल्या भेटीने प्रशिक्षणाचा समारोप झाला.

### क) अभ्यासक्रम

ताज्या अभियांत्रिकी पदवीधरांसाठी ‘इंट्रोडक्शन टू इंडस्ट्री 4.0’ हा अभ्यासक्रम व्हीयू डिजिटल पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी 10 तास इतका असून, तो पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने शिकवला जाईल.

### ड) कार्यक्रम

### कार्यशाळा

इंडस्ट्री 4.0 स्टुडंट्स क्लबच्या सदस्यांसाठी थ्री-डी प्रिटिंग कार्यशाळा आयोजिण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी डिझाइन केलेल्या भागांसाठी थ्री-डी प्रिंटिंगचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

| विषय | व्याख्याते |
| --- | --- |
| इंडस्ट्री 4.0 इन नटशेल | श्री. आदित्य वाघ |
| ओव्हरऑल इक्विपमेंट एफिशियन्सी अँड असेट मॅनेजमेंट | श्री. दीपक श्रीवास्तव |
| एप्लिकेशन्स ऑफ आयओटी अँड एआर/व्हीआर इन इंडस्ट्री 4.0 | इन्फिनिटी एक्स अँड पीटीसी |





## ई) इंटर्नशिप

### i) इंटर्नशिप @ सी4आय4 लॅब्ज

फॅक्टरी असेसमेंट इंटर्नशिप प्रोग्राम (व्हीयू आणि सी4आय4 लॅब्जमधील संयुक्त अभ्यासक्रम)

- गोळा केलेल्या इंडस्ट्री 4.0 इंडेक्सवर आधारित 25 हून अधिक उद्योगांचा डेटा
- अधिक स्मार्ट उत्पादनासाठी अवलंबलेल्या व्यूहरचनांची माहिती
- डिजिटल परिवर्तनासाठीच्या सध्याच्या आणि अपेक्षित स्थितींमधील दरींची माहिती
- उद्योगांमध्ये इंडस्ट्री 4.0 च्या समावेशासाठीचा रस्ता
- अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शाखेतील सुमारे 35 विद्यार्थ्यांचा सहभाग
- विश्वकर्मा समूह (व्हीयू, व्हीआयटी पुणे आणि व्हीआयआयटी पुणे)
- मार्गदर्शक म्हणून 7 शिक्षकांचा समावेश

### ii) इंटर्नशिप @ व्हेगा इनोव्हेशन्स अँड टेक्नोकन्सल्टंट्स (आशिष नवले यांजकडून)

- राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरील पोलाद उत्पादन उद्योगांत इंडस्ट्री 4.0 चा समावेश
- उद्योग पातळीवरील प्रकल्पांत आयओटीची अंमलबजावणी
- डेटाबेस व्यवस्थापन आणि कारखान्याच्या मोठ्या प्रमाणावरील डेटावर व्यावसायिक चातुर्य
- औद्योगिक पद्धती आणि आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञान वापरून केलेले पारंपरिक उत्पादनाचे ऑटोमेशन जाणून घेणे.
- पोलाद उत्पादन उद्योगांच्या ऑटोमेशनकरिता आवश्यक तंत्रज्ञानाची व्यूहरचना आणि अंमलबजावणी

## फ) सहकार्य

### ग) बाहेरच्या जगाशी संवाद – चर्चा

प्रा. डॉ. योगेश देशपांडे आणि मृण्मयी रानडे यांनी के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी येथे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात 'इमर्जिंग ट्रेंड्स अँड करिअर अपॉर्च्युनिटीज इन इंडस्ट्री 4.0' यावर 28 फेब्रुवारी 2020 रोजी व्याख्यान दिले.

पीएएलएसने 27 फेब्रुवारी 2021 रोजी आयोजिलेल्या 'इंडस्ट्री 4.0 अँड इट्स एप्लिकेशन्स' या ऑनलाइन चर्चासत्रात मृण्मयी रानडे यांनी सहभाग नोंदवला. विश्वकर्मा विद्यापीठ इंडस्ट्री 4.0 बाबत करत असलेल्या प्रयत्नांचा हा भाग होता. या चर्चासत्रात विविध राज्यांतील 25 महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले. पीएएलएस हा वेगवेगळ्या आयआयटीच्या माजी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रम आहे.

## ४. विद्यार्थ्यांचे प्रकल्प

### i) डिजिटल परिवर्तनाद्वारे प्रक्रिया सर्वोत्तमता (व्हीयू आणि आकार फाउंड्रीचा संयुक्त प्रकल्प)



#### उद्देश

- फाउंड्रीतील वितळण्याच्या प्रक्रियेसाठी स्मार्ट डेटा संग्रह
- ओईईची चालू वेळेत गणना आणि मनुष्य, यंत्र आणि साधनांसह प्रक्रिया निकष
- चालू वेळेत उत्पादन प्रक्रियेला मार्गदर्शन करण्यासाठी आणि अंदाज बांधण्यासाठी डेटावर संख्याशास्त्रीय पद्धतींचा वापर

#### फलनिष्पत्ती

- प्रक्रियेच्या डिजिटायझेशनकरिता मोबाइल/वेब आधारित एप्लिकेशन
- विशिष्ट स्थितींसाठी स्वयंचलित सर्च इंजिन

### ii) आयओटीच्या साह्याने सुदूर उत्पादन देखरेख व्यवस्था (व्हीयू आणि सी4 आय4 लॅब्जचा संयुक्त प्रकल्प)

#### उद्देश

- इंडस्ट्री 4.0 मधील डिजिटलायझेशनच्या संकल्पना विद्यार्थ्यांना दाखवणे.
- ओईईची गणना आणि प्रक्रिया निकषांचा चालू वेळेतील प्रत्यक्ष अनुभव देणे.

#### फलनिष्पत्ती

- पारंपरिक लेथ मशिनच्या डिजिटलायझेशनचे सायबर भौतिक व्यवस्थेतील उदाहरण
- हा सेटअप वापरून 20 विद्यार्थ्यांचे इंडस्ट्री 4.0 त्या मूलभूत संकल्पनांसाठी प्रशिक्षण





## ५. प्रकाशने

ऋग्वेद पाटकर, इद्रिस प्रेसवाला, योगेश देशपांडे आणि मृण्मयी रानडे यांनी 'इंडस्ट्री 4.0 : फ्युचर पर्स्पेक्टिव्ह अँड एजिलिटी' यावर पुण्यात ऑगस्ट 2020 मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत 'स्टेप टोवर्ड्स वर्कशॉप ऑफ इंडस्ट्री 4.0 : रिमोट प्रॉडक्ट मॉनिटरिंग सिस्टीम' या विषयावर शोधनिबंध प्रकाशित केला. या शोधनिबंधाला पहिले पारितोषिक मिळाले आणि तो यूजीसीच्या नियतकालिकातही प्रकाशित झाला.

## आमचा चमू

**प्रा. (डॉ.) योगेश देशपांडे**
संचालक

**मृण्मयी रानडे**
उपसंचालक

**निखिल शिंदे**
सदस्य

## माध्यमे, कार्यक्रम, मनोरंजन आणि पर्यटन केंद्र

विझक्राफ्ट एमआयएमई या उद्योग भागीदाराबरोबर माध्यमे, कार्यक्रम, मनोरंजन आणि पर्यटन केंद्राची स्थापना करण्यात आली. उद्योग, विद्यार्थी आणि समाजावर विस्तृत आणि शाश्वत परिणाम घडावा आणि त्यातून मूल्यही मिळावे, असे या केंद्राचे उद्दिष्ट आहे. ज्ञान आणि नवतेसाठीचे हे पीठ आहे.

या केंद्राची दृष्टी पुढीलप्रमाणे आहे...

1. इव्हेंट व्यवस्थापन, माध्यमे, मनोरंजन आणि पर्यटन क्षेत्रात नवकल्पना आणि तंत्रज्ञान अंमलबजावणी
2. तंत्रज्ञान सज्जतेच्या पातळ्या वापरून तंत्र-आर्थिकदृष्ट्या सुयोग्य कल्पनांचा वापर
3. ज्ञानाधारित उत्पादनांसाठी व्यवसाय, विपणन आणि आयपी व्यूहरचनेचे एकात्मीकरण
4. परिणाम साधण्यासाठी व्यावसायिक घटकांशी सहकार्य



# सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इमर्जिंग डिजिटल ग्रिड अँड ई-मोबिलिटी

सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इमर्जिंग डिजिटल ग्रिड अँड ई-मोबिलिटी
ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील भविष्याकालीन तंत्रज्ञानांसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे. या केंद्रांतर्गत 'फ्युचर मोबिलिटी' क्षेत्रात यांत्रिक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना स्पेशलायझेशनची संधी दिली जाईल. सिंगापूरच्या नानयांग तंत्रज्ञान विद्यापीठातील ईआरआयएएनमध्ये; तसेच उद्योगांत संशोधन आणि उमेदवारीच्या संधी.

या केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांसाठी संधींची अनेक दारे उघडण्यासाठी प्रयत्न केले जातील...
- यांत्रिक अभियांत्रिकी आणि उत्पादन : इलेक्ट्रिक वाहनांमधील साधने, यंत्रे आणि इतर यांत्रिक उपकरणांची संरचना, विकसन, चाचणी आणि उत्पादन.
- पदार्थ आणि रसायनशास्त्र : इलेक्ट्रिक वाहने आणि बॅटऱ्यांमध्ये वापरलेल्या पदार्थांचे विकसन, प्रक्रिया आणि चाचणी.
- विद्युत अभियांत्रिकी : विद्युत घटकांच्या उत्पादनांची संरचना, विकसन, चाचणी आणि पर्यवेक्षण
- इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी : वाहनांचे संवेदक आणि इतर इलेक्ट्रॉनिक घटक व प्रणालींसाठी संरचना, विकसन आणि चाचणी.
- सॉफ्टवेअर विकसन : ही वाहने नियंत्रण करणाऱ्या सॉफ्टवेअरची संरचना आणि निर्मिती.

या केंद्रांतर्गत आम्ही संकरित आणि विद्युत शक्ती रेल्वेगाड्यांवर आम्ही व्हीयू डिजिटल अभ्यासक्रम राबवला आहे. हा अभ्यासक्रम व्हीयूच्या दोन श्रेयांकाइतका आहे. यांत्रिक अभियांत्रिकी आणि संगणक अभियांत्रिकी विभागांच्या विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला (व्हीयू डिजिटल चमूकडे विद्यार्थ्यांचे तपशील आहेत). ईडीजीई सीओईचे मार्गदर्शक एनटीयू सिंगापूरचे डॉ. अंशुमान त्रिपाठी यांनी हा अभ्यासक्रम राबवला.
नजीकच्या भविष्यकाळात स्वायत्त उपयुक्त वाहन बांधण्याची आमची योजना आहे.





## आय-बर्ग सेंटर ऑफ एक्सलन्स

### दृष्टी

बाह्यनियंत्रित वातावरणात विद्यार्थ्यांना ज्ञान हस्तांतरणाचा समतोल साधण्यासाठी (निश्चित धोरणाने वर्ग/प्रयोगशाळा सत्रे, पूर्वनिश्चित कालावधी, इतरांकडून मूल्यमापन/तुलना होण्याचे दडपण); सर्वांत उदयास येत असलेली साधने व तंत्रज्ञानाने सुसज्ज व्यासपीठांचा वापर, जे असेल...

- पाठ्यक्रम नाही : एखाद्या व्यक्तीची कल्पना जे-जे सुचवेल, तो पाठ्यक्रम
- मूल्यमापनाचे दडपण नाही : व्यक्तीच स्वत:चा परीक्षक
- नियम नाहीत : केवळ जबाबदार वर्तन

### ध्येय

सैद्धान्तिक संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी उपयोजन आणि नवतेच्या कोणत्याही सीमा न बाळगता मदत करणे.

अंमलबजावणी प्रारूप

1. संशोधन आणि विकास करत राहणे.
2. विविध विद्याशाखांचे विभाग आणि उद्योग भागीदारांच्या सहकार्याने प्रकल्प प्रारूपे राबवणे.
3. प्रत्यक्ष कामाच्या अंमलबजावणीचा अनुभव विद्यापीठ आवारात देणे.
4. प्रकाशने आणि पेटंट

### उद्दिष्टे

शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधनाचा आणि नावीन्याचा केंद्राचा ध्यास आहे. त्यासाठीच्या संरचनेचा पाया असेल...

- पर्यावरणदृष्ट्या शाश्वत
- आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या पद्धती
- सामाजिकदृष्ट्या स्वीकारयोग्य धोरणे

### शाश्वत विकास उद्दिष्टे



## केंद्राची माहिती

हे केंद्र संशोधन, संरचना आणि अभिनवतेच्या विविध क्षेत्रांत समरसून काम करते. शाश्वत विकास उद्दिष्टे विद्यापीठाच्या स्तरावर साध्य करण्यासाठी शैक्षणिक आणि उद्योग भागीदारांबरोबर सहकार्य केले आहे. त्यासाठी विद्यापीठ, विभाग आणि विद्यार्थी स्तरावर विविध उपक्रम हाती घेण्यात येतात.

## केंद्राचे सहकार्य

1. हरित पायाभूत सुविधा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एएसएसओसीईएम जीईएमसह सामंजस्य करार करण्यात आला असून, त्याद्वारे देशातील हरित पाऊलठशांना प्रोत्साहन.

2. इनोव्हेट4सिटीज परिषदेसाठी सहकार्य; यूएन-हॅबिटॅट आणि ग्लोबल कोव्हेनन्ट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी (जीसीओएम) सहआयोजक.

## चालू प्रकल्प

1. भारतातील विविध हवामान विभागांसाठी नकाशा करण्यासाठी आणि धोरणे रचण्यासाठी ज्ञान उत्पादन

2. वर्गातील काचेच्या खिडक्यांसाठी शेडिंग उपकरण संरचना; पुण्यात प्रकल्प

3. भारतातील विविध प्रादेशिक वास्तुरचनाशैलींचा नकाशा





## सेंटर ऑफ एक्सलन्स – व्हीयू-आयक्यूब (द आयडिया, इनोव्हेशन अँड इम्पॅक्ट सेंटर)

विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास साधण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याचा विश्वकर्मा विद्यापीठाचा स्थापनेपासूनचा ध्यास आहे. मनुष्यक्षमतेचा विस्तार या ध्येयवाक्यातही तो अतिशय सुंदरपणे आला आहे. अभिनव अध्ययन पद्धतींनी सैद्धान्तिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचे प्रभावी मिश्रण तयार करण्यात आले आहे. याला जोड म्हणजे प्रतिसाद देणाऱ्या आणि सक्रिय विद्यार्थी समुदायाने विश्वकर्मा विद्यापीठाच्या आवाराचे नव्या कल्पनांचे बीज रोवणाऱ्या आणि बौद्धिक उपक्रम राबविणाऱ्या एका उत्पादनक्षम जमिनीत रूपांतर केले आहे. विद्यापीठाने आपले पुढचे नैसर्गिक पाऊल आता टाकले असून, शैक्षणिक गुणवत्तेच्या या प्रवासात 1 ऑक्टोबर 2020 रोजी व्हीयू-आयक्यूबची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशील क्षमतेला नवे धुमारे यामुळे फुटले आहेत.

कल्पना, नवता, आयपीआर आणि उद्योजकता यांचा एकात्मिक पद्धतीने विचार करून विद्यापीठात नवतेची संस्कृती आणण्यासाठी आणि स्व-विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याचे व्हीयू-आयक्यूबचे धोरण आहे.

### उपक्रम

### १. प्रभावी अभिनवता प्रकल्प

विद्यार्थ्यांच्या कल्पना, शोध आणि अभिनव कल्पनांचे सादरीकरण, पाहणी, निवड आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी एक प्रमाणित पद्धत (एसओपी) या उपक्रमांतर्गत व्हीयू-आयक्यूबने तयार केली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या संकल्पना, नवकल्पना आणि शोध मांडण्यास सांगितले जाते. त्याची तज्ज्ञ समितीकडून पाहणी होते. निवड झालेले प्रस्ताव पुढील रुजवणूक प्रक्रियेसाठी उचलले जातात. यामध्ये मांडलेली कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी अंतर्गत उभारणी, आयपीआरसाठी प्रयत्न आणि उद्यमशीलतेसाठी साह्य केले जाते.

### २. शिक्षकांसाठी आयपीआर मदत कार्यक्रम

या उपक्रमांतर्गत शिक्षकांना आयपीआर नोंदणी आणि त्यांच्या पात्र प्रकल्पांच्या प्रक्रियेसाठी मसुदा लेखन, अर्जप्रक्रिया आणि वित्तीय साह्य दिले जाते.







### ३. शिक्षक क्षमतावृद्धी कार्यक्रम

शिक्षकांची आयपीआर, नवता आणि उद्योजकता आदींमधील क्षमता वाढविण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाते; तसेच कार्यशाळांनाही पाठवले जाते.

### ४. विद्यार्थी क्षमतावृद्धी कार्यक्रम

सत्रे, कार्यशाळा, वैकल्पिक विषय आदींद्वारे आयपीआर, नवता आणि उद्योजकता याविषयीचे विद्यार्थ्यांचे आकलन वाढविण्यासाठी या उपक्रमांतर्गत साह्य केले जाते.

### आगामी

### १. उद्योजकता महोत्सव

विद्यार्थ्यांना त्यांच्या उद्योजकता कौशल्यांवर काम करण्यासाठी; तसेच ते दाखविण्यासाठी संधी मिळावी, त्यांच्यामध्ये उद्योजकतेविषयी जागरुकता निर्माण व्हावी, यासाठी हा वार्षिक महोत्सव आहे.

**२. कार्यशाळा** आणि विविध घटकांशी संवाद याद्वारे नवता आणि उद्योजकतेबाबत विद्यार्थ्यांची क्षमतावृद्धी

### ३. जागतिक अनुभव

जगभरातील उद्योजकांबरोबर संवाद

**६ उपक्रम** मुद्दे) (नमूद : लागू असलेले यातील काहीही)

### अ. सहकार्यासाठी मार्ग

उद्योजकता प्रसार, क्षमतावृद्धी

## अ. प्रशिक्षण/ सेवा

- उद्योजकता विकास कार्यशाळा
- बौद्धिक संपदा हक्क प्रक्रिया
- अंतर्गत उभारणी साह्य
- निकषपूर्ती साह्य
- क्षमता विकास
- विस्तारीकरण
- मार्गदर्शन

## ब. आगामी कार्यक्रम

1. उद्योजकतेसाठीच्या कल्पनांच्या खातरजमेवरील सत्र
2. उद्योजकता महोत्सवाचा (2021-22) दुसरा टप्पा; क्षमता विकास कार्यशाळा आणि जगभरातील विविध भागांतील यशस्वी उद्योजकांबरोबर संवाद सत्रे
3. विद्यार्थी आणि शिक्षक प्रकल्पांसाठी कार्यक्रम
4. उद्योजकता, नवता आणि आयपीआरवर लघु अभ्यासक्रम
5. शिक्षक विकास कार्यक्रम

## कार्यक्रम

1. 'नवता आणि उद्योजकता – प्रक्रिया आणि दृष्टिकोन' यावर डॉ. स्मिता काळे, सहयोगी व्यवस्थापक, व्हेंचर सेंटर यांचे भाषण
2. प्रा. डॉ. प्रबुद्ध गांगुली यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाच्या विधी विभागाच्या सहकार्याने अंडरस्टँडिंग द इनोव्हेशन अँड आयपीआर लँडस्केप यावरील बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम
3. व्हीयू उद्योजकता महोत्सव 2021-22 दिशा सत्र
4. उद्योजक आणि नवता मार्गदर्शक राममोहन रेड्डी यांची डीसीएफ व्हेंचर्सच्या सहकार्याने डिझाइन विचार यावर कार्यशाळा
5. व्हेंचर सेंटर पुणेच्या सहकार्याने 'उद्योजकांचे प्रत्यक्ष अनुभव आणि त्यातून मिळालेली शिकवण' यावरील सत्रात तरुण उद्योजक अजिंक्य धारिया, संस्थापक आणि सीईओ, पॅडकेअर लॅब्ज व उस्मान खान, सहसंस्थापक आणि सीओओ, मॉड्युल इनोव्हेशन्स यांचे मार्गदर्शन
6. यशस्वी उद्योजक कसे व्हावे, यावर लक्ष्मी पोतलुरी, सीईओ (डीसीएफ व्हेंचर्स), सहसंस्थापक (जबोंग डॉट कॉम), एंजल गुंतवणूकदार आणि मार्गदर्शक, यांचे मार्गदर्शन
7. 'एंजल गुंतवणूकदार काय पाहतात' यावर सीए अमित कुमार यांचे सत्र
8. वाधवानी फाउंडेशनच्या सहकार्याने एनईएन नेक्स्टजेन एक्टिव्हेट कार्यक्रमावर खुले चर्चासत्र



## ड. सहकार्य

1. Venture Center - Strategic Partner
2. DCF Ventures

## e. Services offered:

1. IPR Facilitation and Processing
2. Incubation Services
3. Compliance Services

## आमचा चमू

**प्रा. कैलास पाटील संचालक**
Director

**प्रा. उन्मेषा एस. पाटील**
उपसंचालक

**प्रा. श्रीकांत कुलकर्णी**
मानद सदस्य

**प्रा. निरंजन कुलकर्णी**
सदस्य

**प्रा. डॉ. विजय खेडकर**
सदस्य

**प्रा. वनरिसा खारकोंगोर**
सदस्य

**प्रा. अंकिता सांगळे**
सदस्य

**प्रा. जगदीश तावडे**
सदस्य

**प्रा. प्रणव धनेश्वर**
सदस्य

**प्रा. शैलेश थावरे**
सदस्य

**प्रा. डॉ. योगेश सूर्यवंशी**
सदस्य

## सेंटर ऑफ एक्सलन्स – डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन

### डिझाइन विचार आणि नवतेची दृष्टी

विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कल्पना तंत्र-व्यावसायिकदृष्ट्या करण्यायोग्य आणि समाजाला उपयुक्त प्रकल्पांत रूपांतरित करणे शक्य करण्यासाठी कुतुहल, तार्किक विचार, कल्पकता, डिझाइन विचार, सर्जनशीलता, नवता, सहकार्य आणि सामाजिक भानाची संस्कृती असलेली परिसंस्था सहकार्याने विकसित करणे.

### डिझाइन विचार आणि नवतेसाठीचे ध्येय

हे जग अधिक चांगले करण्यासाठी आम्ही व्हीयू-बीयू डिझाइन विचार आणि नवता प्रक्रियांचा वापर करून कल्पनांचे अभिनवतेत रूपांतर करतो.

### उद्दिष्टे

डिझाइन विचार आणि नवता यातील ज्ञानाचा समाजाच्या भल्यासाठी वापर आणि विस्तार करण्यासाठी आमच्या ब्रँडचे योगदान देत राहणे.

### सेंटर ऑफ एक्सलन्सचे तत्त्वज्ञान

स्वतः काम करीत असलेल्या संस्थेचे काम समाजाच्या व उद्योगाच्या भल्यासाठी विशिष्ट प्रकारच्या व्यावसायिक प्रकल्पांद्वारे सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करून मार्गी लावणे, असे ज्याचे ध्येय आहे, असा कौशल्यपूर्ण ज्ञान पुरवठादारांचा चमू म्हणजे सेंटर ऑफ एक्सलन्स ही संकल्पना.

उद्योग, स्वयंसेवी संस्था, तसेच सरकारी संस्थांशी संबंधित प्रकल्पांशी सहकार्य करून एका ठरावीक प्रक्रियेने संशोधनाद्वारे त्रुटी भरून काढणे याच्याशीही सेंटर ऑफ एक्सलन्सची बांधिकली असते.



## उद्देश

बिंगहॅम्प्टन विद्यापीठ आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या (आणि संस्था) विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी सहकार्य आणि कार्यप्रवणतेचे व्यासपीठ उभारणे.

डिझाइन विचार आणि समस्यानिवारण आराखडा तयार करणे.

सिस्टीम डिझाइनसाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन विकसित करणे.

प्रकल्प उभारणीसाठी विश्वकर्मा विद्यापीठातील सेंटर्स ऑफ एक्सलन्समधील तज्ज्ञतेची सांगड घालणे.

आंतरसांस्कृतिक डिझाइन विचार क्षमता विकसित करणे.

अभिनव विचार करण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन देणे.

# डिझाइन थिंकिंग अँड इनोव्हेशन सीओई – स्वॉट विश्लेषण

### कोणत्या अंतर्गत क्षमतांचा आपण वापर करू शकतो?

- बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम आणि आयपीआरमध्ये तज्ज्ञ असे व्हीयूतील शिक्षक
- भक्कम उद्योग संपर्क आणि सहकार्य
- कला आणि डिझाइन विभागाचे भक्कम अभ्यासक्रम व शिक्षक
- नव्या कल्पनांसाठी आवारातील फोटोटायपिंग प्रयोगशाळा
- डिझाइन विचार आणि नवतेने प्रेरित चमू
- डिझाइन विचार नवतेची अनोखी आणि परिणामकारक प्रक्रिया विकसित करण्यात आली आहे (लवचीक, कुठेही वापरण्यायोग्य आणि विस्तारक्षम) – सर्व क्षेत्रांत लागू होऊ शकणारी
- मार्केटिंग आणि ब्रँडिंग क्षमता (ट्रेडमार्क्स, प्रसार करण्यासाठी साहित्य इ.)

**कोणत्या अंतर्गत त्रुटी आपण दूर करू शकतो?**

- निधी पुरवठा संस्थांशी मर्यादित संपर्क
- पदवी अभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प संधी वाढवणे



**बाहेरच्या कोणत्या धोक्यांपासून आपण बचाव करायला हवा?**

- इतर संस्थाही सारख्याच प्रकारचे अभ्यासक्रम देण्याचा प्रयत्न करत आहेत.
- कोव्हिड-19 च्या उपप्रकारांमुळे साथरोग आणि लॉकडाउन निर्बंध वाढण्याची शक्यता

**बाहेरच्या कोणत्या संधींचा आपण लाभ उठवू शकतो?**

- कोव्हिडपश्चात झालेले नवसाधारण (न्यू नॉर्मल) सामाजिक बदल आणि संकटे
- सुरक्षित अन्नपुरवठा साखळीची वाढती गरज
- ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे उत्पादनांची अधिकृतता तपासणी
- नवता आणि समस्यानिवारणासाठी डिझाइन विचार दृष्टिकोन वापरण्याबाबत वाढत असलेली रुची
- राष्ट्रीय नवता आणि नवोद्योग धोरण
- नवे शैक्षणिक धोरण (एनईपी) – विद्यार्थ्यांना श्रेयांक मिळवता येतात (कोणत्याही संस्थेद्वारे हस्तांतरित करण्यायोग्य) उदाहरणार्थ, व्हीयू आणि बीयूसह 2+2 अभ्यासक्रम

## आमच्या सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी व्यूहरचना

- क्षमता आणि ब्रँड उभारणी : विद्यार्थी, शिक्षक आणि समुदाय
- वास्तव जगातील प्रकल्पांचे उपयोजन : उमेदवार विद्यार्थी आणि उद्योग प्रकल्प
- ज्ञान पुरवठादार चमूत योगदान : आयपीआर, ग्रंथ, ब्लॉग्ज, प्रकाशने आणि लेख
- समाजावर प्रभाव : प्रसिद्धी प्रकल्प, उद्योगांत इंटर्नशिप आणि प्रशिक्षण
- निधीसंकलन : प्रकल्प आणि त्यांचे व्यावसायिकीकरण – निधी, पारितोषिके, उत्पन्न आणि रॉयल्टी

# डिझाइन विचारासाठी प्रक्रिया

### व्हीयू-बीयू डिझाइन विचार प्रक्रिया – अरेषीय आराखडा




1. **शोध** – डिझाइन प्रारंभ आणि प्रेरणा
2. **सहकंपा** – ग्राहकाचा अनुभव आणि त्याच्या न भागलेल्या गरजांचे सखोल आकलन करून घेणे.
3. **संज्ञानिश्चिती** – एखादी समस्या सोडविण्यासाठी डिझाइन चमूचा दृष्टिकोन तयार करण्यासाठी आधीच्या टप्प्यांत मिळालेल्या ज्ञानाचे पृथक्करण करणे.
4. **कल्पनाविस्तार** – बहुमुखी आणि एकमुखी विचारप्रक्रिया वापरून योग्य उपाय
5. **नमुना** – कमीत कमी त्रुटी असलेला उपाय वेगाने शोधणे
6. **मूल्यमापन** – ग्राहकांमध्ये जाऊन उपायाची चाचणी करणे आणि सूचना मागवणे
7. **फेरमांडणी** – निरीक्षण करा, त्यावर विचार करा, उभारणी करा, पुनरावृत्ती करा आणि बाजारात आणा.





# डिझाइन विचाराची तत्त्वे

**व्हीयू-बीयू डिझाइन विचार तत्त्वे – पाच मूलभूत तत्त्वे आहेत.**




1. मानवकेंद्रित (सहकंपा) नियम : डिझाइन विचार प्रक्रिया ही मानवकेंद्री आणि ग्राहकाच्या गरजांचा विचार करून त्याप्रमाणे उपाय शोधणारी असते.

2. सहकार्य नियम : डिझाइन विचार चमू, चमूतील सदस्यांमध्ये मानसिकदृष्ट्या सुरक्षितता निर्माण करतात, ज्यायोगे कल्पना मुक्तपणे मांडल्या जातात. यामुळे क्रांतिकारी नवकल्पना जन्म घेऊ शकतात. चमू सर्वसमावेशक आणि इतरांच्या कल्पनांबाबत स्वीकारशील असतात.

3. कल्पनाविस्तार नियम : संकल्पना मांडण्यासाठी चित्रे, आकृत्या, एनिमेशन प्रारूपे काढून विविध प्रकारच्या कल्पना सादर करणे, हा कल्पनाविस्तार नियमाचा गाभा असतो.

4. प्रयोगशीलता नियम : कल्पनेचे प्रारूप करून आणि चाचणी करून कोणती कल्पना कामी येईल, कोणती येणार नाही, याचे प्राथमिक टप्प्यावर आकलन होण्यासाठी प्रयोगशीलता नियमाचा उपयोग होतो. या टप्प्यावर आपण लवकर शिकण्यासाठी लवकर अपयशी होतो.

5. पुनर्रचना नियम : ग्राहकाच्या दृष्टीने उत्पादन अपवादात्मक ठरत नाही, तोवर प्राथमिक कल्पनांना सातत्याने नवनवे रूप देत राहणे हे पुनर्रचना नियमात येते. अनेक डिझाइन संवाद हे सामान्य आणि अपेक्षित असतात.





## केंद्राचे ५ स्तंभ




### क्षमतावृद्धी : विद्यार्थी आणि शिक्षक

अशा क्षमतावृद्धी पद्धती ज्या सामीलकीची भावना असलेल्या आणि एकत्रित अध्ययनाची संस्कृती विकसित करणाऱ्या आहेत. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गरजांकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा वापर. गरजांचे विश्लेषण या शिक्षकांमध्ये डिझाइन विचारांद्वारे कोणत्या क्षमता विकसित करायला हव्यात, हे ओळखण्याच्या पद्धती आहेत.

### 2. प्रकल्प : विद्यार्थी, संशोधन आणि संयुक्त

आपल्या समाजात सर्जनशीलतेला चालना देण्याची आणि नवतेला प्रोत्साहन देण्याची नितांत गरज आहे. शैक्षणिक आणि कार्यपद्धतींसंदर्भात नवतेला प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन विचार हा शैक्षणिक आराखडा म्हणून यशस्वीरीत्या वापरला गेला आहे. मात्र, डिझाइन प्रक्रियांसंदर्भातील ज्ञान मिळविण्यासाठी साह्यभूत ठरणाऱ्या डिझाइन विचार शिक्षणात, विशेषतः शैक्षणिक संदर्भात अतिशय मर्यादित संशोधन झाले आहे. ऑनलाइन इन्स्ट्रक्शनल तंत्रज्ञान अभ्यासक्रमात ब्लॉगिंग हा इन्स्ट्रक्शनल दृष्टिकोन म्हणून डिझाइन विचार शिक्षणाला साह्यभूत ठरतो. अभ्यासक्रमात सहभागी झाल्यानंतर डिझाइन विचार कौशल्यांत सुधारणा होत असल्याचे डेटाचे संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषण सांगते. आपल्या सर्जक क्षमतांपेक्षा

डिझाइन पद्धती आणि प्रक्रिया वापरणे विद्यार्थ्यांना अधिक सुलभ गेले.

### 3. प्रकल्पांना निधी – निधी आणि पारितोषिके

ग्राहकाच्या न भागलेल्या गरजांपासून सुरु होणाऱ्या नव्या कल्पनेच्या नव्या विकासासाठी डिझाइन विचार हा अतिशय समर्थ दृष्टिकोन आहे. ग्राहकाच्या गरजा लक्षात घेऊन समस्यानिवारण करणारी ही मानवकेंद्री डिझाइन प्रक्रिया आहे. डिझाइन विचारात संकल्पना विकास, उपयोजित सर्जनशीलता, प्रारूपनिर्मिती आणि प्रयोगशीलता आदी गोष्टी येतात. याद्वारे डिझाइन निधी मिळविण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी विविध व्यासपीठे निर्माण केली जातात. व्यवसायांना विचार दृष्टिकोन दिल्याने नवकल्पना यशस्वी होण्याचे प्रमाण बऱ्यापैकी वाढल्याचे दिसून येते.

### 4. पुस्तक योगदान : आयपीआर, ग्रंथ, ब्लॉग्ज, प्रकाशने आणि लेख

डिझाइन संपदा आर्थिक मत्ता म्हणून वापरण्याची शक्यता धुंडाळण्यासाठी आणि इतरांच्या हक्कांच ढवळाढवळ होऊ नये म्हणून प्रकाशकांना व्यावहारिक माहिती दिली जाते. व्यापारी पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांवर प्राथमिक भर असला, तरी त्याच प्रकारचे साहित्य, पाठ्यपुस्तके, वृत्तपत्रे, नियतकालिके आणि कॉर्पोरेट साहित्य प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांसाठी या संकल्पना तितक्याच सुसंगत असतात.

### 5. सामाजिक प्रभाव : उद्योग प्रकल्प, इंटर्नशिप्स आणि प्रशिक्षण

चांगले पाठबळ असलेल्या वातावरणात उमेदवारी करताना उमेदवाराला महत्त्वाची कौशल्ये शिकणे, त्या क्षेत्राबाबत ज्ञान मिळवणे, त्यातील आपल्या भविष्याचा अंदाज घेणे शक्य होते.





# यशस्वितेसाठी कळीचे मुद्दे

## १. क्षमतावृद्धी आणि ब्रँडविस्तार : विद्यार्थी, शिक्षक आणि समुदाय (स्तंभ १)




## २. प्रत्यक्ष संशोधन प्रकल्पांत उपयोजन : विद्यार्थी उमेदवार आणि उद्योग प्रकल्प (स्तंभ २)




## ३. ज्ञान निर्मिती मंडळाला योगदान : आयपीआर, ग्रंथ, ब्लॉग्ज, प्रकाशने आणि लेख (स्तंभ ३)




## ४. समाजावर प्रभाव : प्रकल्प प्रसिद्धी, उद्योग, उमेदवारी आणि प्रशिक्षण (स्तंभ ४)



**५. निधीसंकलन : प्रकल्प आणि व्यावसायिकीकरण – निधी, पारितोषिके, उत्पन्न आणि रॉयल्टी (स्तंभ ५)**




## आमचा तज्ज्ञ शिक्षकांचा चमू



**डॉ. कैलास पाटील**
संचालक, सीओई-डीटीई



**डॉ. प्रशांत आचार्य**
उपसंचालक, सीओई-डीटीई



**प्रा. अपूर्वा ठोसर**
उपसंचालक, सीओई-डीटीई



**प्रा. मायकेल व्ही. तेस्तानी**
उपसंचालक, सीओई-डीटीई



**प्रा. (डॉ.) अवधूत अत्रे**
अधिष्ठाता (कला आणि डिझाइन)

### वेबिनार मालिका आंतरराष्ट्रीय वक्ते (व्हीयू-बीयू नवता तांत्रिक व्याख्याने (हब अँड स्पोक)

1. उद्योजकता (डॉ. मॅक्लॉइड) – फेब्रुवारी
2. क्लिष्ट प्रणाली (डॉ. सायमा) – मार्च
3. आरोग्य-उपचारांत एआय/एमएल (डॉ. वोन) – एप्रिल
4. ब्लॉकचेन (डॉ. नगरुर) – मे

## संशोधन प्रकल्प – निधीसाठी पाठपुरावा

### संशोधन विषय

1. शेती आणि ब्लॉकचेन (माहिती तंत्रज्ञान सुरक्षितता आणि अन्नसुरक्षा) – भारतीय शेतकऱ्यांना शेतमाल थेट ग्राहकांना विकण्यासाठीची व्यवस्था (विरुद्ध वितरकांमार्फत विक्री) – 30 दिवस
2. दिव्यांग व्यक्तींसाठी कोव्हिडपश्चात विशेष निवासव्यवस्था – 60 दिवस
3. सायबरसुरक्षा आणि डिझाइन विचार – धोरण रचना आणि अंमलबजावणी (संस्थेकडून अधिक चांगला स्वीकार आणि निकषपूर्ती) – 90 दिवस
4. वेळ : निधीसाठी पुढील 30, 60 आणि 90 दिवसांत अर्ज सादर करणे.
5. फलनिष्पत्ती : उच्च दर्जाच्या संस्थेत 1-2 परिषदा आणि शोधनिबंध, 2-3 आयपी नोंदणी (2021+) आणि नवोद्योग (2022+)

### उद्देश : सामाजिक प्रभाव निर्माण करणे

### क्लृप्त्या

1. डब्ल्यूडब्ल्यूएस उच्चप्रती विचारकौशल्ये कार्यशाळा (300+ विद्यार्थी)
2. विश्वकर्मा विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी विश्लेषणात्मक विचार कौशल्यांतील प्रशिक्षण (400+ विद्यार्थी)
3. विलो संरचना प्रकल्प पूर्ण करणे
4. कम्युनिटी डिझाइन आणि प्रसिद्धी प्रकल्प तयार करणे.

### फलनिष्पत्ती

1. सीओई ब्रँडचा विस्तार आणि जनजागृतीत वाढ
2. सीओईबाबत समाजात चांगली भावना आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे
3. 1-2 उद्योगप्रायोजित डिझाइन प्रकल्प (2021+)
4. सीओई उत्पादन डिझाइनमधील 1-2 नवोद्योग (2022+)
5. दर वर्षी 1-2 प्रसार कार्यक्रम (2022+)

# १. विलो – जलशुद्धिकरण उत्पादन रचना

### 1. विलो – जलशुद्धिकरण उत्पादन रचना

**प्रकल्प संकल्पना** – जलशुद्धिकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या अलीकडच्या काळातील तंत्रज्ञानाचा अभ्यास करून जलशुद्धिकरण उपकरणाचे डिझाइन आणि प्रारूप तयार करणे आणि त्याद्वारे जलशुद्धिकरण उपकरणाच्या नव्या डिझाइनमध्ये वापरता येतील, अशी महत्त्वाची स्मार्ट वैशिष्ट्ये प्रस्तावित करणे. विलो कंपनीची ब्रँड ओळख असलेल्या बूंदी रामवर आधारित याची रचनाभाषा असेल. अपव्यय कमी असल्याने आणि पाण्याची गुणवत्ता टिकून राहत असल्याने घरात किंवा संस्थांमध्ये वापरता येईल असे स्मार्ट जलशुद्धिकरण उपकरण विलो उमेदवारी प्रकल्पात तयार होत आहे. विलो चमूद्वारे विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांना या उमेदवारी प्रकल्पाबाबत मायक्रोसॉफ्ट टीम्सद्वारे 25 नोव्हेंबर 2020 ला ऑनलाइन पद्धतीने माहिती देण्यात आली.







# संयुक्त कंपनी सहकार्य – व्हीयू डिजिटल – यूजर संशोधन आणि व्हीयू डिजिटलसाठी यूएक्स/यूआय

## प्रकल्प संकल्पना – ई-लर्निंग केंद्र

व्हीयू डिजिटलला जनसामान्यांना दर्जेदार शिक्षण देणारे अध्ययन व्यासपीठ बनवणे

- जनसामान्यांना डिजिटल व्यासपीठांद्वारे शिक्षण उपलब्ध करणे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार आणि लवचीक असे ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करणे.
- ऑनलाइन अभ्यासक्रमांच्या माध्यमातून करिअर उभारणीला चालना.
- उद्योगांसाठी गुणवान मनुष्यबळ पुरवणे.

## उद्देश

- उद्योगांशी सहकार्य करून गरजांनुरूप लवचीक ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करणे.
- कालसुसंगत ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून विविध करिअरवाटांची उभारणी.
- व्यापक, लवचीक आणि सहज उपलब्ध होईल, अशी ऑनलाइन अध्ययन व्यवस्थापन प्रणाली उभी करणे.
- अद्ययावत ई-लर्निंग संसाधन विकास स्टुडिओची उभारणी करणे.
- डिजिटल अध्ययन आशय निर्माण करण्यासाठी मनुष्यबळ तयार करणे.
- मिश्र अध्ययन संसाधनांनी शिक्षकांना समृद्ध करणे.

## कॉपीराइट्स

1) शीर्षक : डिझाइन विचार प्रक्रिया
नोंदणी क्रमांक : L-87720/2019 तारीख : 09-12-2019

2) शीर्षक : सुरक्षितता धोरण आराखडा
नोंदणी क्रमांक : L-89371/2020 तारीख : 11-02-2020





# व्हीयू सेंटर ऑफ कम्युनिकेशन फॉर डेव्हलपमेंट
# पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभाग

## प्रेरणादायी कहाण्यांसाठी व्यासपीठ

- सामान्य माणसांच्या समस्यांवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी विकास संवाद
- स्त्रिया, मुले, आदिवासी, शेतकरी, कामकरी यांच्या संघर्षाचे दस्तावेजीकरण
- समाजाला या संघर्षरत व्यक्तींच्या कहाण्या सांगणे.
- शिक्षण आणि माध्यम क्षेत्रातील व्यक्ती म्हणून आमची ही जबाबदारी आहे.



## आमचा चमू

डॉ. किरण ठाकूर। प्रा. वैभव ठाकरे। प्रा. राधेश्याम जाधव। प्रा. मयुरेश बेलसरे
प्रा. रवी निकम। प्रा. अभिषेक भोसले। प्रा. राहुल मते। प्रा. विधी अगरवाल

११



# शिक्षकांचे उपक्रम

## शिक्षकसंख्या, स्वरूप (पात्रता, प्रदेश आणि लिंग)

शिक्षकभरतीसाठी असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन विश्वकर्मा विद्यापीठ करते. विद्यापीठातील मनुष्यबळ वर्षागणिक वाढते आहे. विद्यापीठात राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ, बिहार, तेलंगण, आंध्र प्रदेश, उत्तरांखड, त्रिपुरा आणि महाराष्ट्र येथील शिक्षक आहेत. पुरुष आणि स्त्री शिक्षकांचे संतुलित गुणोत्तर भरतीच्या वेळी लक्षात घेतले जाते.

| वर्ष | एकूण शिक्षक | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| २०१७ | ६१ | ४० | २१ |
| २०१८ | ६१ | ५३ | २८ |
| २०१९ | १०९ | ४६ | ६३ |
| २०२० | १३९ | ७१ | ६८ |



# शिक्षकांचे यश (पारितोषिके, एफडीपी)












## शिक्षकांचे यश (पारितोषिके, एफडीपी)

- डॉ. भारती ऐनापुरे, डॉ. योगेश देशपांडे, प्रा. नोशिर तारापोर आणि प्रा. रेश्मा पिसे यांना विविध सरकारी आणि कॉर्पोरेट निधी संस्थांकडून संशोधन मिळाला.
- डॉ. प्रसाद गोखले आयईईई कम्युनिकेशन नियतकालिक, जर्नल ऑफ ऑप्टिकल कम्युनिकेशन्स अँड नेटवर्किंग (जेओसीएन), स्प्रिंगर आदींचे अधिकृत रिव्ह्यूअर आहेत.
- प्रा. रेश्मा पिसे यांना एसयूएन जावा प्रमाणीकरण प्रक्रियेसाठी सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.
- निमिषा दोशीची (एसवायची विद्यार्थिनी) गूगलचे पाठबळ असलेल्या टॅलेंट स्प्रिंट विमेन इंजिनीअर्स कार्यक्रमासाठी निवड झाली; तसेच 2 लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली.
- प्रा. योगेश देशपांडे ग्लोबल व्हीआरएआर असोसिएशनच्या पुणे शाखेचे उपाध्यक्ष झाले.
- वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखा – यूएन-हॅबिटॅट आणि ग्लोबल कॉन्व्हेअन्ट ऑफ मेयर्स फॉर क्लायमेट अँड एनर्जी (जीसीओएम) सहआयोजक असलेल्या इनोव्हेट4सिटीज परिषदेसाठी सहकार्य
- वास्तुरचनाशास्त्र विद्याशाखेचा आय-बर्ग सेंटर ऑफ एक्सलन्सअंतर्गत असोचेम जीईएम ग्रीन बिल्डिंग कौन्सिलशी सामंजस्य करार
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे आणि डॉ. श्रद्धा खंपारिया इंडिया वॉटर डे कॉन्फरन्समध्ये सहभागी झाले; तसेच सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ह्ज पुणे, व्हीयू पुणे आणि आरएफआरएफने संयुक्तपणे आयोजिलेल्या द इंडिया वॉटर डिजिटल कॉन्फरन्समध्ये वक्ते म्हणून सहभागी झाले. एशियन एनजीओ आणि असिस्ट यांचे या परिषदेचे माध्यम सहकार्य होते.
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे आणि डॉ. श्रद्धा खंपारिया 1 ते 4 डिसेंबर 2019 दरम्यान कोलंबो, श्रीलंका येथे झालेल्या आयडब्ल्यूए-वॉटर अँड डेव्हलपमेंट काँग्रेस आणि प्रदर्शनात सहभागी झाले.
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे यांना तुकडीत पहिल्या वर्षांत केलेल्या असमान्य कामासाठी एस. बी. चंडालिया स्टुडंट्स एन्डाउमेंट पारितोषिक मिळाले आहे.
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सीईटी-I/सीईटी-II/ सीआरई-I/सीआरई-II अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष आहेत.
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या फूड टेक्नॉलॉजी/जैवरासायनिक अभियांत्रिकी/ पाइपिंग अभियांत्रिकी अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष आहेत.
- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे इंटरनॅशनल जर्नल ऑफ कॅटॅलिस्ट फॉर इंटरनॅशनल जे केमोस्फीअरचे रेफरी आहेत.

- प्रा. डॉ. धनंजय भातखंडे इंटरनॅशनल जर्नल ऑफ कॅटॅलिस्ट फॉर इंटरनॅशनल जे केमोस्फीअरचे रेफरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कर्मचारी निवड समितीचे सदस्य, व्हीआयटीच्या रसायनशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, शिवीजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या अभ्यास मंडळाचे स्वायत्त मंडळ सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे सदस्य आणि फेब्रुवारी 2020 पासून दोन वर्षांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रिसर्च अँड रेकग्निशन (आरआर) समितीचे सदस्य आहेत.

- डॉ. श्रद्धा खंपारिया यांनी पं. रविशंकर शुक्ला विद्यापीठ, रायपूर, छत्तीसगडच्या एमएस्सी रसायनशास्त्राच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळवला.

- डॉ. श्रद्धा खंपारिया यांना स्वामी विवेकानंद तंत्र विद्यापीठ, भिलई, छत्तीसगड येथील एन्व्हायर्न्मेंट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट पदव्युत्तर प्रमाणपत्र अभ्यासक्रमात सुवर्णपदक मिळाले.

- डॉ. श्रद्धा खंपारिया यांना सिम्बायोसिस विद्यापीठातर्फे ज्युनिअर रिसर्च फेलोशिप मिळाली.

- डॉ. श्रद्धा खंपारिया यांना एनयूव्ही कॉन्फरन्स, गुजरात आणि एनसीआयसीएसटी, कन्याकुमारी येथे शोधनिबंध सादर केल्यानंतर सर्वोत्तम शोधनिबंध पुरस्कार मिळाला.

- डॉ. श्रद्धा खंपारिया आणि प्रा. डॉ. धनंजय भातखंडे यांना विश्वकर्मा विद्यापीठातर्फे 1 ते 5 डिसेंबर 2020 दरम्यान झालेल्या ग्लोबल सॅनिटेशन ग्रॅज्युएट स्कूल, आयएचई डेल्फ्ट, नेदरलँड कार्यशाळेसाठी पाठविण्यात आले होते.

- डॉ. श्रद्धा खंपारिया सिम्बायोसिस विद्यापीठातील अभियांत्रिकी विद्याशाखेच्या पीएचडी निवड समितीत विषयतज्ज्ञ म्हणून होत्या.

- डॉ. श्रद्धा खंपारिया इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्सच्या पिंपरी-चिंचवड शाखेतर्फे विलो इंडियाच्या सहकार्याने 13 जून 2019 रोजी आयोजित परिषदेत आरओ ट्रीटमेंट या विषयावरील तज्ज्ञ व्याख्यात्या होत्या.

- डॉ. श्रद्धा खंपारिया विश्वकर्मा विद्यापीठातील विद्यापीठ स्तरीय परीक्षा तक्रार निवारण समितीच्या सदस्य आहेत.

- डॉ. श्रद्धा खंपारिया विश्वकर्मा विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत अभियांत्रिकी विज्ञानाच्या अभ्यासक्रम मंडळावर विषयतज्ज्ञ म्हणन कार्यरत आहेत.

- डॉ. श्रद्धा खंपारिया आफ्रिकन जर्नल ऑफ एन्व्हायर्न्मेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पोलिश जर्नल ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, ग्लोबल जर्नल ऑफ

एन्व्हायर्न्मेंटल सायन्स अँड मॅनेजमेंट आणि इंटरनॅशनल जर्नल ऑफ वॉटर अँड वेस्ट वॉटर ट्रीटमेंट, एन्व्हायर्न्मेंट, डेव्हलपमेंट अँड सस्टेनेबिलिटी, द केमिकल इंडस्ट्री अँड केमिकल इंजिनीअरिंग क्वार्टर्लीच्या रेफरी आहेत.

- डॉ. भूपेंद्र सिंग यांना बनारस हिंदू विद्यापीठ येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'मेंटल इमेज, पर्सनॅलिटी अँड इमोशन्स अमंग फीमेल एनसीसी कॅडेट्स अँड नॉन कॅडेट्स (2016)' या विषयावरील शोधनिबंध सादरीकरणात सर्वोत्तम शोधनिबंध पुरस्कार मिळाला.

- डॉ. विद्या भाटे

1. आयआयई-2004 कडून एमफिलसाठी अभ्यासवृत्ती
2 एनएसआय वार्षिक सभा, कोलकाता, नोव्हेंबर 2006 मध्ये सर्वोत्तम तोंडी सादरीकरणासाठी रामनाथन पारितोषिक
3. डीओएचएडी आंतरराष्ट्रीय परिषद, ऑस्ट्रेलिया, नोव्हेंबर 2007 येथे शोधनिबंध सादरीकरणासाठी प्रायोजकत्व
4. एनएसआय वार्षिक सभा, चेन्नई, नोव्हेंबर 2008 येथे सर्वोत्तम पोस्टर सादरीकरणासाठी हवेलीराम पसरिचा पारितोषिक
5. डीओएचएडी सोसायटीतर्फे आंतरराष्ट्रीय परिषद, चिली, नोव्हेंबर 2009 येथे शोधनिबंध सादर करण्यासाठी प्रवासनिधी

डॉ. कीर्ती व्यास

1. आयसीपीएस-2019, पॅरिस, फ्रान्स येथील असोसिएशन ऑफ सायकोलॉजिकल सायन्सेसमध्ये पोस्टर सादरीकरणासाठी प्रवासनिधी
2. आयसीएसएसआर डॉक्टोरल अभ्यासवृत्ती प्रदान

| अनुक्रम | शिक्षकाचे नाव | यश |
|---|---|---|
| 1. | डॉ. सुनंदा मलिक | इंटरनॅशनल जर्नल ऑन डेटा सायन्स अँड टेक्नॉलॉजीसाठी रिव्ह्यूअर म्हणून नेमणूक |
| 2. | डॉ. रामकुमार कृष्णमूर्ती | 5 मार्च 2021 ते 6 मार्च 2021 या कालावधीत झालेल्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन सस्टेनेबल एडव्हान्स्ड कम्प्युटिंगसाठी (आयसीएसएसी 2021) रिव्ह्यूअर |

- डॉ. भारती एस. ऐनापुरे यांना भारत एज्युकेशनल एक्सलन्स अवॉर्डतर्फे उत्तम अध्यापिका पारितोषिक
- डॉ. कैलास पाटील यांना इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रीयल अँड सिस्टीम्स इंजिनीअर्स (आयआयएसई) येथील इंजिनीअरिंग लीन अँड सिक्स सिग्मामधील सर्वोत्तम शोधनिबंध अवॉर्डमध्ये पहिले उपविजेतेपद प्राप्त
- डॉ. कैलास पाटील यांची नॅशनल क्रिटिकल इन्फर्मेशन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोटेक्शन सेंटरतर्फे (एनसीआयआयपीसी) भारतातील पहिल्या 15 सायबर सुरक्षा संशोधकांत नोंद.
- डॉ. प्रीती मेहता यांना डीएचएस फाउंडेशन, नवी दिल्लीतर्फे 2021 वर्षासाठी बेस्ट यंग अचिव्हर पारितोषिक

१२



# विद्यार्थ्यांचे उपक्रम


3000
2500
2000
1500
1000
500
0
2017-18
2018-19
2019-20
2020-21
Student Strength
Student Admissions

## विद्यार्थ्यांचे यश (शैक्षणिक, क्रीडा, पाठ्यक्रमेतर)

1. प्रबल मेहरोत्रा – युनायटेड नेशन्स ऑन रुरल लिटरसी अँड अनएम्प्लॉयमेंटच्या सहकार्याने एनएमआयएमएस इन्स्टिट्यूट येथील सोशल कॉन्क्लेव्हमधील अभिरूप पंचायतीत सहभाग

2. मंजिरी जुम्बडे – लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती

3. वृती मेडटिया - लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती

4. फॉर्म्युला भारततर्फे आयोजित एफएसईव्ही (फॉर्म्युला स्टुडंट इलेक्ट्रिक व्हेइकल) या आंतरराष्ट्रीय ऑनलाइन स्पर्धेत यांत्रिक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या ओव्हरड्राइव्ह चमूचा सहभाग

5. एफएमएईने आयोजित केलेल्या 'ईएफकेडीसी'मध्ये (इलेक्ट्रिक फॉर्म्युला कार्ट डिझाइन चॅलेंज) ओव्हरड्राइव्ह चमूने प्रथमच विजेतेपद पटकावले. यामुळे कारी मोटर स्पीडवेत आयोजित एफकेडीसीत चमूला थेट प्रवेश मिळाला.

6. आयएसएनईई मोटरस्पोर्टतर्फे आयोजित ई-जीकेडीसीत (इलेक्ट्रिक गोकार्ट डिझाइन चॅलेंज) चमूला दुसरा क्रमांक. आपल्या दुसऱ्याच स्पर्धेत चमूने पहिला करंडक मिळवला.

7. एमएस्सी एफवाय सत्र-1 ची (वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट) विद्यार्थिनी गौरी गौरीधर 'इकॉनॉमिक टाइम्स'तर्फे 17 डिसेंबर 2020 रोजी आयोजित वॉटर कॉन्क्लेव्हमध्ये सहभागी झाली.

8. एमएस्सी एफवाय सत्र-1 च्या (वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट) विद्यार्थिनी गौरी गौरीधर आणि कनिमोळी ए या विद्यार्थिनी विश्वकर्मा विद्यापीठातर्फे 22 मार्च 2021 रोजी आयोजित वर्ल्ड वॉटर डे सेलिब्रेशनमधील 'बूंद बूंद से सागर' उपक्रमातील पोस्टर स्पर्धेत सहभागी झाल्या.

9. एमएस्सी एफवाय सत्र-1 ची (वेस्ट वॉटर अँड सॅनिटेशन मॅनेजमेंट) विद्यार्थिनी गौरी गौरीधर विश्वकर्मा विद्यापीठातर्फे 30 जून 2021 रोजी आयोजित 'स्टॅटिस्टिक्स डे'मध्ये सहभागी झाली.

10. हृषीकेश ढवळे या विद्यार्थ्याने (बीए सहावे सत्र) एमआयसीई मॅनेजमेंटमध्ये 26 मे ते 10 जून 2020 या कालावधीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला.

11. राधा चव्हाण या विद्यार्थिनीने (बीए सहावे सत्र) 21 जुलै 2019 रोजी फर्स्ट डॅन ताएक्वांदो प्रमोशन टेस्ट पूर्ण केली.

12. सहेरीश खान या विद्यार्थिनीने (बीए सहावे सत्र) क्वीक हीलतर्फे 2019 मध्ये आयोजित साय-फाय कला महोत्सवात लघुपट विभागात सर्वोत्तम अभिनेत्रीचे पारितोषिक मिळवले.

## व्हीयू येथील पाठ्यक्रमेतर उपक्रम

विश्वकर्मा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी एमआयटी, एडीटी, लोणीतर्फे आयोजित विश्वनाथ क्रीडा स्पर्धा 2020 या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेतला. टेबल टेनिस, व्हॉलिबॉल आणि फुटबॉल स्पर्धांत विद्यार्थ्यांनी भाग घेतला. व्हीयू टेबल टेनिस संघाने स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला. त्यांना माजी कसोटी क्रिकेटपटू चंदू बोर्डे यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. प्रा. कैलास भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.














**‘वार्षिक क्रीडा स्पर्धा 2020’मध्ये विश्वकर्मा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.**

## क्रिकेट (मुलगे आणि मुली)





## एथलेटिक्स 100 मीटर रिले (मुलगे आणि मुली)





## व्हॉलिबॉल आणि कबड्डी (मुलगे)





## कॅरम (मुली आणि मुलगे)











## २ ऑक्टोबर २०२० रोजी वृक्षारोपण

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 151 व्या जयंतीनिमित्त विश्वकर्मा विद्यापीठाने आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला. पुणे महापालिकेने मंजूर केलेल्या चंदन, कैलासपती आदी 48 भारतीय वृक्षांची रोपे या मोहिमेत लावण्यात आली. कोव्हिड 19 साथरोगाबाबत असलेल्या सरकारी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून हा कार्यक्रम पार पडला.



## ‘एसबीएसआय’बाबत गावकऱ्यांकडून : व्हिडिओ










## विश्वकर्मा विद्यापीठाला नुकताच यूबीएकडून निधी प्राप्त झाला...

- यूबीएअंतर्गत 1.75 लाख रुपये निधी मिळण्यासाठी अंतिम यादीत निवड
- राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, साखराळे (सी-11208)
- थडोमल शहानी इंजिनीअरिंग कॉलेज (सी-3368)
- विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (सी-41497)
- सिम्बायोसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ) यू-0329)
- विश्वकर्मा विद्यापीठ (यू-0888)

## योगदिन साजरा



## स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिन साजरा



## एनएसएस, एनसीसी आणि इतर उपक्रम
## विश्वकर्मा विद्यापीठाला एनएसएससाठी मान्यता मिळाली आहे.

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

राष्ट्रीय सेवा योजना
National Service Scheme
युवा कार्यक्रम और खेल मंत्रालय
Ministry of Youth Affairs and Sports
भारत सरकार
Government of India

१३



# आंतरराष्ट्रीय अस्तित्व

## सामंजस्य करार

वुफेंग विद्यापीठ – सामंजस्य करार
कोरिया इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, दक्षिण कोरिया - सामंजस्य करार
नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी – करार
मीत्रा यूजी, बर्लिन, जर्मनी - सामंजस्य करार
इकोल नॅशनेल सुपीरियोर माइन्स – टेलिकॉम लिल सुओई – करार
ओन्टारियो युनिव्हर्सिटी इंटरनॅशनल - सामंजस्य करार
नॅशनल युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया – करार
नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर - सामंजस्य करार
हॉफ युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस हॉफ, जर्मनी – करार
कासेत्सार्त युनिव्हर्सिटी, थायलंड, बँकॉक – करार
द युनिव्हर्सिटी ऑफ एन्गाउंदेरे - सामंजस्य करार
बिंगहॅम्प्टन युनिव्हर्सिटी स्टेट प्रायव्हेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क - सामंजस्य करार
ईके अफेअर्स लिमिटेड - सामंजस्य करार
एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी - सामंजस्य करार
क्यूआय स्क्वेअर पीटीई लि. - सामंजस्य करार

## आंतरराष्ट्रीय संबंध

आंतरराष्ट्रीय सहकार्य

**विद्यार्थी आदान-प्रदान**

| अनुक्रम | नाव | Programme | University | Duration |
|---|---|---|---|---|
| 1. | आनंद मुनोत | बीबीए (सी अँड एम) | यॉर्क युनिव्हर्सिटी, कॅनडा | सप्टेंबर 19 ते डिसेंबर |
| 2. | तनिष्का खराडे | बीबीए (सी अँड एम) | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | ऑक्टो. 19 ते फेब्रु. 20 |
| 3. | जयदीप नाडकर्णी – | एमबीए (सी अँड एम) | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | ऑक्टो. 19 ते फेब्रु. 20 |
| 4 | प्रथमेश हिरे | एसवाय मेक (एस अँड टी) | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | ऑक्टो. 19 ते फेब्रु. 20 |



## समर स्कूल

| अ.क्र. | नाव | अभ्यासक्रम | विद्यापीठ | कालावधी | उन्हाळी सत्र |
|---|---|---|---|---|---|
| 1. | हरिहरन चंद्रेशेखरन | एमए इकॉनॉमिक्स | होफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | 10 जुलै ते 31 जुलै 2019 | 10 जुलै ते 31 जुलै 2019 |
| 2. | योगिकुमार पटेल | बीबीए (सी अँड एम) | | 9 जुलै ते 26 जुलै 2019 | उत्पादन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन |
| 3. | भविन रुपारेल | बीबीए (सी अँड एम) | | | |
| 4 | सुहास कारे | बीबीए (सी अँड एम) | | | |
| 5 | आयुषी पटेल | बीबीए (सी अँड एम) | | | |
| 6 | शुभम उगले | बीबीए (सी अँड एम) | | | |
| 7 | मानस उमेश मुंधडा | एसवाय मेकॅनिकल (एस अँड टी) | | | |
| 8 | आकांक्षा वशिष्ठ | बीबीए (सी अँड एम) | होफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | जानेवारी ते मे 2020 | - |
| 9 | डेव्हिड निनान | बीएससी कम्प्युटर सायन्स | | | |
| 10 | गौरी करंजकर | बीए फॅशन डिझाईन | | | |
| 11 | सोहम महाजन | बी.टेक. मेकॅनिकल | | | |
| 12 | आर्या पानसे | बी.डिझाइन | होफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | सप्टेंबर ते डिसेंबर 2021 | |
| 13 | साक्षी पुनमिया | बी.डिझाइन | | | |
| 14 | सुयोग जोशी | बीबीए (सी अँड एम) | | | |
| 15 | वैष्णवी जावडेकर | बी. डिझाइन | | | |

## आंतरराष्ट्रीय संबंध

आंतरराष्ट्रीय सहकार्य

### शिक्षक आदान-प्रदान उपक्रम

| अ.क्र. | नाव | अभ्यासक्रम | विद्यापीठ | कालावधी | समर स्कूल |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आशिष थिटे | सी अँड एम | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | 10 ते 15 जुलै 2019 | उत्पादन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन |
| 2. | प्रा. डॅनिएल वेर्नेर | सी अँड एम | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | 24 ते 27 जुलै | बिझनेस सिम्युलेशन मोड |
| 3. | प्रा. श्मोल | सी अँड एम | हॉफ युनिव्हर्सिटी, जर्मनी | 24 ते 27 जुलै | |



आंतरराष्ट्रीय सहकार्य

## एनटीयू इंटर्नशिप प्रोग्राम

जून (1/2- 28/29)

शाश्वतता

गणन विचारप्रक्रिया

व्हीयू ट्रॅव्हल अँड टुरिझम विभागातर्फे व्यवस्थापन

एनटीयू स्पिन ऑफचे प्रमाणपत्र

उद्योगभेटी

1. हवामानबदल आणि त्याचा शाश्वततेवर परिणाम
2. शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय नियोजन
3. हरित आणि स्मार्ट इमारती
4. शाश्वत स्वच्छ ऊर्जा
5. शाश्वत शहरी दळणवळण
6. शाश्वत सांडपाणी आणि पाणी व्यवस्थापन
7. पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक्समधील शाश्वतता
8. डिझाइन विचार

1. एनईवॉटर
2. बीसीए
3. यूआरए
4. एलटीए
5. कलादालन
6. सर्जनशील कार्यशाळा
7. मरिना बॅरेज
8. सिंगापूर मोबिलिटी गॅलरी

## सहकार्य

- कोरियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्रॉलॉजी
- स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क, बिंगहॅम्प्टन, यूएसए
- नॅशनल युनिव्हर्सिटी, यूएसए
- द युनिव्हर्सिटी ऑफ एन्गाउंदेरे, कॅमेरुन
- वुफेंग युनिव्हर्सिटी, तैवान
- ओंटारिओ युनिव्हर्सिटीज इंटरनॅशनल
- हॉफ युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्सेस, जर्मनी
- इम्त लिल दोआई, फ्रान्स
- कासेत्सार्त युनिव्हर्सिटी, थायलंड
- एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्रॉलॉजी, बँकॉक, थायलंड
- चुलालोंगकोर्न स्कूल ऑफ इंटिग्रेटेड इनोव्हेशन, थायलंड
- स्कूल ऑफ कम्प्युटिंग, नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर
- एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूट, एनटीयू, सिंगापूर



# आंतरराष्ट्रीय प्रकल्प

विश्वकर्मा विद्यापीठाच्या पर्यावरणस्नेही उपक्रमांतर्गत पुढील पाच संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले असून, नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूरच्या एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आले आहेत.



# ऊर्जा लेखापरीक्षण

## प्रकल्प शिक्षक चमू

माया कुरुळेकर। मृण्मयी रानडे। डॉ. सिद्धार्थ जबडे। डॉ. योगेश देशपांडे। डॉ. कैलास पाटील। नीलेश जाधव

## विद्यार्थ्यांची यादी

अथर्व जोशी। यश सूर्यवंशी। न्याती खंडेलवाल। आकाश मुंदडा। हृतिक बागणे। जान्हवी पांड्या। प्रतीक हवाल। पक्षम शर्मा

## ध्येय आणि उद्दिष्ट

- मानकीकरण आणि भारतातील व्यावसायिक, औद्योगिक आणि शैक्षणिक इमारतींचा उदाहरणादाखल अभ्यास
- वरील अभ्यासांसाठी कामगिरीच्या आकलनापर्यंत पोचणे.
- आयईएस व्हीई सॉफ्टवेअरची अंमलबजावणी

## पद्धती

ऊर्जा लेखापरीक्षण प्रकल्पासाठी 3 उदाहरणे घेण्यात आली. पारंपरिक लेखापरीक्षणात सर्व ठिकाणांचे निरीक्षण करण्यात येते. आभासी ऊर्जा लेखापरीक्षणात प्रत्यक्ष गोष्टी कशा घडतील, याचा एक प्रयोग केला जातो. त्यामुळे ती स्वयंपरिणामकारक ऊर्जासंवर्धन मत्ता होते. हे क्षेत्र हरित करिअर पर्याय आहे आणि याला समृद्ध भविष्य आहे. त्यामुळे आभासी ऊर्जा लेखापरीक्षण ही पद्धत या प्रकल्पासाठी निवडली गेली.
आयईएस व्हीई सॉफ्टवेअर हे या प्रकल्पासाठी साधन म्हणून वापरले गेले.






## निष्कर्ष

1) शैक्षणिक इमारत

(विश्वकर्मा विद्यापीठ मुख्य इमारत)

2) व्यावसायिक इमारत

(सुयोग सेंटर – विश्वस्त मंडळ कार्यालय)

3) औद्योगिक इमारत

(आकार फाउंड्री)

आयईएस व्हीई सॉफ्टवेअरमध्ये सिम्युलेशनसाठी तयार केलेली प्रारूपे खाली दिली आहेत.




## प्रकल्पाचे लाभार्थी

विश्वकर्मा विद्यापीठाचे विद्यार्थी, शिक्षक आणि ज्यांचा अभ्यास केला गेला, तेथील घटक ऊर्जा प्रकल्पाचे लाभार्थी ठरले.

## यश

उदाहरणादाखल केलेल्या अभ्यासातील निष्कर्षांवर शोधनिबंध लिहिला गेला. तो आयईईई एक्सप्लोअरमध्ये प्रकाशित झाला. थायलंडमधील फुकेत येथे ऑक्टोबर 2018 मध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी हा शोधनिबंध इंटरनॅशनल ग्रीन बिल्डिंग कॉन्फरन्समध्ये सादर केला. आयईएस व्हीई इंडिया प्रा. लि.तर्फे 3 विद्यार्थ्यांना मानधनासह उमेदवारी करण्याची संधी दिली गेली.

### 3. स्व-सक्षम स्मार्ट संवेदकांसाठी व्यावसायिक प्रारूप विकसित करण्यासाठी मार्केट संशोधन

स्व-सक्षम स्मार्ट संवेदकांसाठी व्यावसायिक प्रारूप विकसित करण्यासाठी मार्केट संशोधन करणे त्यांच्या भारतीय बाजारपेठेतील यशस्वी प्रवेशासाठी मार्गदर्शक ठरले. स्पायडर सेन्सर हे बिनतारी अगदी कमी शक्तीचे लवचीक असे हार्डवेअर व्यासपीठ आहे. यामध्ये तापमान संवेदक, दाब संवेदक, एक्सिलरोमीटर, गायरोस्कोप, ल्युमिनॉसिटी संवेदक, मॅग्नेटोमीटर, प्रॉक्झिमिटी संवेदक इत्यादींचा समावेश आहे. हा ऊर्जा संवोदक असल्याने बाहेरच्या ऊर्जा स्रोताची त्याला आवश्यकता नाही. जाणलेला डेटा बिनतारी दळणवळणाद्वारे पाठवता येतो.

**उपक्रम**

- बाजारपेठ स्थिती : बाजारपेठेचा आकार (सध्याचा आणि भविष्यातील), बाजाराचे वस्तुमान (मागणी), पर्यावरणीय विश्लेषण यांचा अभ्यास करणे – बाह्य (पीईएसटीईएल) बाजारपेठ संधी आणि जोखमी (सध्याच्या आणि भविष्यातील) जाणून घेणे.

- ग्राहकसज्जता : ग्राहक (उद्योग, संवेदक, क्षेत्रे, कार्यप्रणाली इ.), वर्गीकरण जाणून घेणे, विविध स्तरांवरील ग्राहकसज्जता (जागरुकता, ज्ञान, प्राथमिक रुची, स्पर्धेतील उत्पादनांच्या तुलनेत प्राधान्य, हेतूसाठीची योग्यता, खरेदीचे कारण इ.) माहीत करून घेणे.

- स्पर्धक स्थिती : स्पर्धक, स्पर्धक उत्पादने, उत्पादनांची माहिती, ग्राहक यांची माहिती घेणे.

- बाजारपेठेतील संमिश्रतेची अंतदृष्टी : ग्राहकाच्या गरजा, उत्पादन उपलब्धता, दर्जा आणि इतर घटकांची माहिती करून घेणे, वितरण वाहिन्यांचा अभ्यास करणे, किमतीची रचना – मूल्यसाखळी प्रारूप, बाजारपेठेतील नफाक्षमता आदी माहीत करून घेणे, विस्तृत अर्थव्यवस्था व्यापण्यासाठी संसाधने आणि क्षमतेवर टिप्पणी करणे.

**4. सोलर नॅनो कोटिंग प्रकल्पावर अहवाल**

कार्यक्षमता वाढविण्यासाठी सौर पॅनेल्सवर नॅनो कोटिंग – कोटिंग साहित्य सिंगापूरमध्ये वापरुन आणि चाचणी करून बघितले गेले; पण भारतातील धूलिमय वातावरणात आणि त्यातल्या त्यात जास्त पावसात याचा टिकाऊपणा कमी कालावधीसाठी आहे. त्यामुळे भारतीय वातावरणात कोटिंग टिकण्यासाठी काही सुधारणा आवश्यक आहेत.

**5. भारतात ऊर्जा कार्यक्षमता लेखापरीक्षण सेवा**

भारतातील इमारतींसाठी बाजारपेठ संशोधन आभासी लेखापरीक्षण सेवांवर व्यावसायिक प्रारुपाद्वारे अभ्यास, भारतीय बाजारपेठेत यशस्वी प्रवेश करण्याचे योग्य मार्गदर्शन.

**उपक्रम**

- बाजारपेठ स्थिती : बाजारपेठेचा आकार (सध्याचा आणि भविष्यातील), बाजाराचे वस्तुमान (मागणी), पर्यावरणीय विश्लेषण यांचा अभ्यास करणे – बाह्य (पीईएसटीईएल) बाजारपेठ संधी आणि जोखमी (सध्याच्या आणि भविष्यातील) जाणून घेणे.
- ग्राहकसज्जता : ग्राहक (उद्योग, संवेदक, क्षेत्रे, कार्यप्रणाली इ.), वर्गीकरण जाणून घेणे, विविध स्तरांवरील ग्राहकसज्जता (जागरुकता, ज्ञान, प्राथमिक रुची, स्पर्धेतील उत्पादनांच्या तुलनेत प्राधान्य, हेतूसाठीची योग्यता, खरेदीचे कारण इ.) माहीत करून घेणे.
- स्पर्धक स्थिती : स्पर्धक, स्पर्धक उत्पादने, उत्पादनांची माहिती, ग्राहक यांची माहिती घेणे.
- बाजारपेठेतील संमिश्रतेची अंतदृष्टी : ग्राहकाच्या गरजा, उत्पादन उपलब्धता, दर्जा आणि इतर घटकांची माहिती करून घेणे, वितरण वाहिन्यांचा अभ्यास करणे, किमतीची रचना – मूल्यसाखळी प्रारुप, बाजारपेठेतील नफाक्षमता आदी माहीत करून घेणे, विस्तृत अर्थव्यवस्था व्यापण्यासाठी संसाधने आणि क्षमतेवर टिप्पणी करणे.

१४



# उद्योगक्षेत्राशी संपर्क

## विश्वकर्मा विद्यापीठ – करिअर साह्य कार्यालय (सीएसओ)

### करिअर साह्य कार्यालयाचे तत्त्वज्ञान

विद्यार्थ्यांना नोकरभरतीमध्ये साह्य, दृष्टीविस्तार आणि करिअरसज्ज होण्यासाठी अधिक चांगल्या पद्धतींची माहिती देण्यासाठी विश्वकर्मा विद्यापीठ कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांची जगणे आणि जीवनकौशल्ये या दोन्हींची क्षमता वाढविणे हे ध्येय आहे. प्राधान्यक्रम, कौशल्ये आणि करिअरमार्ग ठरविण्यासाठी विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या अलीकडील वर्षातील विद्यार्थ्यांसाठी त्या तुकडीचे एकूण स्वरूप काय आहे, हे माहीत करून घेण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे सर्वोत्तम प्रशिक्षण, मार्गदर्शन, नोकरीच्या संधी आणि करिअर प्रगतीसाठीच्या संधी देणे शक्य होते. व्हीयूतील करिअर साह्य कार्यालय अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना कॅम्पस नोकरभरती कार्यक्रमाचा एक भाग म्हणून नोकरीच्या संधी, नोकरीच्या आवश्यकता, उमेदवारीच्या संधी आणि मानधनासह मिळणारे प्रकल्प यासाठी सहकार्य करते.

### नोकरभरती आणि करिअर प्रगती साह्य कार्यक्रम (पीसीपीएपी)

आमचे नोकरभरती आणि करिअर प्रगती साह्य कार्यक्रम (पीसीपीएपी) आणि कॅम्पस नोकरभरती मोहिमा विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि ऑनलाइन, ऑफलाइन व कॅम्पस नोकरभरतीच्या संधी देतो.




| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक सहयोजन (प्रात्यक्षिक, गृहपाठ, उद्योगसुसंगत पाठ्यक्रम, कौशल्य अभ्यासक्रम) उद्योगांचा झरोका खुला करणे (भेटी, कार्यशाळा, उद्योगांशी संवाद) प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण (सत्र उमेदवारी, उन्हाळी उमेदवारी, थेट प्रकल्प) | क्षेत्र-तांत्रिक (नवीन कल, डिजिटल युग कौशल्ये, प्रगत विषय) सॉफ्ट स्किल्स (सादरीकरण, संघभावना, नेतृत्व, देहबोली, गटचर्चा, वैयक्तिक मुलाखत) कॉर्पोरेट (व्यवसाय शिस्त, कार्यालयीन उत्पादकता, व्यावसायिक कार्यक्षमता, पोर्टफोलिओ, लिंक्ड-इन) | पद्धती (अभिरूप गटचर्चा, अभिरूप वैयक्तिक मुलाखत, अभिरूप कलचाचणी, रेझ्युमे लेखन, पोर्टफोलिओ विकसन, समुपदेशन) मोहिमा (ऑफलाइन मोहिमा, ऑनलाइन मोहिमा, कंपनीअंतर्गत मोहिमा, पूल कॅम्पस) हस्तांतरण (पूर्वभरती औपचारिकता, रुजू होण्याकरिता साह्य) |

### नोकरभरती आणि करिअर प्रगती साह्य कार्यक्रमाची उद्दिष्टे

- शिक्षणाबरोबरच करिअर प्रगती आणि भरतीसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे.
- संवादकौशल्ये मूलभूत क्षमता निर्माण करणे; प्रकल्प सादरीकरण आणि कथाकथन; डेटा साक्षरता; कल; मूल्ये, व्यावसायिक तत्त्वे, दृष्टिकोन आणि भावनिक बुद्धिमत्ता; आणि मूलभूत ज्ञानाचे उपयोजन.
- विद्यापीठाचे उद्योग संपर्कजाळे वापरून विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधी निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांना कॅम्पस ते कार्यस्थळ या प्रवासात मार्गदर्शन आणि सहकार्य करणे.

### करिअर प्रगतीच्या वाटा आणि सहकार्य पद्धत

ज्यांना रुची आहे, अशा उमेदवारांना उद्योजकता, स्पर्धा परीक्षा आणि पुढील शिक्षण या अनुषंगाने त्यांचे करिअरमार्ग ध्येय पूर्ण करण्यासाठी विश्वकर्मा विद्यापीठ साह्य करते. नवे सामाजिक-आर्थिक वास्तव लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अनेक मार्ग धुंडाळून त्यातून सर्वोत्तम निवडण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

विद्यार्थ्यांना उद्योजकता (आय-क्यूब कक्ष), उच्च शिक्षण (आंतरराष्ट्रीय संबंध कक्ष), स्पर्धा परीक्षा (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष) यांसह इतर करिअर प्रगती आकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक मजबूत यंत्रणा आम्ही उभी केली आहे.



## उद्योग संपर्क (२०१७-२०२०)

**१०००+** उद्योगांशी संपर्क

**७००+** विद्यार्थी उमेदवारी आणि प्रकल्प

**४००+** नोकरभरती करणारे प्रतिष्ठित उद्योग

**५०+** उद्योग सहकार्य

## करिअर प्रगतीबाबत ताज्या नोंदी (२०१९-२०२१)

कॅम्पस भरतीमध्ये, तसेच व्यावसायिक संपर्कजाळ्याद्वारे नोकरी मिळविलेल्या व्हीयूच्या माजी विद्यार्थ्यांची सारांश रुपात माहिती खाली देण्यात आली आहे.

| करिअर प्रगती | 2021 ची तुकडी | 2020 ची तुकडी | 2019 ची तुकडी |
|---|---|---|---|
| नोकरी | 181 | 107 | 36 |
| व्यवसाय | 56 | 24 | 08 |
| उच्च शिक्षण | 64 | 34 | 0 |



# सर्वाधिक नोकरभरती करणाऱ्या संस्था (२०१९-२०२१)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Psychology | Graphic Design | Retail | Operations | Music |
| Finance | Design | UI UX | Statistics | Interior |
| Product Design | Travel & Tourism | Tech Mahindra | IB | Animation |

## उमेदवारी आणि प्रकल्प (२०१७-२०२१)

सत्र/ दीर्घकालीन उमेदवारी
**१५०+**

उन्हाळी सुट्टीतील उमेदवारीच्या संधी
**२००+**

प्रत्यक्ष प्रकल्प
**३५०+**

## उमेदवारी आणि प्रकल्पांसाठी भरती करणाऱ्या आघाडीच्या कंपन्या

**इंडस्ट्री ऑन कॅम्पस उपक्रमाचा भाग म्हणून संयुक्तपणे काम करता येतील, असे काही मुद्दे वेगळे काढण्यात आले आहेत...**

1. विद्यार्थ्यांसाठी थेट प्रकल्पांवर काम, उमेदवारी आणि गृहपाठ
2. प्रत्यक्ष कामाद्वारे आणि संवादी सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण
3. उद्योगांबरोबर नियोजित कार्यक्रमांद्वारे शिक्षकांची क्षमतावृद्धी
4. अध्यापन-अध्ययन-मूल्यमापन आणि करिअरसाह्य यामध्ये अधिक सहभाग
5. व्यावसायिकांना साह्य करण्यासाठी आणि त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संयुक्त मंच आणि क्लबची स्थापना

# इंडस्ट्री ऑन कॅम्पस – कला आणि डिझाइन विद्याशाखा



























## उद्योग सल्लागार मंडळ (आयएबी) – कला आणि डिझाइन विद्याशाखा

उद्योगाच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांनी सुसंगत्व, संदर्भ आणि तयारी करावी, यासाठी विषयविशिष्ट उद्योग सल्लागार मंडळांची व्हीयूत स्थापना होत आहे.

**याचे उद्देश पुढीलप्रमाणे**

**- उद्योग-विद्यापीठ संपर्क मजबूत करणे.**

**- रोजगारक्षम प्रयत्नांत सुधारणा करणे.**

**- अध्यापन-अध्ययनात उद्योगांचा दृष्टिकोन आणणे.**

**- उद्योगांच्या गरजांबाबत शिक्षकांमध्ये जागरुकता आणणे.**

**- विद्यार्थ्यांना उद्योगांतील गरजा माहीत व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करणे.**

या मंडळामध्ये उद्योगांतील वरिष्ठ व्यावसायिक, व्यवसाय नेतृत्व, उद्योजक, व्यावसायिक मंडळांचे पदाधिकारी आणि सामाजिक संस्थांतील नेतृत्वाचा समावेश आहे.





## संस्था – सहकार्याचे स्वरूप – संस्थेबाबत थोडक्यात माहिती

| संस्था | सहकार्याचे स्वरुप | संस्थेबाबत थोडक्यात माहिती |
|---|---|---|
| फिलिप्स हेल्थकेअर | सामंजस्य करार : आरोग्य क्षेत्रातील सहकार्य संशोधन | फिलिप्स ही वैविध्यपूर्ण तंत्रज्ञान कंपनी असून, अर्थपूर्ण नावीन्याद्वारे लोकांचे आयुष्य आणखी सुधारण्यावर भर आहे. व्हीयू-फिलिप्स सहकार्यांतर्गत व्हीयूतील विद्यार्थी आणि शिक्षक काही संशोधन प्रकल्पांवर काम करीत आहेत. |
| सेइलेर गारेपा प्रा. लि. | सामंजस्य करार : विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये संधी | 'मेक इन इंडिया' मोहिमेचा प्रसार करण्यासाठी सेइलेर गारेपा इंडिया प्रा. लि.ची स्थापना करण्यात आली. हा गारेपा इंजिनीअर्स आणि एम/एस सेइलेर व्हाकुमटेक्रिक जीएमबीएच यांचा संयुक्त उपक्रम आहे. |
| ऑटो क्लस्टर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट | सामंजस्य करार : विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये संधी | लघु आणि मध्यम उद्योगांसाठी सामाईक सुविधांचे क्षेत्र, मान्यता, प्रशिक्षण, चर्चासत्र, कार्यशाळा; तसेच वाहनउद्योग आणि अभियांत्रिकी क्षेत्रांसाठी प्रचार-प्रसार उपक्रम उपलब्ध करुन देण्यासाठी ऑटो क्लस्टर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट आहे. |
| फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्हज (एफयूईएल - फ्युएल) | सामंजस्य करार : विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वृद्धी | फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्हज (एफयूईएल - फ्युएल) ही ना-नफा तत्त्वावर चालणारी विश्वासार्ह संस्था असून, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दरी भरुन काढण्यासाठी भारतभरातील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि कौशल्य प्रशिक्षण देते. |
| महेश इंडस्ट्रीज ग्रुप (एमआयजी) | सामंजस्य करार : सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी व्यासपीठ | माहेश्वरी समाजातील उद्योजकांचे संपर्क व्यासपीठ म्हणून ही ना-नफा तत्त्वावर चालणारी संस्था असून, नव्या उद्योजकांना प्रोत्साहन देते. संस्थेशी असलेल्या आमच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे व्यासपीठ उपलब्ध होते. |
| ऑगी स्टुडिओ प्रा. लि. | सामंजस्य करार : ग्राहकानुभव (यूआय) आणि ग्राहक व्यासपीठ रचना (युजर इंटरफेस डिझाइन) | आधुनिक, समृद्ध, लक्षवेधक ग्राहकानुभवाचे (यूआय आणि यूएक्स) आणि क्लिष्ट माहिती प्रणालींसाठी संवादी दृश्यात्मकतेचे डिझाइन आणि विकास ही ऑगी स्टुडिओची खासियत आहे. |
| क्विक हील टेक्नॉलॉजीज | सामंजस्य करार : सायबर सुरक्षितता प्रशिक्षण आणि जागरुकता | क्विक हील टेक्नॉलॉजीज ही माहिती तंत्रज्ञान सुरक्षितता उपाययोजना पुरविणारी आघाडीची कंपनी आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांची सायबर सुरक्षितता जागरुकता उपक्रम व प्रशिक्षणांतील सहभाग व्हीयू आणि क्विक हीलच्या सहकार्याने शक्य झाला आहे. |
| सेंटर फॉर पोलिस रिसर्च | सामंजस्य करार : सामाजिक समस्यांवर संयुक्त संशोधन | सेंटर फॉर पोलिस रिसर्चतर्फे नेतृत्व, सुरक्षा, धोरण आणि व्यवस्थापन आदी क्षेत्रांत शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते. संशोधन आणि सुविधांमध्ये असलेली आपापल्या संस्थेची ताकद दोन्ही संस्थांच्या विद्यार्थी आणि शिक्षकांना फायदेशीर ठरते. |

| संस्था | सहकार्याचे स्वरुप | संस्थेबाबत थोडक्यात माहिती |
|---|---|---|
| टीजीसी टेक्नॉलॉजीज प्रा. लि. | सामंजस्य करार : गेमिफिकेशनमधील क्षमतावृद्धी आणि प्रकल्प | गेमिफिकेशन आणि तत्सम शाखांमधील उद्योगांतील समस्यांवर संशोधन करण्याच्या दृष्टीने व्हीयू आणि टीजीसीने एकत्र काम करण्याचे ठरवले. यामध्ये वेगवेगळ्या शाखांमधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा चमू गेमिफिकेशन प्रकल्पांवर काम करतो. |
| केसरी एमआयसीई | सामंजस्य करार : पाठ्यक्रम संरचना आणि अंमलबजावणीत ट्रॅव्हल अँड टुरिझम उद्योगांचा सहभाग | केसरी एमआयसीई हा भारतातील पर्यटन उद्योगांत अभिनव कल्पना आणि उत्तम सेवेद्वारे आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या केसरी टूर्स प्रा. लि.चा एक विभाग आहे. व्हीयू आणि केसरी एमआयसीईच्या सहकार्यांतर्गत पाठ्यक्रम संरचना आणि अंमलबजावणीत ट्रॅव्हल अँड टुरिझम उद्योगाचा सहभाग आम्ही शक्य केला. |
| होडेक व्हायब्रेशन टेक्नॉलॉजीज प्रा. लि. | सामंजस्य करार : सहसंशोधन आणि संयुक्त प्रकल्प | होडेक व्हायब्रेशन टेक्नॉलॉजीज प्रा. लि. ही इंजिनांसाठी टोर्सिओनल व्हायब्रेशन डॅम्पर तयार करणारी आशियातील आघाडीची कंपनी आहे. अभिनवता रुजविण्यासाठी आणि संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेण्यासाठी व्हीयूने होडेकशी सहकार्य केले आहे. |
| बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी | सामंजस्य करार : पाठ्यक्रम संरचना आणि अंमलबजावणीत सूक्ष्मवित्त उद्योगाचा सहभाग | बुलडाणा अर्बनची स्थापना 1986 मध्ये झाली असून, त्यांच्या देशातील 4 राज्यांत 456 शाखा आहेत. आमच्या अभ्यासक्रमात औद्योगिक दृष्टिकोन आणण्यासाठी आणि पाठ्यक्रम संरचनेत उद्योगांचा सहभाग असावा, यासाठी व्हीयूने बुलडाणा अर्बनबरोबर सहकार्य केले आहे. |
| एचसीएल टेक्नॉलॉजीज | सामंजस्य करार : विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर प्रशिक्षण आणि त्यांचा कौशल्यविकास | एचसीएल टेक्नॉलॉजीज ही भविष्यवेधी तंत्रज्ञान कंपनी असून, उद्योगांना आपल्या व्यवसायाची डिजिटल युगात फेरकल्पना करण्यासाठी मार्गदर्शन करते. शाश्वत शिक्षण परिसंस्था उभारण्यासाठी व्हीयूच्या एचसीएलबरोबरच्या सहकार्यांतर्गत विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाबाबत मार्गदर्शन केले जाते. |
| ज्ञान प्रबोधिनीची इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी (जेपीआयपी) | सामंजस्य करार : सायकोमेट्रिक मूल्यमापन आणि समुपदेशन | ज्ञान प्रबोधिनीची इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी ही ज्ञानप्रबोधिनी या मातृसंस्थेची आणि ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था या मानसशास्त्र विभागाची उपसंस्था असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संशोधन केंद्र म्हणून संलग्न आहे. |
| क्विक हील फाउंडेशन | सामंजस्य करार : साय-फाय कला महोत्सव | मानवी आयुष्यावर डिजिटल क्रांतीचा काय प्रभाव पडतो, हे दाखवणारा लघुपटांचा साय-फाय कला महोत्सव नावाचा स्पर्धात्मक महोत्सव भरवला जातो. विश्वकर्मा विद्यापीठ त्याचे आयोजन करते. |
| एथनस | फिनिशिंग स्कूल प्रशिक्षण | एथनस उभरत्या तंत्रज्ञानांतील उद्योगांनी दखल घेतलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवतो. कंपन्यांना आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन आम्ही विद्यार्थ्यांना भविष्यातील कामासाठी कयार करतो. |

## संस्थात्मक सदस्यत्व

| | | |
|---|---|---|
| असोचेम | सदस्यत्व | द असोसिएटेड चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ही नवी दिल्लीस्थित अशासकीय संस्था आहे. समस्या आणि उपाय यांमधील व्यासपीठ म्हणून भारतातील व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व ही संस्था करते. |
| एडीआय | सदस्यत्व | भारतीय डिझाइन समुदायाच्या व्यावसायिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे जागतिक दर्जाचे संपर्कजाळे होण्याचा एडीआयचा मानस आहे. यासाठी डिझाइन व्यावसायिक, ग्राहक, उद्योग, शिक्षण संस्था आणि धोरणकर्ते यांच्यातील अर्थपूर्ण व्यासपीठ होण्याचा उद्देश आहे. |
| एनआयपीएम | सदस्यत्व | मनुष्यबळविकास व्यवस्थापन, औद्योगिक संबंध, कामगार कल्याण; तसेच प्रशिक्षण व विकास यात कार्यरत असलेली नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (एनआयपीएम) ही व्यावसायिक व्यवस्थापकांची भारतातील एकमेव संस्था आहे. |
| आयएसटीडी | सदस्यत्व | आयएसटीडीतर्फे देशभरात शाखा आणि राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिले जातात. प्रशिक्षकांना प्रशिक्षण, प्रशिक्षण उद्दिष्टे आणि प्रशिक्षण साधने व तंत्रज्ञान यावर विशेष भर असलेल्या मनुष्यबळविकासाच्या निवडक क्षेत्रांतील हे कार्यक्रम आहेत. |
| ड ब्ल्यू ए फ - एनईएन | सदस्यत्व | वाधवानी फाउंडेशन ही ना-नफा तत्त्वावरील संस्था असून, संस्थेचे प्राथमिक ध्येय उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती, अभिनवता आणि कौशल्य विकासाद्वारे उभरत्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास साधणे असे आहे. |
| एमसीसीआयए | सदस्यत्व | पुणे हे गुंतवणुकीचे स्थान आणि दर्जेदार उत्पादने व सेवांचा जागतिक स्रोत व्हावे, यासाठी एमसीसीआयए सातत्याने प्रयत्नशील आहे. उद्योगांसाठी महत्त्वाच्या अनेक संस्था पुण्यात याव्यात, नव्याने उभारल्या जाव्यात, यासाठी 'एमसीसीआयए'ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. |
